# वऱ्हाडसमाचार.

## THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

AKOLA:—SATURDAY EVENING, MAY 7· 1870 NO. 19

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख ७ माहे मे. सन १८७० इ० अंक १९


## यंदाचा प्राप्तीवरील कर.

दरसाल सालारंभीं म्हणजे मार्च किंवा एप्रिल मध्यें ज्याप्रमाणें जमाखर्चाचा आंदाज होत असतो त्याप्रमाणें यंदाही झाला; आणि त्यांत जमेच्या आंदाजापेक्षा खर्चाचा आंदाज जास्त झाला म्हणून सरकारानें जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यास हा प्राप्तीवरील कर अथवा रुपया मागें सहा पै घेण्याचा ठराव केला आहे.

हा कर घेण्याकरितां सरकारानें एक्या क्षणांत आपल्या कायद्याच्या टंकशाळेंत सन १८७०चा सोळावा ह्या नांवाचा आक्ट कर घेणाऱ्या कामीं लावण्याकरितां पाडला. व तो लागलाच पसारही केला. हा आक्ट तारीख १ एप्रिल सन १८७० पासून तों तारीख ३१ मार्च सन १८७१ पर्यंत जारी रहाणार. ह्या आक्टांतील सारांशः—

लष्करी अमलदार ज्याला पगार ५०० रुपयांच आंत आहे त्यास कर माफ आहे.

इतर लोकांस ज्या मनुष्याची प्राप्ती ४१८१०८९ पैपेक्षां कमी आहे त्यास कर नाहीं.

स्थावर अथवा जंगम उत्पन्न जें देवस्थान धर्मादायाकडे अर्पण केलें असेल त्यास कर नाहीं.

नोकर लोकांवरील कर त्यांचे पगारांतून कापून घ्यावा.

पांचशें रुपयांचा उत्पन्नापासून दोन हजार रुपयांपर्यंत नियमित आकार ठेविला आहे. पांचशें पासून साडे सातशें पावेतों साडे एकुणीस रुपये. साडे सातशें पासून हजारपर्यंत सत्तावीस रुपये. एक हजार पासून दीड हजारपर्यंत ३९ रुपये. आणि दीडपासून दोन हजारपर्यंत ५४ रुपये. दोन हजार रुपयांवर दर रुपयास अर्ध आणा.हा कर चार हप्त्यांनीं घेणार.

ह्या आक्टांत आणि मागील आक्टांत म्हणण्यासारिखा भेद मिळून इतकाच कीं त्यापेक्षां याजमध्यें कराचा बोजा तिपटीच्या मानावर गेला.

गेल्या सालीं सरकारानें शेंकडा एक रुपया कर घेण्याची सुरवात केली. पुढें कांहीं महिने गेले नाहींत तोंच सरकारच्या नजरेस जमाखर्चांत मोठी घोड्याएवढी चूक आली. तिची बुजावाबुजव करण्याकरितां सरकारानें २८८ रुपये शेंकडा कर वाढविला आणि दुसऱ्या कित्येक खात्यांत रिडक्शन केलें. हा अडीच रुपयांचा कर थोड्या महिन्याकरितांच होता म्हणून त्याचा फारसा गवगवा झाला नाहीं.

ह्या करांतून कधीं मुक्त होऊं अशी जों आमच्या हिंदुस्थानची दीन व पैशानें सर्वस्वी नागवलेली प्रजा वाट पहात होती तों च आमच्या दयाळू इंग्रज सरकारानें तिचावर द्विगुणीत बोजा लादण्याचें संधान आणिलें. ह्मणजे पूर्वींचा रुपया आणि थोड्या दिवसाकरितां केलेले अडीच मिळून साडे तिहींच्या जवळ जवळ करावें माप आणिलें.

बहुतक शाहण्या व राजकीय लोकांचीं अशीं मतें आहेत कीं प्रजेपासून राजानें पाप्तीवर कर लढाईच्या अथवा दुसऱ्या येखाद्या आणीबाणीच्या प्रसंगीं घेणें हें योग्य आहे. परंतु देशांत जिकडे तिकडे शांतता असतां व सुरळीत पणानें राज्यकारभार चालला असतां, दयाळू न्यायी व प्रजेच्या सुखाविषयीं फारच दक्ष म्हणविणाऱ्या आमच्या इंग्रज सरकारानें तिच्या सुखाकडे कांहीं लक्ष न देतां असा आपल्पोटेपणा करून आपली तुंबडी भरली म्हणजे झालें दुसऱ्याचें कांहीं कां होईना ह्यावर नजर ठेवून येवढा मोठा बोजा म्हणजे रुपया मागें अर्धा आणा (मारवाडी व्याजा सारखा) प्रजेच्या डोयीवर देणें हें त्यास अगदीं योग्य नाहीं व त्याच्या सर्व मागील केलेल्या दयेच्या कृत्यांस कालिमा आणणारें होय.

आमचें सरकार ह्याविषयीं कांहींच विचार करित नाहीं असें दिसतें. आणि हो, बरोबर आहे त्यानें तरी विचार कशाकरितां करावा. त्यास चांगलें ठाऊक आहे कीं इकडील प्रजा म्हणजे अल्लाची गाय तिला पाहिजे त्यांणें पाहिजे तसें दडपलें तरी चालतें मग सरकारानें तिची उगाच दाद घेऊन कां पैशाचें नुकसान करावें. ?

आमचे सध्याचे गवरनर जनरल साहेब इकडे आले तेव्हां ते मोठ्या कुळांतील व चांगले विद्वान व राज्य कारस्थानामध्यें मोठे दक्ष व तसेंच त्यांचे फिन्यानशियल मिनिस्टर सर रिचर्ड टेंपल, जांची कीर्ति सर्व वऱ्हाड आणि मध्य प्रांतभर झालेली आहे असे मिळलें. म्हणून मागील गवरनर जनरलच्या कारकिर्दीपेक्षां हिंदुस्थानांतील प्रजेस सुखाचा जास्त उपभोग मिळेल अशी आशा होती परंतु ती नाहींशी होऊन वाऱ्यावर गेली इतकेंच केवळ नाहीं परंतु पूर्वीं जितकें सुख होतें त्यापेक्षां कराच्या वगैरे त्रासानें आतां फार कमी झालें असें म्हणण्यास चिंता नाहीं.

ह्या कराच्या बाबदींत सर्व वर्तमान पत्रांतून फार मोठा गवगवा चालला आहे. पण त्याकडे सरकार लक्ष देईल काय? त्यास सर्वांचें ऐकून घेण्याची सवय आहे. पण तें आपलें मनांतील करण्यास कधींही चुकणार नाहीं. मग तुम्हीं त्यापुढें पाहिजे तितकी उरस्फोड करा ती सर्व व्यर्थ जाणार आहे.

मुंबई, कलकत्ता ह्या ठिकाणांहून युरोपियन व नेटिव लोकांनीं कर कमी व्हावा म्हणून अर्ज केले आहेत. परंतु आम्हांस वाटतें कीं ह्या अर्जांची दाद लागणें फार कठीण आहे, मग न जाणो. सरकारानें आपली तुंबडी भरण्याकडे ध्यान ठेविलें आहे. तेव्हां तें तों भरे पर्यंत कोणाच्या अर्जाकडे, लिहिण्याकडे अथवा बोलण्याकडे लक्ष देईल असें आम्हांस वाटत नाहीं.

---

(लिहुन पाठविलेला मजकूर)

पुनर्विवाह विषयीं बहुत दिवसांपासून घोटत असलेलें प्रकरण गुदस्तसालीं मुंबईस वेणूबाइचा जेव्हां पुनर्विवाह झाला तेव्हां पासून आज एक वर्षभर अगदीं हात घाईस आलें होतें त्याचा पुणें मुक्कामीं मोठे समारंभानें निकाल झाला. तूर्त या वादाचा हा अखेर निकाल समजावयाचा एकंदर दाहा लोकांत साहा प्रतिकूळ व च्यार अनकूळ मतें पडलीं यावरून बहुत संगत प्रधान या भावानें विरुद्ध पक्षाचा जयजयकार झाला. असें लोकांस वाटतें, परंतु त्यांत कांहीं अर्थ नाहीं कांकीं दोन पंचमांशाची पुनर्विवाह पक्षास अनुकुलता व तीन पंचमांशांची मात्र प्रतिकूलता हें उघड झालें. या वरून आम्ही म्हणतों कीं अनुकूळ पक्षास एक पंचमांशाचीच साह्यता तूर्त पाहिजे आहे म्हणजे बरोबरी होते अस्तु ईश्वर करून लवकरच ह्या पक्षास अधिकाधिक लोक येऊन मिळोत व त्याची वृद्धी होवो.

आतां एकंदरीनें पहातांहि वाद निवादाची रीति श्री० शंकराचार्य व इतर शास्त्री मंडळी यांनीं मान्य केली हें फारच चांगलें केलें पूर्वीं अशा ज्ञाती संबंधीं तंट्याचे निकालाकरितां सभा होत परंतु अशा प्रकारें लेखी व उघडपणें उतावळी न करितां (येकेरीवर न येतां) उभय पक्षांच्या कोट्या होऊं देणें व गंभीरपणें त्यांचे मनन करून निर्णय ठरविण्याचे चालीचें हें पहीलेंच उदाहरण असेल असें आम्हांस वाटतें. आतां हा वाद होण्याच्यापूर्वीं उभय पक्षकारांचे बोलणें ऐकिल्याशिवाय श्री शंकराच्यांर्यांनीं बहीष्काराची आज्ञा दिली तें नीट केलें नव्हतें व त्यणीं जेव्हां वे० शा० रा० रा० विष्णु शास्त्री पंडित यांची वाद करण्याची शैली व ग्रंथाधराचें माहितीचें भांडार व त्या कामीं त्यांचा शोध, मेहनत व एकच दृढ निश्चय पाहिला आणि अनाथ अबालांचें आक्रोश, हाल व छळ आणि दुर्दशा व नाश यांचा विचार केला असेल तेव्हां त्यांच्याहि मनाची डळमळ झाल्या वांचून राहिली नसेल परंतु "Why should we be wiser than our fore fathers" आपले पूर्वज्यांनीं ज्याअर्थीं ही गोष्ट ग्रहण केली नाहीं व आपण ही या पक्षास इतकी बळकटी आहे किंवा नाहीं याचा विच्यार न करितां बहिष्कारास वगैरे मान्यता दिली आहे त्याअर्थीं आतां आपण वडीलांची रिती सोडूं नये व दृढ होऊन आपला टेंबा मिरवावा तिकडे लक्षावधी विधवा रडताहेत त्या रडतनांकां आपलें काय गेलें असें त्यांणीं मनांत आणिलें असेल. खरेंच आहे कीं "पर दुःखन दुःखीता विरळा" प्रमाणें निर्दय पुरुषांनीं अखेर अनाथ विधवांवर आग पाखडली. शिव! शिव! परमेश्वरा!! तूं सर्व व्यापक असतां या दुष्टांच्या ह्रदयांत संचार करून यांस सद्बुद्धि व दया कां नाहीं उत्पन्न केलीस? हरहर! हे देवा तुझा करुणा सागर तरी कोणत्याअर्थीं म्हणावें? असो आतां तुजपेक्षां प्रालब्धच जोरावर समजून जोंपर्यंत त्या अनाथ विधवांचें प्रारब्ध निजलें आहे तों पर्यंत त्यांचे हाल या नीच लोकांनीं पाहिजे तसे करावे व आपलें तेज मिरवावें. सूर्य मावळला म्हणजे ज्याप्रमाणें काजवे चमकूं लागतात त्याप्रमाणें तो त्यांचा प्रालब्धरूपी सूर्य मावळला आहे असें मानिलें पाहिजेना? असो !!!

आतां वादाचें कांहीं झालें तरी विष्णु शास्त्री यांची वहावा केल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं. पहा कीं, ज्यानें आज पांच सहा वर्षें एक सारखा सतत शोध व उद्यो[illegible] यांत स्वार्थ बुद्धि कांहीं [illegible] काय? जर त्यांणीं ए[illegible] दुसरें एकादें स्वहित [illegible] तर बहुत द्रव्य संपाद[illegible] गास लागते, पण अ[illegible] भोगण्यापेक्षां आपले [illegible] नाथ अबला वैधव्य दु[illegible]सागरांतून [illegible] ल व या भट्टांच्या हट्टा[illegible] हेतूनें मनांत दया [illegible] ठाप्रयत्न चालविला [illegible] त्यांची या समयीं पंचां[illegible] तां जर खरीं मतें दिलीं असतीं तर त्यांच्या श्रमाचें सार्थक होतें. तथापि अंशतः बरेंच काम झालें. असाच जर दुसरा कोणी विद्वान, बुद्धीमान, व उद्योगी पुरुष पुढें येऊन हें काम हातीं घेईल तर त्यास हे शास्त्रीबुवांचे श्रम बहुत साहित्य देतील यांत संशय नाहीं. आणि ज्यापक्षीं आज पाहिल्याच सभेंत दोन पंचमांश मतें मिळालीं आहेत त्यापक्षीं पुढील प्रसंगीं निदान तीन च्यार पंचमांश तरी मिळतीलच. आज तरी लोकांत भीति अधिक व धैर्य कमी हेंच मुख्य कारण तें दिवसेंदिवस हटतें आहे. जगदीश करो आणि धैर्य व सत्य यांचा लोकांचे ह्रदयांत प्रवेश होवो आणि विष्णु शास्त्रयांसारखे आपले हित एकिकडे ठेवून केवळ अनाथ, दीन यांजविषयीं कळवळा वागविणारे व त्यांच्या साह्यार्थ झटणारे लोक आपल्यांत निर्माण होवोत.

---

## पांच.

"विधवा विवाहाविषयीं पुण्यांत झालेला वाद" ह्या नांवाचें लहानसें ७० पृष्ठांचें पुस्तक गेल्या इंदुप्रकाशाबरोबर पुरवणी दाखल आलें याचा आम्ही आदरपूर्वक स्वीकार करितों. हें पुस्तक वाचण्याची आम्हांस सवड झाली नाहीं. सवडीप्रमाणें आम्ही आपला ह्याविषयींचा अभिप्राय पुढें पसिद्ध करूं.

---

आम्हांस खामगावाहून तेथील पोलिसाविरुध्द मजकुराचें, सहीचीं अक्षरें मुळींच समजत नाहींत असें, एक पत्र आलें आहे. अशीं पत्रें असलीं म्हणजे आम्हांस तीं रद्दी कागदांत टाकावीं लागतात. तर आपलीं पत्रें छपलीं जावीत असें इच्छिणारांनीं तीं चागलीं सुवाच्य आणि बाळबोध लिपींत

लिहून पाठवावी व सहीची अक्षरें वाचतां येतील अशीं मोकळी असावीत. म्हणजे त्यांच्या श्रमाचें चीज होऊन आम्हांकडे दुर्लक्ष दत्ताचा दोष येणार नाहीं.

## वऱ्हाड.

उमरावती येथें हल्लीं अतिशय उष्मा होतो. उन्हाळ्यानें आपला पूर्ण अंमल बसविला. आकाश शांत कधीं कधीं ढगें येतात, तेणें करून आंगाची जी काहली होती ती अतिशयच होय रोग राई कोठें आहे असें ऐकण्यांत आलें नाहीं.

बाजार भाव—ज्वारी १६॥. रुपये खंडी गहुं ३२ रु. खंडी तुरीचे डाळ ४० रुपये खंडी जवें ४० रु. खंडी व डाळ ६० रु. खंडी तांदूळ ५।२५।६० रु. खंडी तूप १ रुपयाचा १ पक्का शेर तेल १ रुपयास पक्के शेर ... शेर. माका चांगली २ शेर २।. शेर येणें प्रमाणें बाजार भाव आहे.

कापसाचा भाव हल्लींचा ८६ रुपये कलदाराचा आहे. वसंताचा कापसाचा भाव १०३ कलदार रुपयाचा आहे.

चांदुर येथील तहशीलदार यांनीं सहा महिन्याची रजा मागितली आहे असें समजतें.

## अकोला.

मे. ... साहेब कमिशनर हे एक दोन दिवसा पूर्वी चिखलदऱ्याकडे गेले असें कळतें.

मे महिन्याची सुटी सालाबाद प्रमाणें मास्तर लोकांस मिळून बहुतेक मास्तर लोक स्वदेशीं गेले.

न्यायाचा मासला—येथील अ. क. मे. श्रीकृष्ण नरहर यांचे पुढें दिवाणी मोकदमा चालला असतां वादी व प्रतिवादी कडून दोन्ही वकील हजर होते त्यांत वादिच्या वकिलास असें सांगितलें कीं, तुमचे कडील मोकदमा होईल असें आम्हांस वाटत नाहीं तर याबाबदींत नाहीं वाऱ्याचा असल्यास बोलावें याजवरून वादीचे वकालानें त्यांतील मुद्दे सांगून कोर्टाची खातरी केली कीं, प्रतिवादीनें वादीचे देणें आहे याजवरून वादी तर्फे मुकदमा फैसल केला याजवरून प्रतिवादीनें मागील नुमत्या नालण्यावर लक्ष देऊन त्यानें बापु साहेबांवर आपला महीचा अर्ज दुसऱ्या कडून लिहून दिला त्याप्रमाणें तो सर्व खटला मे. हारडर्न साहेब डेप्युटी कमिशनर यांचे पुढें चालू झाला त्यांत असा कैसा काढला कीं अर्ज करणारानें, अधिकाऱ्यांचे अब्रुस विनाकारण धक्का आणण्या करितां अर्ज केला याजवरून त्यांस तर तुरुंगाची शिक्षा मिळाली परंतु लिहिण्यास आश्चर्य येवढेंच कीं पोट भरणारे उमेदवार जे केवळ उदरनिर्वाहार्थच च्यार पैसे घेऊन अर्ज लिहितात त्यांस शिक्षा होणें हें मोठेंच नवल आहे. कारण ते लोक मुकदम्यांतील तत्व काढणारे नसल्यानें ते कोणि कडून पैसे मिळविणार असतात याजवरून म्हणजे त्या अर्ज लिहीणारानें अधिकाऱ्याचे अब्रूस धक्का लावण्या करीतां मुदाम केले असे होत नसून त्यांस जी शिक्षा झाली त्या शिक्षेस कायदा कोणताला वला असेल कोण जाणें तर आमचे येथील वरिष्ठ अधिकाऱ्यास असे सुचविणे आहे कीं त्यांनीं अन्यायानें झालेल्या मुकदम्यांत लक्ष पोचवून गरीब निचारे उमेदवारास त्यांचे दुःखा पासून सोडवणुक होईल अशी आशा आहे.

हवामान— उष्णतेने आपला पुर्ण अमल बसविला. दिवसां आठवाजल्यापासून पांच वाजतो पर्यंत बाहेर तोंड काढून देत नाहीं. लग्नसमारंभाचा तडाका लागला आहे यामुळें हो म्हणण्या सारखे नाहीं.

येथील पुलाचें काम फार तडकीनें चाललें आहे. याप्रमाणेंच जर काम सुरू राहील तर बरसातीचे अगोदर पुलाचे सुख लोकांस मिळेल असा संभव आहे.

मे० कार्नाक साहेब काटन कमिशनर हे कलकत्यास आहेत ते आग्रा वगैरे ठिकाणीं कपसाची पेठ पहाण्यास तेथून जाणार असें कळतें.

अकोट तालुक्यास अकोली म्हणून एक खेडगांव आहे तेथें एका कुळवाचे बाईस सर्पदंश होऊन यमसदनप्रत चालती झाली. ती साहा महीने त्याची गरोदर

उमरावती— येथील तहसीलदार कचेरीतील गोविंद मल्हार व सितारामपंत याउभयतांच्या चांदुर येथील तहसिलदार कचेरीत बदली केल्याचें प्रागुती पत्रावरून कळतें.

बदनेरा पासून उमरावती पर्यंत रेल्वेचें काम सुरू होऊन त्याकरितां नवीन इंजीनीयर हो आला असे समजतें.

मी० नागोराव जयकृष्ण अ. को. कमिशनर हें अडगावांस लग्नसमारंभास गेले होते ते परत उमरावतीस गेले.

## मागाहून आलल्या जाहिराती.

नोटिस—सोनाजी उर्फ महाली खामगांवकर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुम्ही ता. ३० एप्रिल सन १८७० इसवीचे वऱ्हाडसमाचार पत्रांत पांच वर्षें नोकरी केली याजबद्दल रुपये १२० तुम्हांकडून घेणें आहेत ते द्यावे नाहीं तर दावा करण्यांत येईल वगैरे मजकुराची दिली त्यास तूं आमचे येथें नोकरीवर नसून आम्ही तुजला नोकर ठेविलेंही नाहीं सबब तुझें आम्हास कांहीं देणें नाहीं उलट आमची खातेबाकी व्याजसुद्धां आमचे रुपये १२५ निघत आहे ते देण्याविषयीं तुजला तगादा लाविल्यावरून आमचा पैसा बुडविण्याचे हेतूनें ही नोटिस तुम्हास दिली आहे त्यास तुझा आम्हास तर दर्णन नाहीं परंतु आमचे खातें बाकीचा निकाल आज पासून आठ दिवसात करावा न केल्यास शिरस्ते प्रमाणें तुजवर दावा करून खर्चा सुद्धां करावे लागेल मग येतील कळावें तारिख ६ मे सन १८७० इसवी.

(सही) शिवलदास हिरामल वस्ती खामगांव दस्तुर हिरालाल.

## वर्तमानसार.

The lible case, growing out of the widow marriage discussion recently held in Poona, is still pending in the Railway Magistrate's Court. The evidence of the Shunker Acharya is to be taken at 8 o' clock this morning (May 2) The Court is to sit for this purpose at Shri Juggutgooroo's Mut. Out of deference to the religious feelings and prejudices of the older members of the Brahminical community of Poona, the Magistrate has dispensed with the attendance of the Shunker Acharya in his crowded court, and consented to take his evidence at his, the Acharya's own residence in the city. No doubt the Magistrate has adopted this course after mature consideration. The present is a time of unprecedented excitement amongst the Brahmans of Poona, and this might be greatly aggravated by dargging the Juggutgooroo, a strict sunyasee, into open Court. The Magistrate is acting judiciously, we think, in seeking to pour oil on the troubled waters.- *Deccan Herald.*

धारवाड—आमरवळ तसटीस लागड साहेबानीं सरकारास असा रिपोर्ट केला आहे कीं येथील स्मालकाज कोर्ट बंद करावें कारण तें असल्या पासून फारशी गरज आहे असें नाहीं.

मरोवा कानोबा यानीं भुरबाई नांवाचे पुनर्विवाह झाला त्याजला व कन्यादान करणारास पथरे प्रभुनीं सभा करून बहीष्कार घातला असे कळतें.

चांदा येथील हायस्कुलांत महार मांग मुलांस शाळेंत घेतल्याचा वगाच गवगवा झाला आहे व बहुतकरून तीसरे शाळा ओस पडण्याची वेळ आली आहे असावरून नागपुर प्रांताचे शाळेकडील अधिकारी मि. ब्राउनींग साहेब यांनीं चांदा येथील डेपुटी कमिशनरास असे कळविलें आहे कीं, महार मांग चे मुलांस हायस्कुलांतील दुसरे खोलींत निराळें शिकवावें म्हणजे ब्राह्मणाचे मुलांस अडथळा न येतां कामही सुरळीत चालेल हें त्याचें म्हणणे मान्य झाल्यास बरेंच झालें नाहीं तर येथील हायस्कुल कमी करावें असें दर्शविलें आहे असें आंत ग्याझिटवरून कळतें.

पुणें. येथें चालू असलेल्या खटल्याचा निकाल सोमवारी होईल असें कळतें.

धुळें हवा—या आठवड्यांत उन्हानें विशेष प्रखरता दाखविली. उष्ण मापकयंत्रातील पारा १०५।१०६ अंशा पर्यंत असतो अशा प्रखर तापानें शरीरांत उष्णतेचा जोर वसून घर्माचे पाझर सुटतात गांवांत रोगाचें प्राबल्य आहे.

मे० सखाराम चोंडदेव से. क्लार्क स. जज कोर्ट नंदुरबार यांचे स्वारी ५।६ दिवस झाले एथें येऊन आज गेली रा. रा. गोविंद राव रामचंद्र गरूड यांसह मुंबई वगैरे ठिकाणीं गेल्याचें कळतें.

लिहिण्यास दुःख वाटतें कीं एरंडोलचे मामलेदार रा० रा० नारायण राव रामचंद्र जांगळेकर यांणीं भोई लोकांवर न्यायाचा जुलूम करून त्यास ३।३ महिन्याची सक्त मजुरी व १००।१०० रुपये दंड केला, यावर त्या लोकांनीं मे० कलेक्टर साहेब यांजकडे अपील केल्यावरून तिकडून त्यांस योग्य न्याय मिळून त्या लोकांस सोडून दिलें आणि साहेब बाहदुर यांणीं मामलेदार साहेब यांचा फ. क्रि. चा अधिकार कमी करावा अशाबद्दल मे. कमिशनर साहेब यांजकडे लिहून मशारनिल्हे मामलेदार यांणीं दुसरा हुकूम होई पर्यंत माजिस्ट्रेटचें काम पाहूं नये म्हणून लिहिल्याचें समजतें.

ख० वे०

रत्नागिरी—हवा उष्ण झाली आहे. धान्याचा भाव दिवसें दिवस चढत आहे. मेहेरबान कलेक्टर साहेब यांची स्वारी गेल्या शनवारीं एथें आली. उदईक जयगडास जाणार आहे. ज. मि.

नासिकहवा—रविवारीं दिवसा बारा वाजत पर्यंत हवा चांगली होती. पुढें एकाएकी अभ्रें येऊन वारा सुटला आणि सायंकाळीं सुमारें ४ वाजतां केवळ पर्जन्य काळाप्रमाणें वृष्टि सुरू झाली. ती तास पाउण तास चालू होती. तेव्हां पासून अद्याप चांगलें सूर्य दर्शन नाहीं. गेले रात्रीस हो तुरळक वृष्टी झाली. रोगराई अद्याप नाहीं परंतु हवेचें मान आकाबईचा जासूद आहे असें अनुमान होतें.

शिमग्याची पुरवणी —येथें अशी चाल आहे कीं वैशाख वद्य ३ चे दिवशीं सायंकाळीं शुद्र जातीच्या नायकानीं गंगेचे दोन्ही बाजूनें जमून टिपऱ्या खेळाव्या आणि एकमेकावर पाणी उडवून फांका घालून परस्परांस मनास येईल तशा शिव्या द्याव्या. हा सर्व प्रकार काल रोजीं झाला त्या वेळेस पुरुष शिमग्यांत जीं जीं कृत्यें करितात तीं सर्व बायकांनीं करून दाखविलीं. एक शंखध्वनी मात्र केली नाहीं. हो काय वाचक असेल तो असो; तथापि हजारों मनुष्यांचे समाजा समोर गृहस्थ बायकांनीं असें वागणें मोठी लाजीरवाणी गोष्ट आहे. कलावंणींस ही लज्जा वाटून त्या सर्व एका बाजूस बसून मजा पहात होत्या. मग आपल्या नायका बेअब्रुची भाषणें करतांना आणि पाहिजे तशा वागताना पाहून शूद्र लोकांस अगदीं शरम वाटूं नये ना !!! माजिस्ट्रेट साहेबांस आमची अशी सूचना आहे कीं, हा प्रकार धर्मसंबंधाचा असेल असें आम्हांस वाटत नाहीं. या करितां असा प्रकार पुन्हा घडून स्त्रियांचा उपमर्द होऊं न देतां लहान मुली गंगेंत पडून अपघात होण्याचा संभव ही दुर करावा.

वरील उत्साहाचे वेळीं एक न्हाव्याची बायको पितांबर नेसून आली होती त्यांजविषयीं एका तेल्यानें अशी फिर्याद केली आहे कीं, पांच वर्षां पूर्वीं त्याचा एक पितांबर चोरीस गेला होता तो हाच आहे. तपास चालू आहे. ज्ञा. मं

काबूलचे अमीर शीयर अलीखान यांनीं आपल्या राज्यांत इंग्रज सरकाराप्रमाणें दिवाणी व फौजदारी खटल्याचा निकाल करण्यास तेथें तहशीलदार व ठाणेदार यांच्या नेमणूका केल्या असें दिल्ली ग्याझट वरून समजतें.

मि. माणिकजी रस्तमजी यांस कलकत्ता येथें इराणचे शाहा यांनीं आपले कन्सल जनरल वकील नेमले. यांची नेमणूक राणी सरकारास मान्य झाली असें लंडनच्या सरकारी ग्याजेट वरून कळतें.

मारवाड प्रदेशांत नुकाच एक सती जाण्याचा प्रकार घडला. ज्या संस्थानिकाच्या हद्दींत ही गोष्ट घडली त्यांनीं या कामांत ज्यांचा संबंध होता त्या सर्वांस दाहापासून चवदा वर्षांपर्यंत सक्तमजुरीच्या कैदच्या शिक्षा गुन्ह्याच्या योग्यतेनुसार दिल्या, असें टैम्स आफ इंडियावरून कळतें. इ० प्र०

मि० पइल्स, असिस्टंट सेक्रेटरी निमन मुं० सरकार, यांस तीन महिन्याची रजा विलायतेस जाण्या करितां मिळुन त्यांचे जागेवर रा० रा० नारायणराव परमानंद यांची नेमणूक तूर्त झाली आहे. आमच्या वाचकांस या गृहस्थाविषयींची विशेष माहिती सांगण्याची जरूर नाहीं. मात्र ही नेमणूक तूर्तची आहे एवढें ऐकून व्हावा तसा आनंद पुष्कळांस होणार नाहीं. तथापि अशा नेमणुकी बद्दल सरकारची तारीफ करणें जरूर आहे कीं उशीरा तरी या गृहस्थाची योग्यता सरकारानें जाणिली. येणे प्रमाणें नेटिव्ह विद्वान लोकांस मोठ मोठ्या हुद्याचीं कामें सरकारानें दिल्याशिवाय सरकार नेटिव्ह विद्वान गृहस्थांची खरी योग्यता समजतें अशा बद्दल श्रद्धा सरकारास पूर्णपणें मोठेपणा देऊं शकणार नाहीं.

एका युरोपियनाचें सौजन्य-एक युरोपियन गृहस्थ कटक त्याहून आगगाडींतून येऊन दिल्लीकडे जाण्याकरितां एका स्टेशनावर दुसऱ्या गाडींत बसला. त्या गाडींत एक स्त्री ( युरोपियन ) होती त्या गृहस्थानें तयें बसून सुरापानास आरंभ केला आणि त्या बाईनें प्यण्याविषयीं पुनः पुनः तीस आग्रह करूं लागला त्या बाईनें दारू स्वीकारली नाहीं: तथापि याचा आग्रह राहीना शेजारच गाडीत सरकारी हुद्देदार तीन चार कलकत्याचे बाबूलोक बसले होते त्याणीं त्या बाईची कठिण स्थिती पाहून त्या युरोपियनानें आग्रह करूं नये ह्मणुन त्यास समजूत दिली. त्या युरोपियनानें बाबूस तोंडीं उत्तर न देतां स्वतःचे हातांतील ब्रांडीची बाटली बाबूच्या डोक्यावर फेकून मारिली. तेणें करून एक बाबू बराच जखमी झाला. त्या अपराधाबद्दल दिल्लीस चौकशी होऊन युरोपियनास २० रुपये दंड झाला. याकरतां डिच्या अंगीं केवढा जोर आहे हें समजेल,

पुणें—आपले महाराणी साहेबांचे जन्म दिवसाचे उच्छाहाप्रीत्यर्थ येथें ता. २४ रोजीं येथें बेटावर एजंट आफिसांत दरबार भरविण्याची वहिवाट आहे. तो दरबार ह्या सालीं २८ वे तारखेस भरणार म्हणून समजतें.

हिंदुस्थानांतील जमाखर्चाचे स्थितीची चौकशी करून रिपोर्ट करण्याकरितां रायल कमिशन नेमावें म्हणून मद्रास चेंबर आफ कामर्स ही मंडळी राणी सरकारास अर्ज पाठविणार आहे

अलाहाबादेस सन १८५७ चे बंडाचे वेळीं एका खाटिकानें मि. बेलर्ड या नावाच्या एका युरोपियनास ठार मारिलें होतें. त्या खाटिकास नुक्तेंच पकडलें आहे असें समजतें.

जबलपूर जिल्ह्यांत एका एन्जिनियराला तांब्याची खाण व ज्यांत रुपें मिश्र आहे अशी एक दुसरी शिशाची खाण अशा सांपडल्याविषयीं समजतें.

काश्मीर देशाचे उत्तरेकडील प्रदेशांतील माल काश्मीरचे हद्दींतून हिंदुस्थानांत येतो शिवाय काश्मीरांहून येतो त्यावर त्या सरकारास कर द्यावा लागत असे, तो त्या सरकारानें न घेण्याविषयीं आपले दयाळू सरकारानें काश्मीरचे राजापाशीं बोलणें लाविलें होतें तें कबूल झालें व त्याबद्दल उभय सरकारामध्यें तहनामा होणार आहे असें समजतें.

अमेरिका येथील अपील कोर्टाची माडीची जमीन आंत दबून पडली त्यांनें ४० गृहस्थ मेले, व दोडशें असामीस इजा झाली, असें न्यूयार्कच्या ता० २७ एप्रिलच्या तारेवरून कळतें.

लंडनच्या ता. ९ एप्रिलच्या तारेवरून असें कळतें कीं, फिनियन लोकांचा नवीन दंगा लंडनांत होणार असा संशय उत्पन्न झाला आहे. पोलिस अधिकारी शोध करीत आहेत.

पनिग्रिन चोर—मेक्कर प्रिस्टविक व कंपनी या नांवाची मंडळी आगबोटींचा व्यापार करणारी आहे. यांचे हातिमांत जेम्स स्टार्ल ह्मणून एक मास कामगार उतारांस टिकिटें देणार तत्संबंधी पैशाचा हिशेब ठेवणारा होता. त्याणें उत्पन्नापैकीं रु० १८० जमा न करितां वल्ले असें कांहीं दिवसां पूर्वी यजमानाचे नजरेस आल्या वरून त्यांणीं विशेष लक्ष न करितां त्यास नोकरींतून दूर केलें. परंतु थोडे दिवसांनी पुढें असें नजरेस आलें कीं हजारों रुपयांचा रकमाच्या रकमा स्टेपल साहेबांनीं हाडा केल्या आहेत. त्यावरून त्याला पकडण्याकरितां माजिस्ट्रेटानें समन्स दिलें आहे असें समजतें. ने० ऑ०

सोलापूर—हवा फार ऊष्ण झाली आहे कधीं कधीं वाराही सुटतो रात्री गर्मी होय रोगराई कांहीं नाहीं. सालमकुरी पाण्याची विपुलता आहे. क०

आमच्या समजण्यांत असें आलें आहे कीं, आलीजागेस मोगगज श्री० भऊसाहेब निवलकर हे जाणार आहेत. याजकरितां येथून कांहीं याज्ञिक मंडळी तेथें जाणार आहे. ज्ञा. प्र

हवा—हल्लीं हवेंत फारच उष्णता भासत असून उष्णमापकांतील पारा दोनप्रहरीं येक वाजतां १०० डिग्रीपर्यंत चढला असतां तेणेंकरून कायली फार होते. ता. २६ व २७ रोजीं सर्व दिवस तुफान हाण्यासारखा वारा सुटला होता.

वे. रा. रा. विठोबा अण्णा वऱ्हाडकर हे पुनर्विवाहाचा वाद आटपून आळंधास जाण्याकरितां गेले सोमवारीं येथें आले. सु. म.

श्री. रा. रा. उपदे उरमलुक रघुनाथराव विठ्ठल विंचुरकर, व श्री. माधवराव विठ्ठल आनररी माजिस्ट्रेट फुलपावर यांस ४४ गांतील क्रिमिनल प्रसिजरचे कोड नें कलम ४६ व, यांत दिलेला अधिकार नाशिक जिल्ह्यांतील माजिस्ट्रेट साहेब यांनीं दिला आहे. वृ. वै

अहमदनगर—इकडचा अहवाल दोन चार दिवसां पूर्वीं हवा स्वच्छ असून उष्णता कमी भासत होती. परंतु आतां दोनप्रहरीं आकाश साभ्र असतें त्यामुळें उष्मा फार होतो.

खासगी पत्रावरून असें समजतें कीं, रा. रा. रामचंद्र निळकंठ सब रजिस्टर व मनि आरडांचे एजंट यास नाशिक जिल्ह्याचे रजिस्टर साहेबांचे आ. हेडक्लार्क तारीख १८ एप्रील पासून तारीख १३ जूनपर्यंत नेमल्याचें समजतें; कारण कायमचे हेडक्लार्क सिक रजेवर आहेत.

म. चिचर्डीमन साहेब बहादूर जज्ज यांणीं रावबहादूर कृष्णजी विष्णु लिमये फर्स्टक्लास सबार्डिनेट जज्ज यांस आपले कामाचा चार्ज देऊन ते रजेवर निघून गेले; त्या जागीं मे. बोझांकेट साहेब ठाणें दि. जज्ज यांची नेमणूक होणार, अशी बातमी आहे. न्या. सि.

प्राप्तिरोक कर—सांप्रत नवीन बसलेला रुपयास अर्धा आण्याचा कर सांप्रतच या देशाचे स्थितीस अयोग्य, अन्यायाचा, राजनीतीस विरुद्ध, व राजाचे उत्पन्नाकडे पाहून स्वतंत्र बिन जरुरीचा आहे; अशा मुद्याचा अर्ज ता. १८ दिवशीं स्टेट सेक्रेटरीकडे पाठविण्याकरितां कलकत्याच लोकांनीं तयार केला. हजारों सह्या त्यावर होऊन तो अर्ज विलायतेस चालू झाला आहे.

जबलपूर जिल्ह्यांत एका एंजिनीयराला तांब्याची खाण, व ज्यांत रुपें मिश्र आहे अशी एक दुसरी शिशाची खाण अशा सांपडल्या विषयीं समजतें. यांत खरें काय आहे हें पाहण्या करितां तज्ञ शास्त्रीय मनुष्य नेहून. बरील धातूची परिक्षा होण्याची तजवीज होणार आहे.

खाणींचें मीठ—चंद्रपूर तालुक्यांतील कोळशाच्या शोधा साठीं नेमिलेल्या गृहस्थां पैकीं एकाचे लिहिण्या वरून असें समजतें कीं, या जिल्ह्यांत मिठाची खाण सांपडण्याचा संभव दिसत आहे. अद्यापि खात्री जोगें कांहीं नाहीं; पण परदेशांतील मिठाच्या खाणीचीं चिन्हें येथें जमत असून खारट माती पर्यंत प्रवेश झाला आहे. जर ही खाण हस्तगत होईल तर मिठाचे बाबतींत मध्य प्रदेशाचें दैव उदयास आलें म्हटलें पाहिजे.

आग. रा. रा. त्रिंबकराव दादा भिडे यांचे घरास थोडे दिवसां पूर्वीं आग लागून चौथा मजला खाक झाल्याचें आम्हीं मागें लिहिलेंच आहे. परंतु आज आणखी लिहिण्याचा प्रसंग आला, असो. पुनः ईश्वरी क्षोभानें त्याचे वाड्यास म्हणजे शेजारील वाड्यातील दुसरा मजला अगदीं खाक झाला. आश्चर्य वाटतें कीं, भिडे यांचे घरीं कांहीं कार्य असलें कीं, असा कांहीं भयंकर परिणाम होण्याचा कुळ धर्मच आहे कीं काय? कोण जाणें. असें सांगतात कीं, चिरंजिवाचें लग्न समारंभांत घराचे आढें मोडलें होतें. परंतु फारसें नुकसान झालें नाहीं व त्याच चिरंजिवाच गर्भाधानाचे आनंद समयीं आग लागून चांगले नुकसान झाली व कांहीं चोजवस्तही चोरीस गेली होती ती दैवयोगानें सांपडली ही ऋतुशांती झाली आणि हल्लीं भिडे यांचे कन्येचा विवाह होण्याचा निश्चय होऊन साहित्य तयार झालें आहे परंतु कुळधर्म घडविणे कार्य भागल्याचें नव्हें आहे ... कांचा ... लोकांमुळें गेले मंगळवारी पुनः आ... णें दुसरा मजला खाक होऊन सा... लच ... नेही उत्तम घाली होती. त्या समयीं शहरवासी ब्राम्हण लोकांनीं नगीं मंडळी तर खूप मेहेनत घेऊन आग विझविली आणि होती. मनुष्याचे श्रमाची अग्निनारायणास कांहींच करुणा न येतां जेव्हां महाराज चीन शोट प्रार्थना करावी लागली पुढें बंबही तावड तोब आला. व मे. खरसेटजी नसरवानजी पोलिस इन्स्पेक्टर व मि. विटूनी रामजी वगैरे हेडकांटर अधिकारी पुकारा होतांच येऊन दाखल झाले. मेहनतही खूपच केली शेवटीं ज्या वेळेस बंब आला त्या वेळेस बंबाची दुरुस्ती माहिती कोणास नसल्यामुळें थोडा अवकाश झाला. इतक्यांत इन्स्पेक्टर साहेब पुढें होऊन लागलीच तयारी करून सर्व शांती केली हें पाहून सर्वांस संतोष झाला परंतु आश्चर्य वाटतें कीं, आमचे शहर फौजदार अशा भयंकर प्रसंगींच कोणते कामांत असून आग विझल्यावर येऊन हजर होतात हें कांहींच समजत नाहीं. फौजदार साहेबांनी दुसरीच हें दुसरें उदाहरण सर्वांच्या दृष्टीस आलें आतां वरिष्ठ अंमलदार सदर स्टेशनांत असतांही फौजदार अशा कर्मीं दुर्लक्ष करून काळजी निरहित असतात, तेव्हां हेच जर स्वतंत्र असून वरिष्ठ नसते तर रयतेचा कोणता काळजीनें बंदोबस्त होऊन कसे श्रम घेत असतील हें उघड आहे. बरें फौजदार लक्ष पुरवीत नाहींत असें कां होईना!

परंतु हाताखालील लोकांनीं गळपटळ म करावी कीं काय? कारण या प्रसंगी इन्स्पेक्टर साहेब हें स्वतः मेहेनत घेतात असून हेडक्वाटराचेच अमलदार झटत होते तेव्हां फौजदारच जर वारंवार दुर्लक्ष करतील तर मग इतरांचा काय पाड आहे. तर यावरून वरिष्ठ अंमलदार लक्ष पुरऊन तजवीज करतीलच नाहीं पैक्षां आम्हास रिपोर्टर साहेबांस मात्र तसदी द्यावी लागेल.

काल रोजीं बाबाडिगरे यांचे सुनेनें टाकळीचे रस्त्यांत जंगाल तोलावीहिरीत जिव दिला. जिव देण्याचे कारणबरोबर समजत नाहीं. तथापि दिरानें गपाचीपि करून भाषण केल्याचा फार पुकारा आहे असें नाशिकवृत्तावरून कळतें.

## पत्रव्यवहार.

रा. रा. "वऱ्हाडसमाचार" पत्रकर्ते यांस

नि० नि० पुनर्विवाह सशास्त्र आहे किंवा नाहीं याविषयावर आज बहुत वर्षां पासूनचर्चा चालल्या आहेत. परंतु अलीकडे एक वर्षा पासून या प्रकरणीं इतका गवगवा चालला आहे कीं तो ऐकून कान तर किटे झाले, तथापि अद्याप त्यांचा निकाल झाला नाहीं. आणि नूतन् पुण्यास हे श्री शंकराचार्य यांच्यासमक्ष उभय पक्षीं वादविवाद झाला त्याचा ही शुद्ध परिणाम होईल असें संभवत नाहीं याचीं कारणें अनेक आहेत. एक तर श्रीशंकराचार्यांची अक्कल पासून अखेर पर्यंत कएतर्फी व पक्षपाती दृष्टि आणि दुसरें, त्यांचे आसपासचे व त्यांस सल्ला देणारे लोकही आण्णासाहेबा सारिखे हुशार विद्वज्जन शिरोमणी नहून अगदीं निरक्षरगती आहेत परंतु अशा आणीबाणीच्या प्रसंगीं ते आपला स्वभाव गुण टाकून पक्षपात करणार नाहींत असें वाटत नाहीं. कारण कर्त्यांचा वार सोमवार.

स्वामी हे जगद्गुरू असल्या कारणानें त्यांची सर्व शिष्यांवर समदृष्टी असावी असें असून उलट प्रकार दृष्टी असावी असें असून उलट प्रकार दृष्टीस येतो. कित्येक हलकट अप्रयोजक, ढोंगी लोक स्वामीची खुशामत करितात तेणें करून स्वामी खूष होऊन त्यांस आपले एकाचे बालकरून

ठवितात. आणि त्यांचीं किती हो महत्वात कें असलीं तरी तीं स्वामींच्या दीर्घदृष्टीम ध्यें कोणत्या कोपऱ्यांत लपून राहातात हें कोणास समजत देखील नाहीं. परंतु वे० स० कृष्ण शास्त्री चिपळूणकर यांस मे० ग्रांट साहेब मुंबई इलाख्याचे माजी डायरे क्टर यांचे बगल्यांत फक्त फळें खाल्याबद्दल प्रायःश्चित पांचशें रुपयांस खरेदी करावें लागलें. तस्मात् ज्या आगगाडीमध्यें महा र मांग सुद्धां लेटून बसतात त्या ठिकाणीं दशम्या लोणचें वगैरे खाणें किंवा रजस्व ला स्त्री असतां तिशीं गमन करणें आणि तोच विटाळ सर्व घरभर पसरणें वगैरे अने क भ्रष्टाचार स्वामींच्या दृष्टीस येत नसतील किंवा कसें होत असेल तें असो. कदाचित् "दाम करी काम" असें तर होत नसेलना? अथवा दृष्टीस न पडल्यामुळें तसें करणारास योग्य शासन करण्यास सवड सांपडली नसेल. तर हें ही म्हणणें सयुक्तिक दिसत नाहीं. कारण कीं असें न होऊं देण्याविष यीं स्वामींकडूनच बंदोबस्त असला पाहिजे म्हणजे ज्याप्रमाणें हल्लीं इंग्रजी राज्यांत कोठें कोठें डिटेक्टिव्ह पोलिस आहे त्याप्र माणें स्वामींनींही आपणाकडून ठिकाठि काणीं गुप्त हेर ठेविले पाहिजेत अथवा अशा च प्रकारची दुसरी कांहीं तरी योजना केली पाहिजे म्हणजे अंशतः बराच बंदो बस्त होण्याचा संभव आहे.

आतां पुनर्विवाहासंबंधानें उभय पक्षां वर समसमान दृष्टी ठेवून वादाचा निर्णय व्हावा म्हणून खरोखरी निष्पक्षपाती लोकां नीं व सर्व वर्तमानपत्रकर्त्यांनीं स्वामींस सूच ना रूप पुष्कळ हांका मारिल्या. त्या सर्व व्यर्थ जाऊन त्यांचे श्रम वाया गेले हें उघड आहे. स्वामींच्या दयार्द्र हृदयावर त्याचा कांहींच ठसा उमटला नाहीं हें पाहून फार खेद वाटतो. हा वाद घडून येण्याचे पूर्व दिवशींच वे० शा. विष्णु शास्त्री पंडित यांनीं स्वामींची भेट व्हावी म्हणून स्वामींस विनंतीपत्र पाठविलें होतें. परंतु वादाच्या पूर्वी भेटीस न येण्याची इच्छा स्वामींनीं दर्शविली वाहवारे न्याय!!! एकूण स्वामी पाशीं योग्य मिळतो हें पाहून खाचित मति दंग होते. अशा योगानें स्वामींचे गादीस उत्तरोत्तर लोक किती पूज्य मानीत जातील याचा स्वामींनींच विचार करावा. आतां पुनर्विवाहा च्या बाबतींत या वादानेंही जरी निर्णय झाला नाहीं तथापि इतकें खाचित आहे कीं, आतां पुष्कळ लोकांची त्याच्या सशास्त्र तेविषयीं खात्री झाली आहे. म्हणून शें कडा पाऊणशें पुनर्विवाहपक्षास अनकूल असावेत असें अनुमानावरून सिद्ध होतें. विस्तार भयास्तव पुरेंकरितो कळावें. ता० २९ एप्रिल.

(पुढें चालू)

धारकर.

## जाहिराती.

**नो**टिस भिकलिंग वल्लद नामलींग जंगम रहाणार बोरी नजीक दारव्हें तालुके मजकूर जिल्हा यवतमाळ यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं आमचा जांवई असून तुला मा झी मुलगी गिरजा ही दिली आहे यास ती आपल्या पणांत आली असून तूं आज सुमारें सहा वर्षें झालीं परंतु जग रीतीप्र-माणें पाळण करीत नाहींस आणि नांदवि तही नाहींस. व आज एक वर्ष झालें आ पण जातीं भ्रष्ट होऊन तेल्याचे जातींत मिसळलास. करितां या नोटिसीवरून तु ला असें कळवितों कीं तूं बाटण्याचे पूर्वीं चीं वर्षें न पोसल्यामुळें माझे मुलीचें संगोपान करणें मला भाग पडलें सबब त्यास जाहाले ला खर्चाचा अंदाज रुपये ३०० ह्या ता रखेपासून पंधरा दिवसांत देऊन आमची पावती घ्यावी. असें न केल्यास दिवाणी मा र्फत तजवीज करून नोटिसीमुद्धां खर्च भरून घेऊं व तूं धर्मभ्रष्ट झालास या कार णानें मुलीसही दुसरा नवरा करून देणें जरूर आहे. आतां तिजवर तुझा अर्थाअर्थी संबंध नाहीं हें ह्या नोटिसीवरून कळवि तों. ह्या बद्दल तुला कांहीं कळविणें अस ल्यास सदरील मुदतीचे आंत कळवावें. व मुदती नंतर तुझें कोणतेंही म्हणणें मान्य होणार नाहीं. तारीख ६ माहे मे सन १८७० इसवी.

[ सही ] गोरखलिंग वल्लद रगुनाथलिं ग जंगम रहाणार खडीधामणी ता लुके नासीम जिल्हा मजकूर.

## जाहिरात.

### कवितासारामृत

अथवा

महाराष्ट्र भाषेच्या कवितांतील वेचे.

**स**र्वत्रांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं; वरील नावाचा ग्रंथ आम्हीं तयार क रून अकोलें येथें वऱ्हाड समाचार छापखा-न्यांत सुंदर टाईपांवर छापवीत आहों. सद-र्हू ग्रंथांत वामन पंडित, मोरोपंत अनंत क वि आदि करून कवींच्या कविता फारच सुर स, व मनाल्हादक अशा आहेत. तर सर्वत्र देशबांधवांनीं यांस उदार आश्रय द्यावा. आ णि हा ग्रंथ घेणारास सुलभ पडेल म्हणून ह्याची किंमत फारच थोडी ठेविली आहे. आगाऊ मे महिन्यांच आंत देणारास ८१२. फक्त सही देणारास ८१४ आणे. आणि मा गाहून ग्रंथ तयार झाल्यावर देणारास १ रु पया पडेल याशिवाय टपाल खर्चाबद्दल दो न आणे पडतील याप्रमाणें किंमत ठेविली आहे. तिकिटें पाठविणारांनीं अर्धआणे दराची वर्ताळ्यासह पाठवावीं. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं सदर्हू ग्रंथ रा. रा शिवचंद बलदेवभाई मारवाडी दुकान भ डगांव यांजकडे मागितला असतां मिळेल. तारीख २० माहे एप्रिल सन १८७०

( सही ) श्रीधर नारायण भडगांवकर जिल्हा खानदेश.

## विकावयाचीं पुस्तकें.

कायद्या संबंधीं.

| | रु० आ. पै. |
|---|---|
| पिनलकोड १८६०चा ४५ | २—०—० |
| नादारीची रुळ .... | ०—६—० |
| पोलिसाच्या रुळी .... | ०—[illegible] |
| मुं. इला. मुलकी सर्कुलरें .... | ४—[illegible] |
| स्माल. को. आक्ट १८६५चा १ | ०—[illegible]—० |
| पैंशाचा आक्ट १८६५चा १ | ०—४—० |
| फौजदारी गुन्ह्यांची जंत्री .... | ०—३—० |

पोथ्या वगैरे.

| | |
|---|---|
| अध्यात्मरामायण .... | ४—०—० |
| व्रत कौमुदी .... | ०—१२—० |
| प्रायश्चित्तेंदुशखर .... | ०—१२—० |
| नृसिंहचंपू .... | ०—४—० |
| धर्मसिंधू .... | ३—४—० |
| धनंजय विजय काव्य .... | ०—४—० |
| अमरकोश सटिप्पण .... | १—९—० |
| रामनवमी व्रतोद्यापन कथा .... | ०—२—० |
| अनुस्मृती. .... | ०—३—० |
| भक्तिवस्तवराज. .... | ०—२—० |
| अपरोक्षानुभूती. .... | ०—३—० |
| संस्कृत आरत्या. .... | ०—२—० |
| प्राकृत आरत्या .... | ०—१—० |
| पंचरत्नीगीता सोवळ्याचे बांधणीची. | १—४—० |
| रूपावळी. ... | ०—२—० |
| समासचक्र. .... | ०—२—० |
| शिवकवच. .... | ०—२—० |
| पांडुरंग महात्म. .... | ०—८—० |
| चमत्कार चिंतामणी. .... | ०—१३—० |
| बभ्रुवाहन आख्यान. .... | ०—३—० |
| मंत्र मालिका. .... | ०—४—० |
| काशीप्रकाश. .... | ०—१२—० |
| गायन प्रकाश. | ०—४—० |
| सौभाग्य रत्न. | ०—३—० |
| सामुद्रिक लक्षण. .... | ०—८—० |
| हिंदुस्थनी एकादश स्कंध | १—०—० |
| शिवलिलामृत उत्तम. .... | १—१०—० |
| ,, दुसरी. .... | १—४—० |
| संतलीलामृत. .... | २—८—० |
| विवेक सिंधू. .... | ०—८—० |
| दासबोध. .... | ५—०—० |
| चतुश्लोकी भागवत. .... | ०—४—० |
| कर्मविपाक. .... | ०—४—० |
| एकनामामृत. .... | ०—४—० |
| व्यंकटेश स्तोत्र. .... | ०—१—० |
| पंचायतन नामावली. .... | ०—३—० |
| शिवसहस्र नामावली. .... | ०—३—० |
| ध्रुवचरित्र. .... | ०—१—० |
| भजन. ... | ०—१—० |
| चक्रव्यूह. ... | ०—१—० |
| रत्नमाला भास्कर दामोदर कृत | ०—६—० |
| सत्यनारायण व्रत कथा प्राकृत | ०—४—० |
| भुपाळ्या. ... | ०—१—० |
| धावे. .... | ०—१—० |
| हरिपाठ. .... | ०—१—० |
| अमृतरावाचे कटाव शुकरंभा चरित्र | ० ४—० |
| नलाख्यान. ... | ०—३—० |
| आर्या मोरोपंती उद्योग पर्व. | १—८—० |
| ,, ,, वनपर्व. | १—८—० |
| ,, ,, द्रोणपर्व. .... | २—०—० |
| ,, ,, मंत्ररामायण. | १—८—० |
| वामन पंडितकृत श्लोक संग्रह भाग पहिला. | ०—१२—० |
| सदर्हू भाग दुसरा. | ०—१२—० |

वाचन संबंधीं.

| | |
|---|---|
| हिंदुस्थानी वेताळ पंचविशी. | १—०—० |
| ,, सिंहासन बत्तिशी. | १—०—० |
| मराठी वेताळ पंचविशी. .... | ०—८—० |
| चमत्कारीक गोष्टी. ... | ०—८—० |
| बहारदानीष भाग १ .... | ०—८—० |
| ,, भाग २. .... | ०—८—० |
| रुक्मिणी हरण नाटक. .... | १—८—० |
| हरिश्चंद्र नाटक. .... | १—०—० |
| विराटपर्व नाटक. .... | १—०—० |
| विक्रमोर्वशी नाटक (संकृत) | ०—८—० |
| बालीवध नाटक. .... | ०—६—० |
| आगगाडीचें नाटक. .... | ०—५—० |
| इंग्रजांची बखर. .... | ०—६—० |
| वसंतमाला. .... | १—४—० |
| सर्वपरिज्ञान. .... | ३—०—० |

मुलांकरितां पुस्तकें.

| | |
|---|---|
| बालज्ञान. .... | ०—२—० |
| इंग्रजी पहिलें पुस्तक उच्चार व अर्थ सहीत. .... | ०—०३ |
| भुगालविद्या. .... | ०—२—० |
| बालव्याकरण. .... | ०—०—९ |
| अंक लिपी .... | ०—१—६ |
| तोंडच हिशबाचीं पुस्तकें .... | ०—१—६ |
| किस्सा मांढीचा. .... | ०—०—६ |
| ,, बाळबोध. .... | ०—०—३ |

☞ हीं पुस्तकें रोख किंमतीस वऱ्हाड समाचार छापखान्यांत विकत मिळतील. बाहेरगांवचे घेणारांस डाकहाशील शिवाय पडेल.

## जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें या सालचीं म० ग० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्री सा ठीं आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ८३ आणे.

| किंमतीचे ठराव. | रु | आ. |
|---|---|---|
| वर्षांची आगाऊ देणारास... ... | ६ | ० |
| साल अखेर ... ... ... | ७ | ० |
| सहा महिन्याची आगाऊ ... ... | ३ | ८ |
| एक अंकास ... ... | | ५ |
| फुटकळ ... ... ... | | ३ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ अंकबद्दल टपाल खर्च आगाऊ पडेल तो १ रु. ४ आणे व सालअखेर १ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून १ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्याचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होऊन तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

**नोटिसा वगैरे छापण्याचे दर.**

१० ओळी पर्यंत... ... ... १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ८१८६
इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ८४

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

**सूचना**—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लि हिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यां चीं व गावांचीं नावें तरी बालबोध असा-वीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाब दारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आ म्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केलें त्यास अडीच वर्षें होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणी दारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्र तेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हि ला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं-

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंद करून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बा की येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धे आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छा. प्र. केलें.

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

AKOLA :—SATURDAY EVENING, MAY 14· 1870 NO. 20

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख १४ माहे मे. सन १८७० इ० अंक २०

## कृष्णशास्त्रीचिपळोणकर.

हे गृहस्थ महाराष्ट्र देशांत सर्वत्र ख्यात आहेत. यांची विद्या, बुद्धिकौशल्य, कोटिक्रम व विच्यार फार उत्तम असें सर्वांस ठाऊक आहे. दुनियेंत असा एक नियम दिसतो कीं, विद्वान व थोर लोक जें करितात तें सुयुक्त होय व तसें आपण करावयास झटावें असें सर्व सामान्य प्रतीच्या लोकांस वाटत असतें, पण कधीं कधीं नमुन्याच्याच थोर लोकांनीं कांहीं अयुक्त केलें तर लोकांनीं तो घाणेरा नमुना घेऊं नये हें सांगण्याचा आमचा आजचा उद्देश आहे.

रा. रा. कृष्णशास्त्री चिपळूनकर यांजवर आलीकडे असा एक दोषारोप आला होता कीं, त्यांनीं ग्रांट साहेबांच्या टेबलावर दुधाचें बर्फ, सुंठीचा पाक वगैरे कांहीं अभक्ष्य भक्षण केलें. व त्याकरितां धर्मसभेनें त्यांस बहिष्कृत केलें होतें. पुढें पुण्यास शंकराच्यार्य आल्यावर शास्त्री बावांनीं त्यांस विनंतीपत्र लिहिलें कीं आपणास अनुताप झाला आहे, व स्वामी आज्ञा करितील तें प्रायश्चित घेण्यास व ब्रम्हदंड देण्यास आपण पाहिजे तेव्हां तयार आहो. नंतर स्वामींनीं त्यांस सुमारें पाचशे रुपये पर्यंत खर्चाचें प्रायश्चित्त व दंड वगैरे सांगून त्यांच्या मिशा काढविल्या व त्यांस दोषमुक्त केलें.

अहाहा!! कृष्णशास्त्रीबावांचें काहें कृत्य! हे शास्त्री जुन्याकाळचे केवळ रामोहरिवाले किंवा हातावर पुराण्या शालजोडीची घडी उडविणारे नव्हत. यांस इंग्लिश भाषा उत्तम येतें, आली कडील विद्वानांत यांची चांगली मान मान्यता आहे, व इंग्लिश सरकारानें यांची हुशारी पाहून तीन च्यारशे रुपये पगाराचा यांस मोठा हुद्दा दिला आहे इतकें सर्व असतां व दोषारोपाचाही नुसता संशय असतां शास्त्री बावांनीं भित्रेपणानें प्रायश्चित घेतलें व मिशा काढवून आपलें रूप घाणेरें केलें हें त्यांस किती वाईट आहे! आम्हांस वाटतें कीं कांहीं प्रापंचिक लाभाच्या दृष्टीनें त्यांनीं हें करून जुन्या लोकांत शुध्धी मिळविली परंतु अशा सुधारल्या काळांत त्यांच्या सारख्या सुज्ञांनीं असें केलें हें सर्व देशहितेच्छु लोकांपुढें त्यांनीं आपणास चिरकालिक कलंक लावून घेतल्या प्रमाणें आहे.

शंकराच्यार्यापुढें कृष्णशास्त्रीयांची जबानी झाली तींत त्यांस प्रश्न होता कीं जर तुम्हांस अनुताप झाला आहे तर आतां ग्रांटसाहेबांचे टेबलावर तुम्ही जें जें कृत्य केलें तें तें सर्व सांगा. त्यावर आमचे प्रायश्चित्तानें पवित्र झालेल्या शास्त्रीबावांनीं उत्तर दिलें कीं मला आठवण नाहीं. वा:! काय खासें उत्तर हें! दुसरा एक त्यांस प्रश्न होता कीं पुढें असें न करण्याविषयीं तुम्हीं काय नेम करितां? शा. बा. म्हणाले कीं आतां तसें करण्याची माझी इच्छा नाहीं हाच नेम. वा:! काय खासा नेम! उत्तम हायकोर्टाचे जाबजबाब हे! आमच्या ज्ञानप्रकाश बंधूच्या म्हणण्याप्रमाणें हें भातुकलीचेंच कोर्ट खरें, व ती भातुकली खेळणारे आमचे शास्त्रीबावाही उत्तम लेकरूख रे! असें कृत्य त्यांचें त्यांसच शोभो जाणे. पुनर्विवाहासारख्या योग्य, आवश्यक, व देशसुधारक कृत्याचा पुढारीपणा घ्यावयास त्यांनीं डरावें आणि बर्फ वगैरेच्या चकल्या खाल्याबद्दल शंकराच्यार्यांस शरण जाऊन दंड द्यावा व मिशा काढाव्या ही शोभा खरोखरच अपूर्व होय. व ही विष्णुपंत रानडे, भिडे, पंडित वगैरेस दुर्मिलही होय. हें त्यांच्या कृत्याचें त्यांस फळ आहे.

शाबास! पुनर्विवाहाचे सात जण पुढारी हो, तुमची शाबास! तुम्हीं आरंभलेल्या सत्कृत्यास ईश्वर दिवसानुदिवस यश देत आहे. व तुमचा त्या कामीं दृढनिश्चय आहे तेव्हां सदरील प्रमाणें मिशा काढण्याचा वगैरे लाजिरवाणा व फजितीचा सोहळा तुमचा होणार नाहीं. विधवांस दु:खसागरांतून वर काढण्याचे तुमचे प्रयत्न आहेत तर तत्संबंधी पुण्यानें तुम्हांस अनंत सहाय हळुहळु मिळेल. व जुन्याची किरकीर संपून नव्यांचा लाभ तुम्हांस होईल. अस्तु.

शास्त्रीबावा प्रायश्चित न घेते तर त्यांस केवळ वाटलेल्यासारखें एकलकोंडे राहावें लागतें असें नाहीं; कारण त्यांवर अपराधाची शाबिदी नव्हतीच, म्हणून सशास्त्र पुनर्विवाहपक्षाकडे मिळण्याची ते इच्छा दर्शविते तर त्यांस मार्ग न निघता असें नाहीं. परंतु सडकेचा राजमार्ग टाकून गल्लीकुचचिा आड रस्ता त्यांस आवडला तेव्हां ही त्यांच्या इच्छेचीच गोष्ट आहे खरी तथापि सार्वजनिक म्हणून लोकांच्या नव्या दृष्टीनें टीकेस पात्र आहे यांत संशय नाहीं.

———o———

### नाशिकचे मि० ओव्हन साहेब व त्यांनीं केलली फिर्याद.

हे कामदार पुणें जिल्ह्यांत फार प्रसिद्ध आहेत. यांनीं तालुक्या तालुक्याच्या ठिकाणीं सडका, विहिरी, पूल, बाजार, पुस्तकालयें, कापसाची वृद्धी इत्यादि बहुत लोकोपयोगी कामें केलीं आहेत व नाशिक हा स्वतंत्र जिल्हा होतांच तेथील कलेक्टरीचें काम यांस मिळालें तेव्हां तेथेंही त्यांनीं बहुत सुधारणा करून शहरास उत्तम शोभा आणिली. या बद्दल त्यांची स्तुती करणें योग्य आहे परंतु त्यांसंबंधानें त्यांच्या फिर्यादीची एक गोष्ट आम्हीं आतां सांगणार आहो ती तशी वर्णनीय नाहीं या बद्दल वाईट वाटतें. तथापि ती सांगितली पाहिजेच.

मि० ओव्हन साहेबांनीं शहरसुधारणे करितां जो खर्च केला तो जरा फाजिल झाल्याचा बोभाट झाला. तेव्हां लोकांच्या पैशाचा व्यय कसा होतो हें लोकांस पहाणें अवश्य म्हणून तेथील जिल्हा असोसिएशन सभेनें त्यांस एक दोन पत्रें लिहून त्याविषयीं माहिती मागितली असतां त्यांनीं दिली नाहीं. पुढें असोसिएशननें त्या बाबदींत सरकारांत लिहिल्यावरून, ओव्हन साहेबांस वाईट वाटण्याजोगें तिकडून कांहीं लिहून आलें म्हणतात व तेव्हांपासून असोसिएशनचे सेक्रटरी रा. रा. श्रीधर बापुदेव टकले इनामी जहागिरदार यांजवर त्यांची वक्रता झाली असें ऐकतों. इतक्या सुमारांत साहेब मजकुरावर त्यांच्या दोषारोपणाचा एक निनावी अर्ज झाला व मग त्याचा बनविणारा शोधण्याची खटपट सुरू झाली ते पाहून टकले यांचे कोणी दुस्मानांनीं त्यांचें नाव साहेबांस सांगितल्यावरून तें किटाळ टकले मजकूर यांजवर आलें होतें परंतु टळलें. पुढें त्यासंबंधानें त्यांच्या घराचा झाडा घेतला त्यांत त्यांनीं इंदुप्रकाशांत एक पत्र छापावयास पाठविलें होतें त्याची नक्कल सापडली व त्यावरून साहेब बहादुरांनीं टकले याजवर अब्रू घेतल्याची फिर्याद हुजुरडिपुटी माजिस्ट्रेट यांजकडे केली व त्यांनीं सेशनांत तो मुकदमा कमिट केला. व सेशनजज मि० बोझांकेट साहेब यांनीं त्याची चौकशी करून श्रीधरपंतास १०० रुपये दंड केला. तो देऊन त्यांनीं हायकोर्टाकडे अपील केलें होतें. त्याचा नुकताच निकाल झाला कीं आरोपितावर गुन्हा शाबिद नाहीं सबब घेतलेला दंड परत द्यावा. असा ओव्हन साहेबांच्या फिर्यादीचा अखेर निकाल झाला.

यावरून आम्हांस कांहीं विच्यार सुचतात ते असे:—

कांहीं काम छानदार दिसावयासाठीं व तें करण्यानें आपली कीर्ति होण्यासाठीं जो कोणी पैसा खर्च करितो तो जर त्याचा स्वतांचा आहे तर त्याविषयीं तो पाहिजे तसा खर्च करण्यास मुखत्यार आहे परंतु पैसा लोकांचा व कामही समाजाचें आहे तर कोणी एक व्यक्ती तो पैसा उधळून टाकण्यास मालक नाहीं. या न्यायाप्रमाणें पाहिलें म्हणजे मुनसिपाल कमिटीचा पैसा हा लोकांचा होय.व तो आपले इच्छे प्रमाणें खर्च करण्यास मि० ओव्हन साहेब यांस अधिकार नव्हता व त्यांनीं या कामीं जपावयाचें होते व आपणावर लोकांच्या तक्रारी होऊं द्यावयाच्या नव्हत्या, हें त्यांच्या हुशारीस योग्य होय, पण तें कसें घसरलें कोण जाणे.

दुसरी गोष्ट, जिल्हा असोसिएशन हें एक लोकसत्तात्मक संस्थान आहे व इंग्लिश सरकारांत त्याची मोठी अब्रू आहे व या गोष्टीस मि० ओव्हन साहेब अजाण असावे असें सहसा वाटत नाहीं असें असतां त्यांच्या एकाहून अधिक पत्रांस मि० ओव्हन यांनीं जुमानिलें नाहीं हें त्यांचें धाडस विलक्षणच दिसतें. आणि जर असें आहे तर त्यांस देशसुधारणुकीच्या कृत्यांत अशा कृत्यांचा संक्षेप कां तें आम्हांसें कळत नाहीं. व ही गोष्ट त्यांच्याकडून कांहीं तरी अन्य कारणानें गेली असें आम्हांस वाटतें.

तिसरें, टकले यांजवर त्यांनीं जी फिर्याद आणिली होती व जिजवरून सेशन जजनीं टकले यांस दंडही केला होता ती करण्यानें त्यांनीं वर्तमानपत्रांत मजकुर लिहिणारांची मोठीना उमेद व्हावी व त्यांस भय प्राप्त व्हावें अशी संधी आणिली होती परंतु न्यायी हाय कोर्टांत तें त्यांचें करणें नांदलें नाहीं व झालेली शिक्षा रद्द झाली हें फार चांगलें झालें. आम्हांस वाटतें कीं मि. ओव्हन साहेबांमध्यें देश सुधारणेचा कल चांगला आहे पण सर्व प्रकारच्या गोष्टींत त्यांनीं विच्यारपूर्वक वागून चांगल्याचीच वृद्धी होईल तेवढें करावें म्हणजे त्यांची कृत्यें सर्व प्रकारें स्तुती करण्यास पात्र होतील, नाहीं पेक्षां त्यांत न्यूनता राहील व ती चांगली नाहीं असा आमचा अभिप्राय आहे.

## गणेशशास्त्री यांवरील फिर्यादीचा फैसल.

गुदस्त सालीं पुनर्विवाह प्रकरण उपस्थित झालें तेव्हां पासून रा० रा० गणेश शास्त्री मालवणकर हें नाव लोकांचे कर्णीं येण्याची सुरुवात झालीं, पुनर्विवाहाचे विरुद्ध पक्षीं घरचे प्रपंच्याप्रमाणें ते झटत होते. मुंबईच्या हिंदु धर्म सभेचे अग्रणी हे होते. पुनर्विवाहोत्तेजक मंडळीचीं व यांचीं भांडणें होऊन यांनीं फौजदारींत फिर्याद केली होती, बहुत लोकांस पोकळ बहिष्कार यांनीं घातले होते, व लोकांनीं त्रासून यांत ही बहिष्कृत केलें होतें, इत्यादि गुणविशिष्ट गणेश शास्त्री मालवणकर यांनीं पुण्यास शंकराच्यार्य आल्याची संधी पाहून आपला डेरा तेथें उभारला. पुढें वाद झाल्यावर व शंकराच्यार्यांनीं पुनर्विवाहाविरुद्ध निर्णय दिल्यावर तर यांस केवळ स्वर्ग, ठेंगणा झाला. सर्व लोकांस निर्णय सांगण्याचे सभेचा बेत तुळशी बागेंत करविला होता पण शास्त्री बावांस त्या दिवशीं जें सुरस व्याख्यान द्यावयाचें होतें त्यास तेथें उत्तेजक पक्षाचे लोक येऊन कांहीं हरकत करितील म्हणून तुळशी बागेंतील सभेचा बेत मोडून, शंकराच्यार्यांचे राहते ठिकाणीं सभा करविली व तेथें गणेश शास्त्री एका मोठ्या व उंच टेबलावर उभे राहून व आपण दिग्विजयी झालों आहो असें मनांत आणून मनसोक्त बडबडले. यांच्या भाषणास आम्ही बडबड म्हणतो यांचे कारण आम्ही तें भाषण पुण्यास समक्ष ऐकिलें आहे व ते बोलत असतां नोट बुकावर टिपून घेतलें आहे. व गेल्या महिन्याच्या ३० ते तारखेच्या वऱ्हाडस

माचारांत तें छापिलेंही आहे त्याकडे आमचे प्रिय वाचक आणखी एकवार लक्ष देतील तर बरें होईल. असो, तें भाषण पाहिलें म्हणजे त्यांत त्यांचा खासगत द्वेष अथवा दुष्टबुध्धी असावी असें सहज अनुमान होतें. गणेश शास्त्री यानीं आपल्या संभाषणांत रा. नारायण बापुजी गोरे यांची निंदा केली व वे. शा. सं. रा. व्यंकटशास्त्री माटे यानींही गोरे यांच्या विरुध्ध एक जाहिरखबर छापलेली त्याच बैठकीस प्रसिध्ध केली. त्यावरून गोरे यांनीं माटे व मालवणकर या उभयतांवर अब्रू घेतल्याबद्दल डा. फ्रेजर रेलवे माजिस्त्रेट यांजकडे फिर्याद केली. तिची चौकशी होऊन अखेर व्यंकटशास्त्री माटे हे फार वृध्ध सबब त्यांस सोडून दिलें व गणेश शास्त्री मालवणकर यांस ३२ दिवसांची साधे कैदेची शिक्षा दिली.

आम्हांस वाटतें कीं गणेश शास्त्री यांचें कृत्य शासनार्ह जरी आहे तरी त्यांस ही शिक्षा फार जरब झाली. अस्तु. स्वधर्माचें म्हणजे सर्व लोकांचें काम असतां त्यांत या शास्त्री बावांनीं खासगी नात्यानें अंमल केला व उत्तेजकांस पीडा दिली एतन्निमित्त त्यास हें शासन झालें हा विचार मनांत आणिला म्हणजे सत्याचा [पु० वि०] जय दिसतो.

गणेशशास्त्री यांनीं शिक्षेचा हुकूम होण्याबरोबर अपिलाचा अर्ज दिला व जामिनावर खुले राहिले. या कज्जांतील डा. फ्रेजर साहेबांचें मिनिट मुंबई ग्याझेट पत्राच्या ११ व १२ तारखेच्या अकांत सविस्तर छापून आलें तें पाहण्याविषयीं आम्हीं इंग्लिश वाचकांस शिफारस करितों.

## वऱ्हाड.

मि० जे आर बेल फर्स्ट ग्रेड आसिस्टंट इंजिनियर यांस उमरावती रेलवेकडे नेमिलें व ते गेल्या महिन्याच्या १३ वे तारखेस बदनेऱ्यास येऊन आपलें काम पाहूं लागले.

शिंध्रखेडचे स्कूलमास्तर रा० हरी नारायण गाडेक यांनीं संवादमंडळ या नावाचें नवें एक पुस्तक केलें आहे त्याच्या प्रती स्कूल लायब्रऱ्यास बक्षिस देण्याचा विचार करून ती देणगी स्वीकारावी ह्मणून त्यानीं मुंबई, नागपूर, व वऱ्हाड एथील डायरेक्टर साहेबांस विनंती पत्रें लिहिलीं आहेत. व ८०० बुकें बक्षिस देण्याचा त्यांचा इरादा आहे असें दिसतें.

दर्यापूर तालुक्यांत कारलें ह्मणून गांव आहे तेथील एका शिंप्याची सून उमरवर्षे १९ ची धामणगावच्या तिच्या मावस दिरानें काढून नेली होती त्या दोघांस पनज एथें पोलिस पाटलानें पकडलें व पुढें अकोटास चौकशी होऊन बापको नवऱ्याचे हवाली केली असें कळतें.

उमरावती- उन्हाळा तर अतिशय भासूं लागला आहे. सकाळचे ७ वाजल्यापुढें तर बाहेर पडण्याचा प्रसंग आला म्हणजे जिवावरची गोष्ट समजून बाहेर पडतात. दरसाल उष्णकाळामुळें कचेऱ्या सकाळपासून ११ वाजेतों पर्यंत करण्याची वहिवाट होती. परंतु यंदा तशी व्यवस्था झाली नाहीं. सर्व लोकांस सकाळचे दहा वाजतां जाऊन पांच वाजतां परत यावें लागतें. कचेरी गांवाचे पूर्वभागीं सुमारें २ मैलांवर असल्यामुळें जाणार लोकांस जातांनां व येतांनां तोंडावर ऊन घ्यावें लागतें यामुळें त्या लोकांस फार अडचण सोसावी लागते व उन्हाळा बाधून आजारी होण्याची भीति आहे. ईश्वरकृपेनें आजपर्यंत कोणत्याही रोगाचें प्राबल्य नाहीं. परंतु आकाश साभ्र असल्यामुळें रोग उद्भवतील असा रंग दिसतो परंतु तशी गोष्ट न होवो. स. प्र.

## अकोला.

उन्हाळा सुरू होऊन आगी लागण्याचे भयंकर प्रसंग लिहिण्याचा सालाबाद प्रमाणें आमचे कपाळीं हंगाम आला आहे. या बद्दल वाईट वाटतें. गेल्या आठवड्यांत दोन तीन ठिकाणीं आगी लागल्या व गेल्या बुधवारीं रात्रीं १० वाजतां शहरचे पश्चिमेस गावकुसुवाबाहेर कलालाचे घरास आग लागली, तेव्हां वारा ईशान्यदिशेस वाहात असून त्यास बराच जोर होता त्यामुळें व कलालाचे घरीं मोहाडी, मद्य, घास, कडबा, लाकडें वगैरे अग्निनारायणास यथेच्छ नैवेद्यास मिळाल्यामुळें त्या अमलांत त्यानीं बरीच गर्दी उडविली. गावकुसुवाचे आंत आला व ठिणग्या येऊन रा० रा० विष्णु सदाशिव क्लार्क यांचे नवे घरापुढें कुंभारांचीं व मुसलमानांचीं ९१६ घरें होतीं त्यांचा फडशा झाला. व एक रेडकू जळून मेलें. लोकांच्या मदतीनें विष्णुंत यांचें घर मोठ्या बशर्तीनें वाचलें. सरकारी अधिकाराचें वैभव फार मोठें आहे. पहा, गरीब लोकांच्या जळत्या ही घरावर कोणी पाण्याचा थेंब टाकिला नाहीं परंतु विष्णुंताचे गैरहजिरींतही त्यांचे घरावर व अंगणांतील गवतावरसुध्धां पाणी घालून लोक उभे होते त्यामुळें त्यास अग्निबाधा झाली नाहीं हें एक चांगलें झालें.

आम्हीं या प्रसंगीं मुनसिपाल कमिटीस, व पोलिसास विचारितों कीं अशा भयंकर प्रसंगीं आपण लोकांच्या जीवांचें व मालाचें संरक्षण केलें नाहीं तर आपण आहा ते कशासाठीं याचें एकवार कृपाकरून उत्तर द्यालतर फारबरें होईल. मेम्बरी, कारकून, शिपायी वगैरेंच्या गिरवणुकी मध्यें मुनसिपालिटीचे कामदार ओळखावे व काळ्या भव्य पोशाकावरून पोलिस ओळखावे पण यांपासून अशा प्रसंगीं उपयोग नाहीं तर हे व्यर्थ चित्रांतील बाहुल्याप्रमाणें पाहिजेत कशास? मुनसिपाल कमिटी कराच्या पैशाची लोकांपासून बरीच रक्कम वसूल करून घेते आणि आगी वाऱ्याकरितां एकदोन बंबही बाळगीत नाहीं, व पोलिस तर कधींकधीं घर जळून खाली बसे पर्यंत तिकडे ढुंकूनही पाहत नाहीं किंवा न पाहिल्यासारखें करतें याचें कारण काय? आम्हांस याचें कारण एकच दिसतें आणि तें हें कीं, हीं दोन्हीं इस्टाब्लिशमेंटें आपलीं कर्तव्यकर्में योग्य रितीनें बजावित नाहींत म्हणून हें सर्व नुकसान आहे. तर या गोष्टीवर त्यांनीं चांगलें लक्ष द्यावें व आग लागण्याचे प्रसंग टाळण्याच्या पूर्वील तजविजी व लागतांच शमविण्याचे योग्य उपाय त्यांनीं झटून करावेत हे फार चांगलें आहे.

एथील रेलवे रेसिडेंट इंजिनियर आफिसाकडील अकौंटंट रा. रा. बाळाजी केशव नगरकर यांस मुंबईस रेलवेच्या आडिट आफिसामध्यें १७० रूपये पगाराची पे क्लार्कची जागा मिळाली. व काल रोजीं ते तिकडे जाण्याकरितां एथून गेले हे हिशोबी कामांत हुशार आहेत व सवाशे रूपये पगारावरून त्यांस हीं बढती मिळाली हें पाहून आम्हांस संतोष होतो.

थर्डक्लास आस्पिटल असिस्टंट पी सी अयाकनू पंडाराम अकोल्याचा धर्मार्थ दवाखान्यांतील नेटिव डाक्टर यांस वरील प्रतीच्या जागेकरितां परिक्षा देण्यासाठीं औरंगाबादेस जाण्याचा हुकूम झाला.

कमिशनर साहेबांची स्वारी चिखलदऱ्याकडेच आहे व त्याचे क्लार्कही बुधवारीं एथून तिकडे गेले.

डिपुटी कमिशनर साहेब आपले क्लार्कांसह अकोटाकडे गेले आहेत.

अडगावचे इनच्यार्जएकस्ट्रा असिस्टंट कमिशनर रा० रा० रामराव गोविंद हे सुटींत एथें आले आहेत. तसेच इलिचपूर स्मालकाजकोर्टाचे क्लार्क रा. रा. गोपाळपंत भिडेही एथें आले होते.

## वर्तमानसार.

हिंदुस्थानाकरितां सोन्याचें नाणें कलकत्यास लवकरच पाडणार आहेत. त्याचा नमुना विलायतेहून येऊन दाखल झाला आहे.

होळकर सरकारांनीं इंग्लिश सरकारापाशीं मोजणीचें खातें मागितलें आहे. नागपूर प्रांतापैकीं मोजणीदार तिकडे पाठविणार व त्यांस खर्च होळकर सरकार देणार.

विद्या खात्याकडील कामदारांस ज्या जिल्ह्यांत नेमावयाचें त्यांतील देशभाषा त्यांस अवश्य येत असली पाहिजे अशा बाबें सरकारांत पत्रव्यवहार चालू आहे.

पंजाब प्रांतीं सतलज नदीवर रेलवेच्या पुलाचें काम चालू आहे. तो पूल ६१६७ फूट किंवा सवा मैल लांब आहे व त्यास मोठ मोठ्या ९८ कमानी आहेत त्याचें सर्व काम या सालअखेर पुरें होईल.

मि० गोविंद विठ्ठल करकरे बारिस्टर यांस काटेवाडांत गोंडल संस्थानावर जुडिशल डिपुटि सुप्रिंटेंडेंट नेमणार असें वर्तमान आहे.

रा० ब० गोरोबा कानोबा यांनीं भुलीबाई नांवाच्या विधवेशीं पुनर्विवाह केला ह्मणून त्यांच्या ज्ञातीच ह्मणजे पाठारे परभू जातीचे लोकांनीं त्या दोघांस व भुलीबाईचें कन्यादान करून देणार भगवंतराव दिनानाथजी यांस बहिष्कृत केलें आहे. व भुलाबाईची चुलत बहीण बेनाबाई हीं अजूनही त्यांच्याकडेस राहते ह्मणून तिलाही बहिष्कृत केलें आहे. व गोरोबा हे त्या ज्ञातीच्या असोसिएशनचे सेक्रटरी आहेत त्यांस त्या कामावरून काढण्याचाही विचार चालला आहे.

अशा पोकळ खटपटीस आमचे राव बहादुर किती जुमानितील तें उघड दिसतें.

करेन्सी खात्याकडील कामदारांस त्यांच्या कामाची खोटी होते सबब जुरींत नेमूं नये असा ठराव केला.

श्री० अण्णासाहेब आणि दादासाहेब विंचूरकर यांस निफाड, नांदगाव, बागलाण, चांदुर आणि सावरगांव तालुक्यांतील कांहीं गावांत क्रि० प्रो० का० क० ६६ प्रमाणें माजिस्त्रेटचा अधिकार मिळाला. ज्ञा.मं.

पुणें आतांशीं उन्हाळा चालू आहे तेव्हां ऊष्मा अतिशय होतो यांत आश्चर्य नाहीं. फारकरून रोगराईचा विशेष उपद्रव नाहीं. ज्ञा. च.

कलकत्याकडील डाका शहरच्या सरकारी दवाखान्यास जोडून एक मिडवाइफरीचा क्लास काढणार आहेत. या क्लासांत नेटिव लोकांच्या स्त्रियांस ठेवून त्यांस प्रसूतिसंबंधी दाईपणाचें काम शिकविणार आहेत इस्पितळांतील इन्स्पेक्टर जनरल यांनीं सरकारास अशी एक शिफारस केली आहे कीं प्रत्येक सिविल इस्पितळांतून एकेक पगारदार स्त्री असावी व स्त्रियांस औषधें देणें आणि त्या रोगाची चिकित्सा व विचारपूस करणें तसेंच त्यांच्या घरीं जाणें हें काम त्या स्त्रियांनीं करित जावें अशी तजवीज ठेवावी. सदरील दोन्ही गोष्टी आम्हांस उत्तम व फार आवश्यक दिसतात.

सोलापूर म्युनिसिपाल कमीटीनें हजारों रूपये खर्च करून तळ्यामध्यें पुष्कळ पाणी यावें या इराद्यानें नवीन खोडवीं बांधविलीं त्याप्रमाणें यंदा पाणी पुष्कळ आलें आहे.

लोकलफंडाकडे एक सर्व्हेअर २९० रुप यांचा नेमिला असें समजतें.

सालमजकुरची मक्केची यात्रा चांगल्या रितीनें शेवटास गेली यात्रेकऱ्यांत आणि तेथील सभोंवारच्या लोकांत आजार कसलाही उद्भवला नाहीं. यात्रा फार मोठी भरली होती, सुमारें दोन लक्ष असेल.

सोलापुर लहान मुलांस डांगे खोकल्याचा उपद्रव मनस्वी जाहाल्यामुळें तान्ही मुलें फार ग्रस्त झालीं आहेत.

हवा फार उष्ण झाली आहे उष्ण मापक यंत्रांत पारा शंभर अंश चढतो. तारीख ६ शुक्रवारीं रात्रीं १२ वाजतां मेघाच्या प्रजन्य होऊन पाऊण एक तास पडत होता.

सातारा—फारच गरम जाहाली आहे आकाश साभ्र असोन मेघ गर्जनाही आहे व पाऊस पडेल असें वाटतें. परंतु तो पडत नाहीं. शु० सू.

बंगाल्याचा खालचा भाग ज्यास लोअर बंगाल म्हणतात तिकडे पावसाची फार अप्रीति असल्यामुळें निळीचे पिकास धक्का बसला.

जयपुरच्या महाराजाचे दिवाण नवाब फौज अलीखान यांस सरकारानें स्टार आफ इंडियाच्या कंप्यानियनचा किताब दिला.

रा० दिनकर धोंडदेव दातार यांस मुंबईच्या हायकोर्टांत वकिली करण्याची सनद मिळाली.

नगरचे मि० रिचर्डसन साहेब रजा घेऊन विलायतेस गेले. व त्यांचे जागेवर ठाण्याचे मि० बोझांकेट जाऊन रुजू झाले.

We are glad to hear that Mr. Hari Narayan Modak has recently offiered to present 800 ccpies of his Sanwad Mandala to the Directors of Bombay, Berar and Nagpoor. The letter of his presentation is entirely quoted below.

To.
THE DIRECTOR OF
PUBLIC INSTRUCTION.
* * * *

Dated Akola 12th May 1870.
Sir.

I beg hereby to solicit your honour's kind permission to enable me on the receipt of your honour's reply in the affirmative to present to the Educational Department over which your honcur presides at present the ** hundred copies of the Sanwada Mandala (a small Marathi treatise edited by me.)

2 These hundrrd copies are specially presented for distribution among * * hundred School Libraries only one copy being intended for each of the said institutions.

3 This favourable intention of mine will I humbly hope, agree with your honour's educational consideration and affirmative answer.

I remain.
Sir.
your most obedent servant.
HARI NarayanModak.
Eng: Mar: Head School master Sindkhir, Maiker Talook.

## जाहिराती.

### गोपीचंद नाटक.

या नाटाचें हिंदुस्थानी भाषेंत व बालबोध लिपींत एक नवीन पुस्तक सोलापुरास रा. रा. अण्णाजी गोविंद इनामदार यांनीं तयार करून आपले कल्पतरु छापखान्यांत छापिलें आहे व त्याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. याची किंमत ॥=१२ बारा आणे व डाकहशील एक आणा आहे. पुस्तक नाटकाचें असून चांगलें सुरस आहे.

### फौजदारी काम चालविण्याविषयीं कायदा सटीक.

हें नव्या क्रिमिनल प्रोसिजर (सन १८६९ च्या ८ वे) कायद्याचें मोठें पुस्तक टीकेसुद्धां व त्यावरील हायकोर्टाचीं सर्क्युलरें, ठराव, व इतर ग्रंथकारांचे अभिप्राय यांसुद्धा रा. रा. नारायण बाळकृष्ण चितळे ऊर्फ रावजी भांजेकर ठाण्याचे वकील यांनीं तयार करून ज्ञानप्रकाश छापखान्यात छापिलें, त्याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. हें पुस्तक संग्रह करण्या लायक आहे. याची किंमत ७ रुपये व डाकहशील १ आणे पडतें.

नोटिस नेशनी रामशिंग व० धनसिंग राहाणार बाबूळगांव तालुके अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमची ज्वारी तुमचे येथें खासगत ठेविली होती. ती तीन ३ खंडी होती ती तुम्हीं आमचे जवळून सवाईने पेटगी घेऊन हंगामावर देण्याचा करार केला ती ज्वारी तीन खंडी व तीन सालची सवाई याप्रमाणें दीड खंडी एकूण ४॥ साडेचार खंडी ज्वारी येणें असून आजपर्यंत दिली नाहीं याकरितां नोटिसीचे तारखे पासून आठ दिवसांचे आंत उलगडा करून द्यावा. न दिल्यास सिरस्ते प्रमाणें तजवीज करून नोटिसीचे खर्चासुद्धा भरून घेतलें जाईल. तारीख ३० माहे मे सन १८७० इसवी.

[सही] परशराम वलद भगवान
पाटील बाबुळ गांवकर

नोटिस केशोरामराम जस साहुकार खामगांव यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यात येतेकीं, तुम्ही तारिख २४ माहे एप्रिल सन १८७० ची नोटिस दिली ती आम्हास वऱ्हाड समाचार पत्रांतून पावली त्याचें उत्तर—रुपये २६० हे आम्ही तुम्हा पासुन घेतले नाही व तुम्हिही आम्हास दिले नाहीं. सरकारी रुपये तहसिलदार साहेब तालुके बाळापुर यांनीं आम्हास जेनराव देशमुख खामगांवकर यांचे मारफत पंचाचे म्हणून दिले आहेत व त्यांचेच हुकुमावरून आम्ही पाच खंडी चणे फौजेकरितां बोलाविले आहेत त्याजबाबद विशेषही आम्ही त्यांत दिला आहे ते चणे फौज येण्याचे पूर्वीच येथे येऊन पडले आहेत परंतु जरूर न लागल्यामुळे खर्च जाले नाहित ते आमचेपाशी शिल्लक आहेत त्यास येकंदर खर्चातेचासुद्धां रुपये ६९।॥८६ लगत लागली आहे—याचा हिशेब तहसिलदार साहेब यांचें पाशी दिला आहे याजबद्दल तहसिलदार साहेब व पंच सांगतील तशी व्यवस्था होणे आहे—अगर पंचांनीं लगत दाम देउन चणे घेउन जावे सिरस्ते प्रमाणें आमचे वर जे नफा नुकसान येईल ते देऊ व घेऊ सबब तुमचे आम्हांस कांहींएक देणें नाहीं तुम्ही आमचेवर नोटिस कोणचे आधारे दिली हें कळत नाही परंतु तुमचे नोटिशी प्रमाणे आम्ही तुमचे कोणतेही प्रकारें जबाबदार नाही हें तुम्हास कळावें तारिख ९ मे सन १८७०

(सही) ताराचंद मुदडा दस्तुर
बचुलाल दुकान पेठ खामगांव.

नोटिस—अबदूल हुसेन उफरजी भाई बोहारी दुकान अकोले यास रामई जस टोरमल साहू दुकान अकोले याजकडून देण्यांत येते ऐशाजे तुम्हाकडोन आजरोजीं किकाभाई यांणीं आमचे दुकानीं येऊन रुपये ५०० ची नोट तुमचे खाते जमा करण्यात देऊन त्याची हुंडी मागितली हुंडीचा स्टांप शील्लक नत ल्यामुळें तो आणऊन चार घटकेनी हुंडी घेऊन जावी म्हणून सांगितलें नंतर कांहीं वेळानीं किकाभाई परत येऊन हुंडी मागितली तेव्हां खातेबाकी ७० रुपये ५ पांच आणे येणें आहे ते रुपये वजा जातां बाकी रुपयाची द्यावी म्हणून सांगितले असतां त्याणें हुंडी न घेता परत गेला सबब तुम्हास या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं, खातेबाकीचे रुपये ७० पांच आणे वजा जातां बाकी शिल्लक राहिलेले रुपये ४२९ अकरा ११ आणे तुमचे खाते जमा आहेत ते तुम्ही रोख न्यावेत किंवा हुंडी न्यावी दोहोंतून कोणतेंच न कराल तर सदर्हू जमा असलेले रुपयांबाबद व्याज वगैरे आम्हाकडोन मिळणार नाहीं हें तुम्हास कळविण्यास लिहिले आहे व ही नोटिस देण्याचें कारण तुम्हाकडोन झालें सबब ह्या नोटिसीचा खर्च तुम्ही चार दिवसांत पाठवून द्यावा न दिल्यास तो खर्च तुमचे नांवें धरला जाईल कळावें तारीख १४ माहे मे सन १८७० इ० मुक्काम अकोले.

(सही) रामजस टोरमल दस्तूर
हाजारीमल.

नोटिस—नासोबा तुकरी रहाणार अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे कडे आमचें खातेबाकी बद्दल रुपये २६० व शिवाय व्याज घेणें आहे तर तें आम्हीं बहुत वेळा मागितले असतां अद्याप दिले नाहीं सबब ह्या नोटिशीचे तारखेपासून ८ आठ दिवसांत मुद्दल व्याज व नोटिशीचे खर्चसुद्धां आमचे दुकानीं आणून द्यावे नाहींतर दिवाणी कोर्ट मार्फत तुमचे कडून घेण्यांत येईल कळावें तारीख १४ माहे मे सन १८७० इसवी.

(सही) शितराम सखाराम तळेकार.

नोटिस—संभाजी वलद महार राहणार देऊळगांव माळी हालीं मुकाम नागझरी बुद्रूक जागळीचें कामावर तालुके मेहेकर. यास खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुजकडे आमचे येणें रुपये हिशोब करून निघाले ते ७ सात यास व्याज दरमहा दर शेकडा २ रुपये प्रमाणें व शिवाय दाणे ज्वारी चार पायली हे वाढीसुद्धां येणे ते मागत असतां दिले नाहीस तर ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचें आंत सदरी लिहिल्याप्रमाणें हिशोब करून उलगडा करावा नाहीं तर दिवाणी मार्फत फिर्याद करून रुपये व दाणे घेतले जातील कळावें तारीख ९ मे सन १८७० इसवी.

(सही) रघुजी वलद भवानजी पाटील रहाणार देउळ गाव माळी.

नोटिस—कडव्या वलद लक्षुमण महार राहणार देऊळगांव माळी हल्लीं मुक्काम लोनाटी तालुके मेहेकर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुजकडे आमचे येणे हिशोब होऊन बाकी निघाली ती रुपये सवाएकुणतीस यास व्याज दरमहा दर शेकडा दोन रुपये प्रमाणें आहे ते रुपये अद्याप हिशोब करून दिले नाहींस, तर ही नोटिस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत उलगडा करावा न केल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून रुपये घेतले जातील कळावें तारिख ९ माहे मे सन १८७० इ०

(सही) रघूजी वलद भवानजी पाटील राहणार देऊळगांव माळी.

नोटिस गंगाराम वलद विठाबा शिंपी राहणार सुरजी, नजीक अंजनगांव तालुके दर्यापूर जिल्हा इलिचपूर यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, तूं मिति माघ शु० ५ रोजीं आमचे दुकानांतून किराणा माल दोनशें २०० रुपयांचा नेला व रुपये देण्याचा करार पंधरा दिवसांचा फेडीबद्दल केलास परंतु मुद्दत भरली तरी तूं रुपये दिले नाहींस व आमच्याकडेही आला नाहींस. त्याचप्रमाणें तुझा इनाई हणमंता शिंपी राहणार बेलखेडें याणें तुझे पूर्वींचे बाकीबद्दल ८० रुपयांचा पुरजा लिहून दिला व त्यांत मुदत शिफारशीची केली असून तीही टळली तथापि रुपये आले नाहींत करितां नोटिस देण्यांत येते कीं, नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत मालाचे रुपयांचा वगैरे एकंदर उलगडा करून खातें सफा करावें नाहीं तर कोर्ट मार्फतीनें हयराण करून घेण्यांत अर्थ नाहीं सबब नोटिशीनें कळविलें आहे. कळावें तारीख १२ माहे मे सन १८७० इ०

(सही) हिरप्रसाद बचुलाल साहू
दु० आकोली ता० अकोट.

## नोटिस.

रा. राजश्री रावजी नारायण देशपांडे बारामतीकर माजी असिस्टंट मास्तर इं. म. शाळा कसबे सिंधखेड यांस.

या खालीं सही करणार याजकडून देण्यांत येत आहे कीं अगष्ट सन १८६९ इसवी पैकीं तुमच्या १३ तेरा दिवसांच्या पगाराबद्दल दरमहा रु० २० प्रमाणें आकार रुपये ८ आणें ६ अक्षरीं आठ रुपये साहा आणें मेहेकरचे तहशील तिजोरींतून घेण्याविषयीं तुम्ही आमचे नांवानें अखत्यारपत्र लिहून दिल्यावरून राजश्री आपाजी नाईक सराफ सिंधखेडकर याजकडून सदरील रकम तुम्हांस देविली असून ती रकम अगष्ट महिन्याचे पगारांत आम्हांकडेस आली नाहीं. पुढें मशारनिल्हे सराफ यांचे रुपये आम्हास द्यावे लागले तेव्हां तुम्हास सदरील रुपयां विषयीं पत्र पाठविलें. त्या पत्राचा उत्तरांत तारीख १४ आकटोबर सन १८६९ इसवी रोजीं तुम्हीं लिहून पाठविलें कीं सदरील पगार मेहेकरचे तहशील तिजोरी मधें आहे व तहशिलदार साहेबांस तुम्ही पत्र देखील पाठविलें आहे म्हणून लिहिलें त्यावरून मेहेकरचे तहशीलदार यांस पत्र लिहितां त्यांचें उत्तर आम्हांस मिळालें नाहीं. शेवटीं असें समजलें कीं इतक्या उपर मेहेकरचे तहशिलदार याणीं तुम्हास तो पगार दिला आणि निःशंक पणानें तो सर्व तुम्ही पगार घेतला ही अपूर्व विश्वासाची गोष्ट झाली म्हणून ही नोटिस तुमच्या अखत्यार पत्रांत तुम्ही लिहिलेल्या पत्त्यावर टपालांतून रजिष्टर करून पाठविली आहे तरी या नोटिसीचे तारिख पासून दोन महिन्यांत या नोटिशीचे खर्चा सुद्धां सदरील सर्व रकमेचा फडशा करावा असें न केल्यास शिरस्त्या प्रमाणें तजवीज केली जाईल.

तारिख १३ मे सन १८७० इसवी. हल्लीं मुकाम आकोला.

हरिनारायण मोडक इं. म. हेड स्कुल मास्तर. कसबे सिंधखेड तालुके मेहेकर.

ताजाकलम....सदरील मुदतींत भले पणानें तुम्हीं रुपये पटविल्यास ठीक आहे. नाहीं पेक्षां कायदेशीर रितीनें रुपये

वसूल करून घेऊं व तुम्हीं सदरील कर्यांत जी दगाबाजी केली आहे ती देखील फौजदारी कोर्टा पुढें आणण्याची तजवीज करूं हें पकें लक्षांत ठेवावें. तारीख मजकूर.

हरि नारायण मोडक.

## नोटिस.

**पुर्वी मुबंईच्या नेटिवओपिनियन् पत्रांत** तारीख १२आगष्ट सन १८६८इसवीच्या छापलेल्या जाहिरनाम्याची पुरवणी.

(वडिलोपार्जित मागील पुढील धन द्रव्य ऋणादिकांशीं आणि त्या जाहिरनाम्याखालीं सही करणारा हरी नारायण मोडक याशीं अर्थाअर्थी कांहीएक संबंध त्या जाहिरनाम्याचे तारखेपासून राहिला नहीं इत्यादिक मजकूराचा जाहिरनामा मुंबईचे नेटिव ओपिनियन् पत्रांत छापून या पूर्वी प्रसिद्ध केला आहे त्याची ही पुरवणी असे)

## ताजाकलम.

**कलम १**—तीर्थरूप आणि मातुश्री घरची व्यवस्था पाहात आहेत तावत्कालपर्यंत किंवा पश्चात् त्यांच्या आज्ञापत्रावरून इतर कोणी तिकडील व्यवस्था ठेवित आहे तावत्कालपर्यंत घरच्या देण्या घेण्याच्या किंवा घरच्या कर्जाखचांच्या तोडजोडी बसविण्याचें मजला अगदींच कारण नाहीं; आणि पूर्वींच्या जाहिरनाम्या प्रमाणें त्या गोष्टींशी आणि माझ्याशी बिलकुल संबंध राहिला नाहीं.

**कलम २**—इकडून जो पैका देणें तो केवळ तीर्थरूप मातुश्री या उभयतांच्या आज्ञापत्राला शिरसावंद्य मानण्यासाठीं मात्र द्यावयाचा आहे. याखेरीज दुसरें कांहींएक कारण नाहीं. आई बापांचा सत्कार ठेवावा इतकाच कायतो या खटपटीचा उद्देश आहे. असें सर्वांनीं स्पष्ट स्पष्ट समजून घ्यावें.

**कलम ३**—तीर्थरूप व मातुश्री यास खर्चा वेचासाठीं किंवा दान धर्मासाठीं जितका पैसा लागेल तितका कोणी एकादा साहुकार पाहून त्याच्या पासून जेव्हा त्यांस पाहिजे तेव्हा त्यांणीं परभारे मागून घ्यावा आणि त्यास शिरस्ते प्रमाणें दस्तऐवजी आधार लिहून द्यावा असें केल्यानें वडिलांच्या अडचणीस हंगामशीर मदत मिळत जाईल, कारणानें थोडक्या पैशांत काम चांगलें होईल. ह्मणजे सोय जास्ती आणि खर्च कमती; तशांत आणखीं तिराहिताच्या मार्फतीचा हिशोब असल्यास जसा पाहिजे तसासाफ सफा मिळेल.तसा हिशोब नातलगाकडून मिळावया समअशक्यआहे. वडिलांस साहुकार मिळण्याची अडचण असल्यास तसें लिहून पाठवावें ह्मणजे कोणीही साहुकार दाखवून देण्याची तजवीज होईल. कोणेकडून तरी अडचण दुरावेल अशी लेखन आज्ञा व्हावी.

**कलम**—४ सदरीं लिहिलेले साहुकाराचे कर्ज घेतलेले रुपये उलगडण्या विषयीं त्या साहुकाराचे नावाचें विनंती पत्र एक आणि माझ्या नावचें आज्ञापत्र म्हणजे ज्यास आशीर्वादपत्र म्हणतात तें एक मिळून दोन पत्रें वडिलाकडून मजकडेस आलीं पाहिजेत. साहूकाराचे पत्रांत परभारें अमुक रुपये घेऊन भरून पावल्याबद्दल वडिलांचे स्वदस्तुरचे सहीची, अमकया दस्तऐवजावर भरपाईचा शेरा मारून धनकोच्या सही साक्षीनिशीं तो भरपाई केलेला कर्जाचा दस्तऐवज माझ्या कबज्यांत तारणादाखल ठेवण्या विषयीं विनंति लिहिलेली असावी आणि माझ्या पत्रांत साहुकारास परभारे रुपये देऊन सदरीं लिहिल्या प्रमाणें दस्तऐवज सोडवून तारणा दाखल कबज्यात घेण्या विषयीं आज्ञापत्रानें उल्लेखन स्पष्ट स्पष्ट लिहिलेलें असावें म्हणून तशा दोन पत्रांच्या आधारानें तितक्या कर्जाचा उलगडा करण्याची तजवीज केली जाईल.

**कलम ५**—सदरील दोन पत्रांशिवाय साहुकार याणें वडिलांच्या कर्जा बाबद अमुक रुपये परभारे घेऊन भरून पावल्या बद्दल कर्जाच्या अमकया दस्तऐवजावर भरपाई करून तो दस्तऐवज तारणा दाखल माझ्या कबज्यांत देण्यास कबूल असल्या विषयीं माझ्या नावाचें एकपत्र व आशा खुलाशाचें म्हणजे परभारे रुपये घेऊन तारणा दाखल तें कर्ज खत माझ्या कबज्यांत देण्यास कबूल असल्या बद्दल वडिलांच्या नावाचें एक पत्र, अशीं दोन पत्रें मजकडेस पाठविलीं पाहिजेत. तदनंतर कर्जाच्या रुपयांचा फडशा कसा केला जाईल त्याचा खुलासा कळविण्यांत येईल.

तात्पर्य—सदरीं लिहिलेले बंदोबस्तानें वडिलांची सोय, संततीला नफा, हिशोबाचा छडा आणि लौकिकाची वृद्धि; असे चारही विवक्षितार्थ सिद्धीस पावतील. असा या बसतानाचा इंगितार्थ आहे.

## जादाकलम.

**कलम १**—पुरुषानें किंवा स्त्रियेनें आपलें लग्न करणें हें ज्याचें त्याचें कर्तव्य कर्म होय; किंवा निदान ज्याच्या त्याच्या सुखाचें साधन होय असें म्हटल्यास कोणती अडचण होईल, हें मला कळत नाहीं. कोणी कळविल्यास आभार होतील.

**कलम २**—लग्न लावून देण्या विषयीं मुला बाळांचे आईबाप सर्वदा ऋणी आहत असें कोण कशासाठीं समजतात या विषयीं मला माहिती नाहीं. कळविल्यास उपकार होतलि.

**कलम ३**—आपल्या मुलां बाळांस कला किंवा विद्या शिकविणें किंवा शिकण्यास सहाय्य देणें हें मात्र आईबापांचें कर्तव्यकर्म होय असें म्हटल्यास साजेल असा माझा समज आहे.

**कलम ४**— माहेरवास (मायरविशा) आणि सासुरवास (सासुरविशा) या दोहोंचें तारतम्य पाहिलें असतां सासुरविशा पेक्षां मायरविशा मध्यें विशेषात्कार आढळतो, तो असा कीं:—या आपल्या एकाच कन्ये कडून आपल्या जामाताचा संसार झाला पाहिजे या विषयीं जितकी आवश्यकता मायरविशा मध्यें असत्ये तितकी आवश्यकता म्हणजे या एकाच स्नुषेकडून आपल्या पुत्राचा संसार नांदला पाहिजे—इतकी आवश्यकता सासुरविशांत आढळत नाहीं. याचें कारण पुरुषास दुसरें लग्न करण्याविषयीं लघुत्व किंवा संकोच कमती असतो आणि फायदा जास्ती असतो परंतु या तिन्ही गोष्टी विधवा विवाहा मध्यें हमेशा प्रतिकुळ असतात. अशा कारणांमुळें मायरविशामध्यें ममतापूर्वक लालन पालन शिक्षा दीक्षा,- इत्यादिक संस्कार अगत्यानें व अवश्यकतेनें होण्याचा विशेष संभव असतो.

**कलम ५**—लग्न संस्कारा पासून रजोदर्शना पर्यंत आणि रजोदर्शना पासून पृथक् व स्वतंत्र वास्तुशांती पर्यंत लालन पालन शिक्षा दीक्षा इत्यादिक संस्कार करण्या बद्दल खर्चावेचास देण्याविषयीं श्वशुराशीं जामाताचा करारनामा होऊन मायरविशांत सदरील संस्कार करण्याविषयी जामाताशीं श्वशुराचा करारनामा झाला पाहिजे. असे दोन करारनामे झाले ह्मणजे त्याप्रमाणें या खालीं सही करणारा आपलें लग्न करील.

**सारांश**— सासूसासऱ्यांस आपल्या सुनेकडून जितकी चाकरी करून घ्यावयाची असेल तितकी सर्व चाकरी कोणी एकादी बाई किंवा बोवा चाकरीस ठेवून त्याजकडून करून घ्यावी. त्याच्या करास मुशाहिरा दिला पाहिजे तो देण्यासाठीं खर्चास पाहिजे त्याची तजवीज सदरील ताजा कलमा पैकीं तिसरे कलमा प्रमाणें करून खर्चास घेतजावें. त्याचा फडशा पुढील कलमाप्रमाणें होईल.

टीप.— खर्चास द्रव्य पाहिजे त्यास कोणी एकादा धनिक (धनको) पाहावा आणि सेवेस स्नुषा पाहिजे त्यास कोणी एकादा सेवक (चाकर) पाहावा म्हणजे यथायोग्य निर्वाह होईल. सुनमुख पाहाण्याची इच्छा असल्यास स्नुषागृह पाहाण्याची इच्छा प्रथमतः असावी म्हणजे त्यामध्यें स्नुषा मुखावलोकन अनायासेंच घडून येईल. पुत्रोत्पत्तीच्या पूर्वी स्नुषेनें श्वशुरदर्शनास निर्फळ जाऊं नये. कांकीं— "रिक्तपाणिर्नपश्यंति राजानां देवता गुरुः" तस्मात् श्वशुरदर्शनास जातांना स्नुषेनें नेण्यास उत्तम फळ म्हटलें म्हणजे पुत्रफळ होय, असा अभिप्राय आहे.

ता० १२ सन १८७०

(सही) हरि नारायण मोडक.


## जाहिरात.

**कवितासारामृत**

अथवा

महाराष्ट्र भाषेच्या कवितांतील वेंचे.

सर्वांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं; वरील नांवाचा ग्रंथ आम्हीं तयार करून अकोलें येथें वऱ्हाड समाचार छापखान्यांत सुंदर टाइपांवर छापवीत आहो. सदर्हु ग्रंथांत वामन पंडित, मोरोपंत अनंत कवि आदिकरून कवींच्या कविता फारच सुरस, व मनाल्हादक अशा आहेत. तर सर्वत्र देशबांधवांनीं यास उदार आश्रय द्यावा. हा ग्रंथ घेणारास सुलभ पडावा म्हणून याची किंमत फारच थोडी ठेविली आहे. आगाऊ जून महिन्याचे आंत देणारास ८१२, फक्त सही देणारास ८।१४ आणे, आणि मागाहून ग्रंथ तयार झाल्यावर देणारास १ रुपया पडेल याशिवाय टपाल खर्चाबद्दल दोन आणे पडतील. याप्रमाणें किंमत ठेविली आहे. तिकिटें पाठविणारांनीं अर्धआणे दराची बर्तोळ्यासह पाठवावीं. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. सदर्हू ग्रंथ रा. रा. शिवचंद बलदेवभाई मारवाडी दुकान भडगांव यांजकडे मागितला असता मिळेल तारीख २० माहे एप्रिल सन १८७०

(सही) श्रीधर नारायण भडगांवकर

जिल्हा खानदेश.



## जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें या सालचीं म० ग० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्री साठीं आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ८३ आणे.


| किमतीचे दराव. | रु. | आ. |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास… … | ६ | ० |
| साल अखेर … … … | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ … … | ३ | ८ |
| एक अंकास … … | | ९ |
| फुटकळ … … … | ० | ३ |

या शहरा बाहेरील लोकास वर्षाचे १२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च आगाऊ पडेल तो १ रु. ४ आणे व सालअखेर १ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारासही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होऊन तेथून २ महिन्याची मुदत समजावी

**नोटिसा वगैरे छापण्याचे दर.**

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ८।८१

इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ८४

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

**सूचना**—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्याचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केलें त्यास अडीच वर्षें होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्ध आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल.ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छा. प्र. केलें.

# वऱ्हाडसमाचार.

THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

AKOLA:—SATURDAY EVENING, MAY 21· 1870 NO.

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २१ माहे मे. सन १८७० इ० अंक

## जगद्गुरू.

हिंदु लोकांचे धर्मव्यवस्थापक जे पुरुष आहेत त्यांस जगद्गुरु किंवा शंकराच्यार्य स्वामी असें ह्मणतात. जगद्गुरु या शब्दाचा अर्थ फार मोठा आहे व त्या खऱ्या शब्दार्था इतकी अतिव्याप्ती शंकराच्यार्य स्वामी मध्यें आहे असें नाही. जगत् ह्मणजे समुद्रवलयांकित सर्व पृथ्वी होय, आणि शंकराच्यार्य कांहीं साऱ्या पृथ्वीचे गुरु नाहींत. च्यार खंडां पैकी एशिया खंडांतील बारा देशांतल्या एका हिंदुस्थान देशांतील कित्येक जातीं पैकीं एका हिंदु जातीच्या लोकांचे मात्र गुरु आहेत, आणि शब्दार्थ तर फारच भव्य आहे याचें कारण आमच्या मतें असें दिसते कीं आमचे हिंदुलोक आपल्याहून पर कोणी आपले बरोबरीचे किंवा मनुष्य ह्मणण्या योग्य तरी आहेत असें जुन्या काळापासून मानीतच नव्हते. म्हणून त्यांनीं आपले गुरु ते सर्व जगताच गुरु म्हटले असतील. बाकी ते इंग्रजांचे गुरु नाहींत, पारशांचे नाहींत, मुसलमानांचे नाहींत. गाई बैलांचे गुरु नाहींत, माशा कासवांचे गुरु नाहींत, व कावळ्या चिमण्यांचे गुरु नाहींत एवढेंच नव्हे पण हिंदुजातींतही बहुत लोकांचें गुरु त्यांहून वेगळे आहेत. म्हणजे गुजर भाटयांचे गुरु वेगळे, जैनधर्मी मारवाडी व शिंपी वगैरेंचे गुरु वेगळे, लिंगाइतांचे गुरु वेगळे असे प्रकार आहेत तरी पण आमचे शंकराचार्य जगद्गुरु यांची योग्यता या इतर छोट्या गुरूं पेक्षां भारी आहे व जुन्या लोकांचे मनावर त्यांचें मोठें वजन आहे यांत संशय नाहीं व राजकीय प्रभुत्वाचा कांहीं अमल नसतां इतके मोठें वजन राहणें ही [illegible]चीच गोष्ट आहे यांत संशय नाहीं.

असो, अशा गुरुपदानें विभूषित शंकराच्यार्यांचें काम काय म्हणाल तर धर्मसंस्थापना होय. धर्माची ग्लानी झाली, धर्मांत बंडें उभी राहिलीं तर त्यांनीं शास्त्रदृष्ट्या विच्यारपूर्वक नियम ठरवून द्यावे व ते लोकांनीं ऐकावे. मागें हिंदुस्थानांत जैनमत प्रबळ झालें होतें व हिंदुधर्माचा लोप होण्याची संधी आली होती त्यावेळीं प्रथमचे शंकराच्यार्य यांनीं विद्याबळानें व शास्त्रबळानें जैनमत प्रवर्तक मुंडणमिश्र यांशीं वादकरून त्याच्या मत्ताचा उच्छेद केला व हिंदुधर्माचें रक्षण केलें. यावरून हिंदुस्थानांत त्या शंकराच्यार्य स्वामीची मोठी ख्याति झाली. व लोक त्यांस सप्रेम आदरानें भजूं लागले. राजांनीं व संस्थानिकांनीं वगैरे त्यांस जहागिरी, नेमणुका दिल्या व ते जाईत तेथें तेथें लोक त्यांची पूजा करून सर्व गावांत पट्टी करून त्यांस दक्षिणा देत. असे हजारो रुपये जमत. मग स्वामींचें म्हणजे सन्याशाचें (भगव्यावस्त्राचें व तुंबडीचें) जरी संस्थान होतें तरी तें राजशोभातुल्य झालें. पदरीं हत्ती, घोडे, पागा, स्वार, शिपायी, पायदळ, छत्रें चामरें वगैरे बहुतच डौल झाला. पुढें ते शंकराच्यार्य नारायण स्वरूप झाले म्हणजे मरण पावले तेव्हां त्यांच्या शिष्यांपैकीं कोणी संन्यासी करून त्यांचे गादीवर बसविले व ती शिष्यपरंपरा आज बहुत वर्षेपर्यंत तशीच चालत आली आहे. व संस्थानचा डौलही थोडा बहुत राजकीय बाण्याचा आहेच. मात्र एक संस्थान फुटून भाऊबंदा दाखल त्याचीं कित्येक वेगळीं वेगळीं संस्थानें झालीं. हल्लीं संकेश्वरकर व कोलहापुरकर शंकराच्यार्य वेगळे, शृंगेरीकर वेगळे, हंपीविरूपाक्ष वेगळे असे कित्येक मठ असल्याचें ऐकण्यांत आहे. कांहीं फायद्याची बाब दिसली म्हणजे एकाचे दहा प्रकार होऊन लोक कावळयप्रमाणें त्याभोवतीं जमावयाचे व धर्माची, गुरुत्वाची वगैरे गोष्ट असली तरी तो बाजार निराळाचे तोडीवर जावयाचा हा आमच्या हिंदुजातीचा सांप्रदायच आहे. त्याप्रमाणें या जगद्गुरूंच्या व्यापारांत कूस आहे असें दिसतांच एका मठाचे सात मठ झाले, दर मठांतून गाव पाहून धर्माधिकारी म्हणून नेमिले. व मत्तयाचे मामल्या दाखल पैसे ठरवून घेऊन प्रांतांतून एजंट म्हणजे गुमास्ते शंकराच्यार्यं पाठवूं लागले. हें आमच्या वऱ्हाडप्रांतीं ब्रम्हचारीबुवा, व चंद्रमसोमय्या असे दोन एजंट आहेत त्यांवरून लोकांचे लक्षांत आलेंच असेल. अस्तु.

सदरील प्रकार विस्तारानें सांगण्यांत आमचा मुख्य मुद्दा एवढाच कीं, हें खातें धर्मसंस्थापनेचें होय व याच्या वृध्यर्थ मुख्यास उत्तम शास्त्राध्ययन, पदरीं प्रतिसूर्यासारखी विद्वान मंडळी, व निरंतर धर्मनिर्णयार्थ शोधन हे जे अवश्य गुण व कार्य मठांत पाहिजे आहेत तिकडे दुर्लक्ष होऊन पैसा उकळण्याची गुमास्तेगिरीची वगैरे साधनें विपुल झालीं आहेत म्हणजे खऱ्या हेतूचा लोप झाला व कित्येक लोकांचा हा एक पोट भरण्याचा व्यापार झाला आहे व हें आमच्या साध्या भोळया जुन्या लोकांच्या लक्षांत अजून चांगलेंसें येत नाहीं असें दिसतें.

कालावर दृष्टी देऊन विवेचक बुद्धीनें जें कार्य करावें तें वर्णनीय होतें व तद्विपरीत केल्यास हसें होतें, हा एक सामान्य नियम आहे व तो आमच्या जगद्गुरूंनीं पुण्यास पुनर्विवाहसंबंधीं वाद करविला त्यांत चांगला उम्दुत झाला आहे. हा वाद झाला नसता तर मठसांप्रदायाची इतकी चर्चा व विटंबना लोकांत झाली नसती. वादाचीं प्रश्नोत्तरें निष्पक्षपातानें पाहिलींतर पुनर्विवाहास सुधारल्या मंडळींनीं जी सशास्त्रता दाखविली आहे ती आपले पदरची केवळ कल्पित काढून दाखविलेली नव्हे, जुन्या अनेक ग्रंथांचे आधार, युक्ती, व ग्रंथ लावण्याची व ते प्रबल निर्बल ठरविण्याची प्राचीन सांप्रदायाची सरणी, आणि योजना यांचाच केवळ तिला आधारस्तंभ आहे असें असतां शंकराच्यार्यांनीं केवळ जुन्या लोकांच्या मोठ्या भरण्याचा जिकडे कल पाहिला तिकडे डोल देऊन पुनर्विवाह सर्वथैव अशास्त्र असा खोटा निर्णय प्रसिद्ध केला, हा आमच्या मतें त्यांनीं ईश्वराचे घरीं महदन्याय केला व अनंत बालविधवांचा तळतळाट घेण्याचे द्वारां पुढील पातकाची सामग्री जोडिली. आमचे मतें शंकराच्यार्यांस असें करणें प्रशस्त नव्हतें. दोन्हीही बाजूचे वाद करणारे त्यांचे सच्छिष्य असतां दोन्हीही बाजूस शास्त्राधार दिसत असतां, व पुनर्विवाहपक्ष उगीच उडवून दिल्यानें तो निजत्रमास नेईल असें दिसें औदासिन्य उत्तेजक मंडळीच्या अंगीं नाहीं असें पाहत असतां, व दुनियेचा म्हणजे हल्लींच्या नवीन तरुणांचा कल कोणते गोष्टीकडे आहे, पुढें कोणता पक्ष प्रबळ होणार आहे, लोकांत प्रस्तुत काय चाललें आहे, धर्मावर श्रद्धा किती आहे, विधवांना लग्नाची मनाई केल्यानें साठा पापाचा किंवा पुण्याचा किती अधिक होणार, जारकर्म कशानें कमी होईल, गर्भपात बालहत्या कशानें कमी होतील, सौख्य व देशांतील प्रजा कशानें वाढेल इत्यादि अनेक उपयुक्त व महात्विक गोष्टींचा शंकराच्यार्यांनीं विच्यार केला असता व तदनुकूल आपला निर्णय दिला असता किंवा दोन्ही पक्षांची प्रबलता व सशास्त्रता पाहून अमुक वर्षांच्या वयाच्या बालविधवांच्या पुढील सुखावर दरवडा न घालण्याचा निर्णय ते करते तर कांहीं तरी न्याय झाला असता अथवा तूर्त दोन्ही पक्ष तकूब ठेवून व थोड्या कालानंतर पुन्हा विच्यार करून निर्णय देऊ असें म्हणते तरी कांहीं बरें होतें परंतु तसें यश शंकराच्यार्यांनीं मिळविलें नाहीं यांत मोठीच अणीबाणी गमाविली असें त्यांस आज जुन्या लोकांच्या कोंडाळयांत बसल्यानें व तद्रूप झाल्यानें वाटत नसेल तरी पुढें तसें वाटण्याचा प्रसंग येईल असा पुष्कळ शहाण्या लोकांचा अजमास आहे.

पुनर्विवाह आलीकडे नवी रूढींत नव्हता तरी त्यास थोडा बहुत शास्त्राधार आहे व विधवादुःखप्रशमनाचा त्यांत परोपकार आहे हें मनात आणून तो पुन्हा चालू करण्याविषयींचा निर्णय शंकराराच्यार्य देते तर प्रथम शंकराच्यार्यां प्रमाणें यांची फार मोठी कीर्ति झाली असती व लोकांनीं च्यारी खंडांत त्यांचीं स्तोत्रें गाइलीं असतीं परंतु शास्त्राच्या अनभ्यासांत व विच्यार शक्तीच्या कोताईंत यास स्थळ कोठून मिळणार? अस्तु.

माजिस्त्रट साहेबांपुढें न्याय झाल्यांत उत्तेजक पक्षाकडील पंच व्यंकटशास्त्री माटे यांस शंकराच्यार्यांनीं फितविल्याचा मजकूर ते बोलले तो खरा आहे व पाठीमागून त्या उलट लिहून दिलें तें दुसऱ्याचे सांगण्यावरून दिलें असें ठरलें व माटे यांचे वयोवृध्यतेमुळें बुध्धीस मांद्य आलें आहे सबब त्यांचा कोणताच विच्यार जमेंत धरण्या सारखा नाहीं असें ठरलें आहे, यावरून व्यंकटशास्त्री यांनीं पुनर्विवाहा विरुद्ध अभिप्राय दिला तो कांहीं उपयोगी नाहीं व निषेधक पक्षाकडील दिनकरशास्त्री यांच्या स्वतांच्याच भाषणावरून त्याचा अभिप्राय मंजूर न धरितां गाळाऊ केला पाहिजे. कारण त्यांनीं सभेमध्यें स्पष्टच म्हटलें कीं, आम्हीं सत्यासत्याचा निर्णय जाणत नाहीं विष्णुशास्त्री यांचा पाडाव करण्याचें जाणतों; तेव्हां हीं दोही बाजूंचीं दोन मतें गाळिलीं म्हणजे सर्वांस दिसेल कीं दोन्ही पक्ष समान व प्रबळ झाले, मग ज्याचे विचारास जो हक्क वाटेल तो त्यानें स्वीकारावा असा जरी शंकराच्यार्य निर्णय देते तरी फार चांगलें झालें असतें.

आतां त्यांनीं तसें केलें नाहीं व पक्षपात केला म्हणून उत्तेजक पक्षास कांहीं न्यून आलें असें वाटत नाहीं. शंकराच्यार्यांनीं निर्णय पत्रांत बारा असामी बहिष्कृत म्हाणून लिहिलें आहे त्यावरून पुण्यास नवीन एक याद तयार झाली आहे तिजमध्यें असा मजकूर आहे कीं पुनर्विवाहाचा वाद आम्हीं ऐकिला. पुनर्विवाह सशास्त्र आहे. अशास्त्र म्हणतात तें खोटें. शंकराच्यार्यांचा निर्णय पक्षपाताचा असल्यामुळें तो आम्हास मान्य नाहीं. व त्यांनीं यामुळें ज्यांस बहिष्कृत केलें आहे त्यांशीं अन्नव्यवहार उघडपणें करण्यास आम्ही खुषी आहों. असें लिहून तिच्या खालीं कांहीं सह्या झाल्या आहेत व थोड्याच दिवसांत ती नावनिशी बाहेर पडेल व तेणेंकरूनही पुनर्विवाहोत्तेजक पक्षाची प्रबलता व बहिष्काराचा कमजोर आणि शंकराच्यार्यांच्या आज्ञेची अमान्यता लोकांत होत आहे हें सर्वांस दिसून येईल. आज आम्ही हा विषय आता पुरा करितो.

---

आमच्या ज्ञानप्रकाशकर्त्या बंधूनें या जगद्गुरुविषयीं लिहितांनां शेवटास एक असा प्रश्न केला आहे कीं, शास्त्रशुन्य गुरु म्हणजे खोटया मोत्याचा दागिना नव्हे काय? खरेंच आम्ही म्हणतो कीं तो फुग्याचा दागिना होय.

---

### आगगाड्यांचे उत्पन्न व इतर माहिती.

सरकारी कागदपत्रांवरून सर्व हिंदुस्थानांत रेलवेचें उत्पन्न काय आहे वगैरेची माहिती प्रसिद्ध झाली आहे ती अशी.

| एकंदर रेलवे | त्यांचें उत्पन्नगुदस्त सालचें | कितीमैलसुरू होती | सरासरी दरमैलास उत्पन्न सन १८६८–१८६९ | आठवड्यास |
|---|---|---|---|---|
| | रु. | | रु. | रु. |
| ईस्टइंडियन रेलवे मुख्य भाग | २४६२९५३०. | ११३१. | ११८. | ३६५. |
| जबलपुर शाखा. | ९५९३९०. | २२३. | ८३. | ७४. |
| ईस्टर्न बंगाल रेलवे. | १६१८४५०. | ११३. | २८०. | २७५. |
| कलकत्ता सौथई. रे. | ७५१८०. | २८. | ५२. | ५४ |
| अयोध्या आणि रोहिलखंड रेलवे- | २१२७५०. | ४२. | ९७. | ११३ |
| पंजाब रेलवे. | ९७६०३०. | २४६. | ७७. | ८०. |
| दिल्ली रेलवे, | १२९४०९०. | २०१. | १२३. | ५८ |
| मद्रास सौथवेस्टलैन. | ३९८८३३०. | ४९२. | ११६. | १२७. |
| मद्रासनार्थवेस्ट लैन. | १४०१८५० | १९७. | १३७. | १७०. |
| ग्रेटसौथ आफइंडिया | ६९७३०० | १६८. | ८०. | ८४. |
| त्रामवे. | ४४४०० | १९ | ४५ | ० |
| जीआयपी रेलवे. | १४२५९१५०. | ८७३. | ३१४ | ३२४. |
| बडोदा रेलवे | ४२७८५१० | ३०८ | २५७ | २५७. |
| सिंध रेलवे. | ७०८२९० | १०६ | १२८ | १७[illegible] |
| एकूण | ५५१२९११० | ४१५८ | २५७ | २५१ |

## पैंच.

रा. माधवराव गोविंद कारंजेकर रु. १०
मि. रतनजी जामासजी आसि. क. १९८१२
" पांडुरंग दामोदर क्युरेटर १३८८
" बहिमनजी जामासजी अ.क. १४८१२
रा. वामन विनायक मास्तर ९८४
" मुकुंदराव नंदाजी देशमुख ९
" रामचंद्र विनायक मास्तर ६८२
" सखाराम गंगाधर वकील २५
" यादवराव कृष्ण शिरस्तेदार ६
मि. जोन्स साहेब हेडक्लार्क ८
रा. रा. सखाराम मोरेश्वर खाजिनदार ६
मे. ताजुद्दीन साहेब आसि० क. ४८१०
रा. रा. सखाराम दत्तात्रय जु. शिर. १०
रा. रा. नारायणमाहिपत नाजर ६
रा. काशिनाथदाजी करमरकर ५८४
" भिकाजी चिमणाजी नायब त. १५
मि० मुबारक अल्ली पोलिस इन्स्पे० ५
रा० गोपाळ रघुनाथ वकील २३८१०
मे० करीमखा चीफकान्स्टेबल ६
विजापुर नेटिव लायब्ररी. ९८४
रा० हरी नरसिंह जोशी. ५
" बाळकृष्ण पांडुरंग हस्तेकर. २८८
" विष्णु गोविंद सब ओव्हरसियर. ९८४
" गोपाळ नारायण सबइन्स्पे. १२८८
रा० रा० विश्वासराव रघुनाथ जोशी. ९८४
" श्रीनिवास नारायण हु० कार० ९८४
मि० बेल साहेब डिपुटि कमि० २३८१०
" मेंजी साहेब स्माल. जज्ज २३ १[illegible]
" रेसिडेंट साहेब हैदराबाद. ९८४
रा० हरी नारायण मोडक मास्तर. २८८८६
" कृष्णाजी चिंतामण मास्तर. ७८८
" चंद्रभान दिनाजी देशमुख. १०८८
" चुगीलाल मारवाडी. २८०

## वऱ्हाड.

असें ऐकण्यांत आलें आहे कीं खामगावचे स्मालकाज जज्ज मि० अलेकझांडर साहेब च्यार महिन्यांचे रजेवर जाणार व मि० रतनजी साहेब ह्यांचें काम पाहणार.

इलिचपुराहून आमच्या मित्राचें पत्र आलेलें आज छापिलें आहे त्यावरून दिसतें कीं तेथील दवाखान्यावर मि० रिचर्डसन नावाचे पेनशनर गेले आहेत त्यांविषयीं लोकांचा बोभाट आहे. खरेंच ९० अजाऱ्यांची संख्या च्यार अजाऱ्यांवर आली व ती त्यांच्या गैरहजिरीनें लोकांची गैरसोय होऊं लागल्यामुळें आली. यांच्या उत्तम औषधोपायानें आल्याचें दिसत नाहीं. डाक्टर साहेब दोनचार तास दवाखान्यांत गेल्याने चोविस तासांत येणाऱ्या अजाऱ्यांची व्यवस्था लागत नाहीं व ते परत जातात, व सर्पदंशानें मनुष्यें मरण पावलीं त्यांसही रिचर्डसनी दवा मिळाला नाहीं हेंच कारण कळतें. तर असले ढोली व आळशी साहेब आम्हां गरीब नेटिव लोकांच्या काय कामाचे? डाक्टर कसे पाहिजेत, याजबद्दल आम्हांस लिहावयाचें आहे तें पुढें लिहू. आमचे अकोल्याचे ही मि० अय्याकानु लोकप्रिय झाले आहेत असें दिसत नाहीं. व ते गावांतही कधीं कोणाचे दृष्टीस पडत नाहींत. त्यांची भाषा तेलंगी व लोकांची मराठी आहे. मग असे मनुष्य नेमण्यापेक्षां मुके मनुष्य नमले असते तरीही थोडा बहुत कार्यभाग झाला असता व दवाखान्याचा गाडा चालूच राहता. आमची सरकारास अशी शिफारस आहे कीं धर्मार्थ दवाखान्यावर डाक्टर नेमणें ते त्यांनीं साहेब, तैलंग, वगैरे अडूमडू नेमूं नयेत. मराठी भाषा चांगली जाणणारे हिंदु डाक्टर नेमित जावे, तेणें करून लोकांचा अधिक उपयोग होईल.

### अकोला

आमचे अकोल्यास टेंपल गार्डन किंवा पीपल्स पार्क या नांवाचा एक बगीचा रेलवे स्टेशनाजवळ आहे हें बहुत लोकांस ठाऊक असेल. हा मुळापासून नव्हता, आलीकडे सरकारी सांगशानें झाला आहे. शहरें मोठालीं वसत जातात तेथें असे बगीचे, कारंजीं, खेळावयाच्या जागा वगैरे रयतेच्या सुखोपभोगार्थ कारखाने होत असतात. हा इंग्लिश राज्यसंबंधानें एक सुखानुभवाचा प्रकार आहे असें आम्ही म्हणतों, तरी पण "दैव देतें व कर्म नेतें", अशी म्हण आहे तिचा अनुभवही क्वचित स्थलीं आला म्हणजे सुदाच्या वस्तूही दुःखरूप होतात, हें एथील बगीच्याच्या स्थितीवरून आज आम्हांस म्हणणें भाग झालें आहे.

असे जे हे बगीचे तयार करितात त्यास जनिक असून त्यास रयतेचे बगीच ते सार्व म्हणतात हे. मोठे सुशोभित केलेले असतात, मनास आनंद देणाऱ्या वस्तु तेथें उत्पन्न केलेल्या असतात, सुरेख सडका त्यांमधून घातलेल्या असतात, बसावयास उत्तम बैठका असतात, सारांश थकल्या भागल्या व दुःखीही लोकांनीं तेथें गेलें असतां क्षणभर दुःखविमुक्त व्हावें अशीं हीं स्थलें मोठीं रमणीय केलेलीं असतात. पुण्यास, नगरास, सोलापुरास, नाशिकास वगैरे असे बगीचे आम्ही पाहिले आहेत व त्यांतून सुखानुभव घेतले आहेत परंतु अकोल्याच्या बगीच्यावरून आम्हांस मोठें आश्चर्य वाटतें कीं सर्वच गोष्टी एथें बेकायद्याच्या कशा? "नान रेग्युलेटेड" या शब्दाची व्याप्ती जलीं, स्थलीं, काष्ठीं, पाषाणीं अनुभवास आणून द्यावी हें एक व्रतच एथ न सेलना? असा काय असेल तें!

आमचा अकोल्याचा बगीच्या फार मोठा आहे. सुमारें अर्धे अकोल्या इतकी जागा त्या खालीं अडली आहे व ती लोकांनीं सुखानें दिली आहे असें नाहीं. अधिकाऱ्यांच्या मनांत येतांच त्यांनीं ती घेतली आहे, व कंपनशेस कोणास रूपयास दोन आणे च्यार आणे प्रमाणें दिले आहेत. याप्रमाणें गावानजीकचे पाच सहा मळे विहिरीसुद्धां घेऊन हा बगीच्या बनविला आहे. असो. लोकांच्या सुखार्थ ही गोष्ट होत आहे म्हणून त्याचें कोणास दुःख वाटलें नाहीं. बगीच्या म्हणण्या जोगा यांत थोडाच भाग आहे, व बाकी रिकामा किंवा जोंधळा, कापुस, वगैरे शेती जिन्नस करण्याकडे गुंतलेला आहे. असो असा जरी आहे तरी तो रयतेचा बाग म्हणून त्यावर रयतेची सत्ता असावी हें वाजवी आहे व त्याप्रमाणें थोडयादिवसांपूर्वी होतीही. म्हणजे रयतेपैकी कोणीही त्या बागेंत गेला, हिंडला, फिरला, बसला, व हवा खाऊन परत गेला तर त्यास प्रतिबंध नसे, तशींच तेथें फुलें लावलेलीं आहेत त्यांचे पुडयाचे रतीब शें दोनशें लोकांकडे होते. व अकोल्यासारख्या गैरसोयीच्या व वाईट गावांत अशीं सुंदर फुलें स्वस्तदरानें देवतार्चनास मिळतात म्हणून लोकांस फार संतोष वाटे. तें सर्व आलीकडे बंद झालें आहे व. याचें खरें कारण अजून आम्हांस कोणी कळवीत नाहीं, त्यास तें कळेल तर बरें होईल.

इतकें मात्र आम्हांस ठाऊक झालें आहे कीं, मेहरबान डनलप साहेब असिस्टंट काटन कमिशनर, व आतां आणखी माजिस्त्रेट साहेब झालेले, यांचे शिपाई तेथें पहाऱ्यावर असतात व ते नेटिव लोकांस तडटाकतात व लोकांस आंत जाऊं देत नाहींत. ही बंदी कशाकरितां व ती हे ती दिवस राहणार आहे? किंवा यापुढें कधींच कोणास त्या बागेंत जाण्यास हक्क नाहीं, फक्त डनलप साहेबयांस त्याची फुलपार मिळाली आहे कीं काय हें ते आम्हांस कळवितील तर बरें होईल.

कदाचित युरोपियन लोकांच्यास्तव पुरती ती बाग राखणें असेल तर "रयतेची" अशीं जीं अक्षरें आहेत त्यांस पहिल्यानें हरताळ लाविली पाहिजे. व मग तसें करणें अवश्य व योग्य आहे काय? याचा विच्यार पाहिजा पाहिजे. वऱ्हाडासारखा उष्ण प्रांत व अकोल्यासारखा रूक्ष व तरूविहीन प्रदेश, ज्यांत पुण्याहवाचनास आंब्याचा डाहळा पाहिजे असेल तर दोन तीन कोस गेल्याशिवाय मिळणेंच नाहीं, तेथें उन्हातापानें श्रांत झालेल्या गरीब बिचाऱ्या रयतेनें सायंकाळचे क्षणभर जाऊन हवा घेतली तर तो बगीच्या बाटून साहेब लोकांस पाय ठेवण्यास अयोग्य किंवा भ्रष्ट असा होईल कीं काय? आम्हांस ठाऊक नाहीं. साहेब लोक सरकारी कामदार, मोठे पगारदार, व सर्व सत्ता त्यांच्या हातीं आहे आणि सरकारी बगीच्याही दुसरा एक त्यांस आहेच, शिवाय तिसराही बनविण्याचें त्यानीं मनांत आणिल्यास त्यास अशक्य आहे असें नाहीं. त्यांतून रयतेच्या बगीच्यांत त्यानीं येऊं नये असेंही कोणाचें म्हणणें नाहीं, मात्र त्यांनीं रयतेस रयतेचा हक्क म्हणून त्या बगीच्याचा उपभोग घेण्यास परमाणगी दिली पाहिजे व ती न देतील तर तो न्याय नाहीं असें लोक म्हणूं लागतील असा संभव आहे.

याच आठवड्याच्या सोलापुरच्या कल्पतरू पत्रांत लिहिलें आहे कीं एथें म्हणजे सोलापुरास म्युनसिपालिटीचा बाग झाला आहे, त्याविषयीं लोकांचे मनाचा असा ग्रह झाला आहे कीं हा बाग सार्वजनिक लोकांकरितां नाहीं, परंतु आम्हीं खात्रीनें सांगतों कीं त्या बागेंत सर्व लोकांस जण्यास मनाई नाहीं, तशीच तेथील फुलें तुळशी नेण्यास कोणास मनाई नाहीं, तसाच बेल व औषधीकरितां झाडपाला वगैरे लागल्यास कोणास मनायी नाहीं तसेंच सर्पदंशावर औषधी झाड रा. रा. रामचंद्र सखाराम चेरमन यांणीं लाविलें आहे त्याचा उपयोग सर्व लोकांस आहे इतकेंच कीं जिन्नस घेणें तो माळ्यास मागून घ्यावा, आपले हातानें घेऊं नये.

वा:! सोलापुरच्या आणि अकोल्याच्या बगीच्या संबंधी रयतेच्या सुखांत किती तफावत आहे राम लक्ष्मण, आणि राम रावण यांत जितकी तफावत तितकी म्हटल्यास चालेल. तर या गोष्टीचा जरूर विच्यार व्हावा व एथील बगीच्यांतही लोकांचा पैसा पडला आहेच म्हणून त्यांस त्याचा सुखोपभोग घेण्याची मनाई नसावी त्यांतून हे उन्हाळ्याचे दिवस आहेत म्हणून या गोष्टीचा विच्यार लवकर होऊन लोकांस बगीची मोकळीक मिळाल्यास उत्तम होईल.

## वर्तमानसार.

गणशशास्त्री मालवणकर यांनीं शिक्षेच्या ठरावावर अपिल केलें तें मि० न्यूनहाम साहेब जाइंट जज्ज यांजकडे २० वे तारखेस निघणार होतें.

आम्हांस लिहिण्यास फार संतोष वाटतो कीं, खानदेश जिल्ह्याचे कलेक्टर मे. अशबर्नर यांस रे. कमिशनरची जागा मिळणार आहे. यांचे जागेवर मे. आरस्कीन यांस नेमून मे. ओव्हन्समाहेब यांची येथें नासिक जिल्ह्याचे कलेक्टरचे कामावर कायमची नेमणूक होणार आहे असें चांगल्या आधारावरून समजतें.

नाशीक—या आठवड्यांत हवा बरीच उष्ण असते. यंत्रांत ९६ डिग्री पर्यंत पारा चढतो. रोग राई वगैरे नाहीं. ज्ञा. प्र.

सोलापुर— तारीख १२ मे सन १८७० पासून रेलवे कंपनीनें सर्व मालावरील दर सोलापूरापासुन मुंबई पर्यंत सुमारें दरमणी ८४ आणे कमी केला असें समजतें. आतां व्यापारी लोकांस माल नेण्या आणण्यास फार सुखावह व सोईचें पडेल यांत संशय नाहीं. क त

धुळें—या आठवड्यांत उष्ण फारच प्रखर पडूं लागलें आहे. हल्लीं बाराचे सुमारास डिग्रींतील पारा १०५।६ अंशावर राहतो. आकाश निरभ्र असोन वाऱ्याचा सपाटा चालून रात्रीं थंडी कडक पडत असते. येणेंकरून गावांत वाताचा आजार सपाट्यानें चालू आहे. खा. वै.

बेळगांव—म्हटलें असतां हे दिवस फार उन्हाळ्याचे असावे; परंतु तसे दिवस नाहींत. नेहेमी गार वारा सुटतो, आकाश निरभ्र असते. प्रातः काळीं किंचित् थंडी ही पडते. पावसाचें मान जरा लांबलें असें दिसतें. मागें बराच पाऊस पडला त्यावेळीं बाहेर गांवीं किती एक लोकांनीं भाताची पेरणी केली तें भात हल्लीं बरेंच रुजून आलें आहे, परंतु इतक्यांत पर्जन्य न पडेल तर तें नाहींसें होऊन पुनः पेरणी करावी लागेल. साल मजकुरीं एथें पाण्याची हाकाटी नाहीं. ही एक संतोषाची गोष्ट आहे. बे० स०

खा. वै.चे एकण्यांत असें आलें आहे कीं रावसाहेब काशिनाथ महादेव थत्ते मामलेदार यांस तीन महिन्यांची रजा मिळाली.

स्त्री जातीचा उत्कर्ष—बंगाल इलाख्यांत एका एतद्देशीय स्त्रीनें "बंगमहिला" म्हणजे बंगालची स्त्री म्हणून एक वर्तमानपत्र काढलें आहे. ते स्त्रीनें चालविलें असून त्यांत मजकूर चांगले लिहिलेले असतात असें समजतें.

ग्रे. इं. पे. रेलवेसाठीं आणखी ३ कोटि रुपये भांडवल काढावें असा विचार आहे.

सातारा हवा चमत्कारिक झाली आहे. दिवसांस अतिशय तप्तता असते, रात्रीं वाराही तसाच सुटतो हमेशा आकाशांत अभ्रें येत असल्या कारणानें स्वच्छ हवेस आलीकडे लोक मुकले आहेत त्या योगें रोगाची उत्पत्ती होईल असें वाटतें. म. मि.

मुंबई—आतांशीं अभ्रें फार येत असतात ता० ३ रोजीं पावसाचे थोडे थेंबही पडले. पण तेणेंकरून उष्णता कमी झाली आहे असें अगदीं नाहीं.

ब्रम्हदेशांत मंडले राजधानीच्या जवळील जंगलांत मि० कोलाग्रेडो नांमें एक साहेब हत्तीच्या शिकारीस गेला असतां एका हत्तीनें त्याला सोंडेनें धरून एका वृक्षाच्या खोडावर आपटलें, तेणेंकरून तो बापडा तत्काळ मरण पावला.

काशीकडे महामारीचा उपद्रव सुरू झाल्याची बातमी होती ती खोटी आहे.

## इलिचपुराहून-

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.—

विनंती विशेष — ऋतु मानाप्रमाणें सांप्रत काळीं या शहरांत अतिशय उष्मा होत असून नऊ तासापासून अस्तमानचे पांच वाजे पर्यंत तोंड बाहेर काढूं देत नाहीं अशी उष्णता आहे या खेरीज काहीं रोगराई नाहीं.

हिंदु लोकांच्या वेड्या समजुती प्रमाणें ता. २ मे सन १८७० रोजीं सोलापुरा जवळ पयस्विनी नदीचे पार दोनशे कदमावर झोंबडेश्वर महादेवाचें देवालय आहे त्यांत एक मनुष्य हिंदु जातीचा असून त्याचें पागोटें मराठे पण त्रिकोणी बांधलेलें होतें त्यावरून तो पुणें प्रांताकडील मराठे जातीचा मनुष्य असावा अशी अटकळ मात्र होते त्याणें महादेवाचे लिंगाची पूजा करून आपले हातानें सुरीनें आपली मान कापून घेऊन मरण पावला आणि महादेवास तृप्त केलें. तेणेंकरून श्रीशंकरानीं त्याजला कैलासास नेलें अथवा नरकांत घातलें हें तर समजत नाहीं पण इतकें मात्र दृष्टोत्पत्तीस आलें कीं देउळांतून त्याचें मृत शरीरास कोणी स्पर्श करीना सबब शेवटीं महार लोकांनीं काढिलें तें ता.४ पावेतों तसेंच रखडत इलिचपूर येथें येऊन डाकतर साहेबांनीं पाहिल्यानंतर महारांनींच त्याची मूठमाती केली. अशी त्याची गति झाली आहे. असें कृत्य करणाराची हिंदुलोकांत स्तुति करितात परंतु आम्हांस तर हा मूर्खपणा दिसत आहे. आतां हा मनुष्य कोण कोठील होता हें अगदीं समजलें नाहीं.

इलिचपूर शहरांत या एका आठवड्यांत दोन मनुष्यें सर्पदंश झाल्यानें मरण पावलीं. ता. ६ माहे मेचे अस्तमानीं सिताराम दुबे पेनशनर यांचे प्रिय पत्नीचे पायाचे आंगठ्यास सर्पदंश झाल्याने दोन तासांतच मांत्रिक इत्यादि हाका मारीतच होते तों तिचा प्राणांत झाला तेणेंकरून तिच्या पतीस तर दुःख झालेंच पण ती सद्गुणी स्त्री असल्यामुळें शेजारी वगैरे लोकांस फारच दुःख झालें आहे. असो ईश्वरेच्छा.

ता. १३ माहे मेचे तीन वाजतां रात्रीस शब्बू शुक्र यानला सर्पदंश होऊन ता. १४ चे प्रातःकाळीं सात वाजतां हे ७० वर्षांचे वयाचे गृहस्थ परलोकांत चालते झाले. यांचे मरणानें यांचे आळशी मुलांस काय दुःख झालें असेल तें असो परंतु म्हातारा दररोज भिक्षा मागून निर्वाह करित होता त्या दुःखांतून नागदेवानें त्याची मुक्तता केली असें सर्व लोकांस वाटत आहे. व खरें हो नजरेस येत आहे—

आतां यावर लिहिलेल्या उभयतां मनुष्यांचे मरणाचे संबंधानें शहरांतील डिसपेन्सरीचे डाकतराचे वर्तणुकीविषयीं फार लिहिणें आहे परंतु विस्तारभयास्तव इतकेंच कळवितों कीं पूर्वीचे पुरुषोत्तम अण्णा हे रात्रंदिवस दवाखान्यांतच हजर राहात होते यांची बदली सरकारानें करून मिस्तर रिचार्डसन या नांवाचे एक युरोपियन म्हातारे पेनशनर यांस येथें नेमिलें. हे आल्यापासून ४०।५० आजारी दर रोज औषधें घेत होते ती संख्या कमी होऊन ३।४ आजारी दररोज दवा घ्यावयास येतात किंवा नाहीं याची वंचाईत दिसत आहे; कारण हे पहले साहेब. यांच्यानें अशा भयानक व वाईट जागेंत येकटें कसें रहावेल? हे परतवाड्यास राहत असून प्रातःकाळीं सहा वाजतां शहरांत येऊन आठ वाजतांच परत घरीं जातात. या दोन तासांचे आंत उपास आज असेल त्याणें येऊन औषध घेऊन जावें. नाहीं तर हाका मारीत बसावें याचें कारणामुळें एका आठवड्यांत सर्पदंश होऊन त्यास औषध न मिळाल्यानें दोन मनुष्यें मरण पावलीं आहेत अशी स्थिती डिसपेन्सरीची झाली आहे. पत्रकर्ते महाराज या प्रकरणांत जर आपण वरिष्ठ अधिकाऱ्यांस सुचना कराल तर ह्या शहरचे दीनदुबळे लोकांवर आपले महत उपकार होतील. विस्तार झाला आतां पुरे करितों. कळावें लोभ असावा हे विनंती. तारीख १४ माहे मे सन १८७० इसवी मुक्काम शहर इलिचपूर

आपला मित्र

## नोटिस.

नोटिस रा. रा. माधवमल रायटर निसबत इनग्रम साहेब रेलवे कंपनी राहाणार ताजनापेठ तालुके आकोले मुक्काम पारस यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतेकीं, ज्याघरांत हाली तुम्हीं राहातां ते घर करण्या प्रीत्यर्थ एकंदर खर्च सुमारें ८० रुपये लागला आणि घर तयार जाल्या नंतर तुम्हीं आम्हांजवळ येऊन कबूल केलें कीं, आह्मीं ४ महिने येथें राहाणार आहों नंतर आम्हीं देशीं जाऊं. न गेल्यास या घराचा बांधण्या बद्दल जो खर्च तुम्हांस लागला आहे तो आम्हीं चुकवून देऊं नंतर या घरांत आम्हीं राहूं असें असून आज पर्यंत आम्हीं तुमची वाट पाहिली परंतु तुम्हीं रुपये दिल्हे नाहीं सबब ही नोटिस देण्यात येतेकीं आज तारखेपासून आठ दिवसाचें आंत सदरि लिहिलेले रुपये दाखल कराल तर ठीक आहे नाहीं पक्षी आमचें घर लामलेंच तुम्हांस खालीं करून देणे भाग पडेल नाहीतर सदहू प्रमाणें फिर्याद करून नोटिशिचा खर्च सुद्धा भरून घेतला जाईल कळावें तारख २० माहे मे सन १८७०

(सही) रावजी लक्षुमण

नोटिस....आनंदा वलद नारायण माळी राहणार पेठ पंचगव्हाण अवरंगपूर तालुके आकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे कडेस आमचे खाद्याबदल रुपये ९९ आक्षरी पंचाणव व्याजासुध्धां येणें आहे तर ते तुम्हीं आजतारखे पासून आठ दिवसांत आणून द्यावे न दिल्यास शिरस्तेप्रमाणें मुदल व व्याज आणि नोटिशीचे खर्चासुध्ध फिर्याद करून घेण्यांत येईल कळावें तारीख १८ माहे मे सन १८७० इ.

(सही) रेणकादास नवरंगरा
दस्तूरखुद

नोटिस—आनंदराव अमृत देशपांडे मामले बाळापूर यांस खालीं सही करणार यांजकडून अशी कीं आम्हीं ऐवज खुद्द वगैरे मागत असतां देत नाहीं ते येणें प्रमाणें

१८६।. रघोजमराव शंकर मयत याचे वृत्तीचा हिसा वसूल सन १२७९ फसली सालाबदल रुपये १५१।. इनाम जमीनीचा हिसा आकार रुपये अजमासे २६ पांडेपणाचे गावच्या मालकीचा हिसा वाटणी होण्याचे पूर्वींचा अजमासे रुपये १० एकूण १८६।.

१०१ पुर्वा तुमचे सहीचा रुपये ६५ व्याज वर्षें २ आकार ३६ दोहोत्रद्याप्रमाणें

२८७।.

सदरहू रुपयांची अदाई व इनाम जमीनीचा निकाल च्यार दिवसांचे पोटांत करावा न केल्यास या नोटिशीचे खर्चासुद्धा योग्य कोर्टांत दावा करून कोर्टाचे खर्चा समेत सदर्हु रक्कम भरून घेतली जाईल कळावें तारीख १५ मे सन १८७० इसवी

(सही) गोपाळ लक्षुमणराव देशपांडे
बाळापूर दस्तुर खुद

नोटिस — भाऊदेशमुख राहाणार मंडाळेकर तालुके आकोलें यांस खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते की तुम्हीं आम्हांपासून कापड नेलें त्याबदल रुपये ११४८२४३ आपणा कडेस येणें आहे तर ते आजतारखे पासून आठ दिवसांत आमचे येथें आणुन द्यावे. न दिल्यास शिरस्ते प्रमाणें फिर्याद करून नोटिशीचे खर्चा समेत रुपये भरून घेऊ कळावे तारिख २० माहे मे सन १८७० इसवी मुकाम आकोलें.

[सही] परशराम भावासिंगपाटील
गुमास्ते.

नोटिस—पासोना तुपकरी हिंवस रहाणार आकोलें यांस खालीं सही करणार यांजकडून देण्यांत येते कीं तुम्हीं आम्हांपासून नगदी रुपये २५ पंचवीस व शिवाय व्याज दर शेकडा दोन रुपये प्रमाणें येणें असून ते अद्याप पावेतों दिले नाहीं सबब नोटिस देन भाग पडलें तर आज तारखेपासून आठ दिवसांत आमचे रुपये मुद्दल व्याज व नोटिशीचे खर्चासुद्धां आमचे आणून द्यावे नाहीं तर दिवाणी मार्फत फिर्याद करून घेण्यांत येतील कळावें तारिख २० माहे मे सन १८७० इसवी मुक्काम आकोलें.

(सही) परशराम भावासिंग पाटील
दस्तुर गणोबा गुमास्ते.

नोटिस—बुदन वलद मनुभाई पिंजारी राहणार पंचगव्हाण पेठ अवरंगपूर तालुके आकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे कडेस आमचे खाद्याबदल रुपये ८२॥ आक्षरी साढेब्यांशी व्याजा सुद्धां आहेत तर ते तुम्हीं आजतारखे पासून आठ दिवसांत आणून द्यावे न दिल्यास शिरस्तेप्रमाणें मुदल व व्याज आणि नोटिशीचा खर्चा सुध्धां भरून घेण्यांत येईल कळावें तारीख १८ माहे मे सन १८७० इ.

(सही) रेणकादास नवरंगराव
दस्तर खु०

नोटिस—अनंदराव अमृत देशपांडे नाळापूर यांस खालीं सही करणार याजकडून अशी कीं रघासमराव शंकर देशपांडे मयत याच्या वृत्तीचा व जिनगीचा हिसा तुम्हास मागत असतां देत नाहीं तें येणें प्रमाणें

९१॥. रुसुम सन १२७९ फसली सालाबद्दल

३३८—३ जिनगी सन १२७६ फसली साली आपली आपसात वाटणी केल्या बरहुकूम २९ इनाम जमिनीचा हिसा आकार रुपये अजमासे २९

---

२०९॥—३

सदर्हु रुपयांची अदाई व इनाम जमिनीचा निकाल च्यार दिवसांचे पोटांत करावा न केल्यास या खर्चासुद्धां योग्य कोटांत दावा करून कोर्टाचे खर्च भयेत सदर्हू रक्कम भरून घेतली जाईल कळावें तारीख १९ मे सन १८७० इसवी

( सही ) कृष्णराव बळवंत देशपांडे बाळापूरकर दस्तुर खुद.

---

नोटिस—राजश्री रोडबा वलद भगवान देशमूख तर्फ म्हैसपूर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी अज्ञान आहे तुम्ही मजला पालन करणारनेपले म्हणोन मजला समजले आहे परंतु तुम्ही कोणतेही तऱ्हेनीं माझे पालन केले नसोन सांभाळ केला नाहीं मी आपले मामाचे घरीं असोन सर्वस्वी माझें पुत्राप्रमाणें मामा पाळन करितात आणि माझी मातोश्री मरून आज साहा वर्षें झालीं परंतु कधींच तुम्ही माझा समाचार सुध्धां घेतला नाहीं आणि माझें वृत्तीची अव्यवस्था मांडली आहे असें मजला समजलें आहे तर तुम्ही माझे पाळन करूं नये व कोणतीही सही वगैरे माझे तर्फे कागदावर करूं नये केली असतां आम्ही ते रद्द समजू, तुम्ही माझे तर्फे काम करूं नका मी आपले पाळनपोशन करणार सरकारांतून दुसरा ठराव करोन घेत आहे तव पर्यंत तुम्हास मी पाळन करणार समजत नाहीं.

तुम्ही कुळमुखत्यार गोपाळपंत ठेविला आहे त्याचे मुखत्यारपत्र आजतारखेपासून आम्ही रद्द केले आहे आणि नोटिसही दिली आहे.

तुम्ही जी माझे वतनाविशी अव्यवस्था चालविली असोन कामें केलीं याजविशी मी सर्व तुमचेवर पुरावा करीन.

तुम्ही माझेतर्फे कोणतेही कागदावर सही करूनये व माझा पैसा घेऊं नये.

जो तुमचेकडे पैसा माझा मागील वगैरे आहे त्याजविशी हिशेब आम्हास देणें पडेल तो तयार करून दाखवावा पुढें मुखत्यारपत्र वगैरे माझेतर्फे कोणास देऊं नये दिल्यास आम्ही ते रद्द समजून त्याचा पैसा किंवा हक्क आम्ही मजरे देणार नाहीं.

सदरहू नोटिस तुम्ही पाहून या प्रमाणें सर्व व्यवस्था ठेवावी आणि हे पावल्याबद्दल आम्हास उत्तर आठ दिवसांत द्यावें कळावें तारीख १२ मे सन १८७० इसवी.

( सही ) चंद्रभान वलद सुरेभान-अज्ञान पालन करणार तुरेराव देशपांडे परगणे मुर्तिजापुर.

## WANTED.

An English Clerk in the Deputy Commissiener's Office Booldana Salary Rs. 40

---

नोटिस—टोरमल मारवाडी दुकान अकोलें वहिवाटदार हजारीमल यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतें कीं मिति वैशाख शुद्ध २ संवत १९२६ रोजीं मुंबईची रुपये ९०० ची हुंडी पाहिजे होती करितां पदमचंद मारवाडी दलाल यांचे मार्फत हुंडीचें बोलणें होऊन त्याप्रमाणें रुपये ९०० ची नोट अकोलें डांकची पाठविली असोन त्याप्रमाणें हुंडी मागण्याकरितां मनुष्य पाठविला असोन जबाब दिला कीं दोन घटकेनें हुंडी रुपये ९०० ची पाठवून देतो, त्याप्रमाणें आज तारखेपर्यंत हुंडी पाठविलीत, नाहीं, करितां या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं ही पावले वेळापासून च्यार घटकेचे आंत रुपये ९०० व व्याज दरशेकडा दोन रुपये प्रमाणें रुपये दिल्याचे, तारखेपासून रक्कम पटेपर्यंत ज्या कारणाकरितां हुंडी मागितली होती त्या कारणाकरितां वक्तसीर हुंडी न दिल्याकारणानें रुपये १०० चे नुकसान झालें तें नुकसान सुध्धा रुपये पठवावे याप्रमाणें न वर्तल्यास नोटिशीचेव फिर्यादीचे खर्चासुद्धां रुपये भरून घेतले जातील कळावें तारीख १६ माहे मे सन १८७० मुक्काम अकोलें.

( सही ) अबदुल हुसेन उपाफरजी भाई बोहारी दुकान अकोलें

---

नोटिस—गोपाळ बाबणाजी अभ्रिकर रहणार अकोले यास खालीं सही करणार याजडून नोटिस देण्यांत येते कीं, आम्ही अज्ञान असोन आमचा चुलता रोडबा यांजला तुम्ही अनकूल करोन माझे तर्फे म्हैसपूर तर्फेची वकिली कबूल करोन कुलमुखत्यारपत्र घेतले आहे याजविशी ह्या नोटिशीचे तारखेपासोन ते मुखत्यारपत्र आम्ही रद्द केलें आहे आणि असे कळविण्यांत येते कीं, आमचे नांवची कोणतेही कागदावर किंवा पैशावर वगैरे हरएक ठिकाणीं तुम्ही सही करूं नये, केली असतां ती आम्ही कबूल करणार नाहीं. तुम्ही आज तारखेपासून आमचेकडून कुलमुखत्यार नाहीं हो समज घ्यावी.

तुम्ही कुलमुखत्यारपत्र घेतले आंहे त्या सालापासून जो काहीं माझे उत्पन्नाचा पैसा तुम्हापाशीं आला असेल त्याजविशी हिशेब तुम्ही दिला पाहिजे आणि आम्हीही घेऊ. तो तयार करावा व आठ दिवसांत दाखवावा

सालमजकूरचा पैसा लवाजम्याचा सुमचे जवळ आला आहे हा पैसा तुम्ही माझे विच्यारलें वांचून कोणते खर्चाकडे नेऊ नये तो पैसा अमानत समजावा. खर्च केला असतां आम्ही मजरे देणार नाहीं.

सदरहू नोटिस पावल्याबद्दल समज घेऊन समजूत घेतल्याबाबद आम्हास उत्तरी आठ दिवसांत जबाब द्यावा तुम्ही म्हैसपूर तर्फेची वकिलीवर नाहीं अशी समज घ्यावी कळावें. तारीख १२ माहे मे सन १८७०

( सही ) चंद्रभान वलद सुरेभान अज्ञान पालन करणारा तुरेराव देशपांडे परगणे मूर्तिजापुर.

## जाहिरात.

उमरावती येथें कपाशीच्या प्रेसाचें घर व दोन बंगले तातडतोब बांधणें आहेत. हा मक्ता घेण्याचा हक्क असणारांनीं टेंडरे द्यावीं. विशेष माहिती पाहिजे असेल त्यांनीं उमरावती येथें मिस्तर आगष्टस बुगेल ह्याजकडे मागितली असतां मिळेल.

तारीख ९ माहे मे सन १८७० इसवी

---

To CONTRACTORS.

Tendors are hereby invited for the immediate construction of a Cotton Press House and two bung lows at Oomraotee. For further particulars apply to Mr. Ang.

Oomravttee 9 th may-

---

### गोपीचंद नाटक.

या नावाचें हिंदुस्थानी भाषेंत व बाळबोध लिपींत एक नवीन पुस्तक सोलापुरास रा. रा. अण्णाजी गोविंद इनामदार यांनीं तयार करून आपले कल्पतरु छापखान्यांत छापिलें आहे व त्याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. याची किंमत ८१२ बारा आणे व डाकहशील एक आणा आहे. पुस्तक नाटकाचें असून चांगलें सुरस आहे

---

### फौजदारी काम चालविण्याविषयीं कायदा सटीक.

हें नव्या क्रिमिनल प्रोसिजर ( सन १८६९ च्या ८ वे ) कायद्याचें मोठें पुस्तक टीकेसुद्धां व त्यावरील हायकोर्टाचीं सर्क्युलरें, ठराव, व इतर ग्रंथकारांचे अभिप्राय यांसुद्धा रा. रा. नारायण बाळकृष्ण चितळे ऊर्फ रावजी भाजेकर ठाण्याचे वकील यांनीं तयार करून ज्ञानप्रकाश छापखान्यात छापिलें, त्याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. हें पुस्तक संग्रह करण्या लायक आहे. याची किंमत ७ रुपये व डाकहशील ७ आणे पडतें.

---

### कवितासारामृत

अथवा

महाराष्ट्र भाषेच्या कवितांतलि वेंचे.

सर्वांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं वरील नांवाचा ग्रंथ आम्हीं तयार करून अकोलें येथें वऱ्हाड समाचार छापखान्यांत सुंदर टाइपांवर छापवीत आहो. सदर्हू ग्रंथांत वामन पंडित, मोरोपंत अनंत कवी आदिकरून कवींच्या कविता फारच सुरस, व मनाल्हादक अशा आहेत. तर सर्वत्र देशबांधवांनीं यास उदार आश्रय द्यावा. हा ग्रंथ घेणारास सुलभ पडावा म्हणून याची किंमत फारच थोडी ठेविली आहे आगाऊ जून महिन्याचे आंत देणारास ८१२, फक्त सही देणारास ८१४ आणे, आणि मागाहून ग्रंथ तयार झाल्यावर देणारास १ रुपया पडेल याशिवाय टपाल खर्चाबद्दल दोन आणे पडतील. याप्रमाणें किंमत ठेविली आहे. तिकिटें पाठविणारांनीं अर्धआणे दराची वर्ताळ्यासह पाठवावीं. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. सदर्हू ग्रंथ रा. रा. शिवचंद नलदेवभाई मारवाडी दुकान भडगांव यांजकडे मागितला असतां मिळेल

तारीख २० माहे एप्रिल सन १८७०

( सही ) श्रीधर नारायण भडगांवकर जिल्हा खानदेश.

---

## जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें या सालचीं ग० ग० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्री साठीं आलीं आहत. किंमत दर प्रतीस ८३ आणे.

---

| किमतीचे ठराव. | रु. | आ. |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास… … | ६ | ० |
| साल अखेर … … … | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ … … | ३ | ८ |
| एक अंकास … … | | ९ |
| फुटकळ … … … | ० | १ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ९२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालआखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरु तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

### नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ८१८६

इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ८४

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

---

**सूचना**—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

---

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अकटोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें त्यास अडीच वर्षें होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस हो विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं-

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं आजबदलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्ध आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल.ता० १० माहे आकटोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छा. प्र. केलें.

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

AKOLA :—SATURDAY EVENING, MAY 28, 1870 NO.2

पुस्तक ५ अकोला, शनिवार सायंकाळ, तारीख २८ माहे मे सन १८७० इ०. अंक २०


## वऱ्हाडांतही प्रयत्नास यश.

खटपटीस सर्वकाळ यश येतेंच असा भरवसा नाहीं, तरी दैवावर हवाला ठेवून बसण्यापेक्षां किंवा आळशी राहण्यापेक्षां खटपट करीत असावें व ती खटपट चांगली असून चांगल्याविषयीं असावी म्हणजे परमेश्वराचें सहाय मिळण्यास आशा असते. राज्य इंग्रजसरकारचें, मुलुख कायदेशीर, न्यायाधीश विद्वान, आणि भाडभोड किंवा लाचलुचपत यांचें प्राबल्य कमी अशा स्थितीमध्यें उद्योगास मोठी फाव असते व मनुष्याच्या उमेदी सदा टवटवीत असतात तरी तेथेंही कधींकधीं खटपटी फसतातच, मग आमच्या मुलखाविषयीं बोलावयास कशास पाहिजे? एथें राज्य इंग्रज सरकारचें, पण सत्तचें नाहीं फक्त हवालदारीचें, मुलुख नानरेडगुलेटेड म्हणजे बेकायदी, आणि अंमलदार लष्करी म्हणजे सिविलियन नव्हेत ( फक्त एकादे असतील ) अशा संजोगांत खटपटीस यश येणें म्हणजे मोठें दिव्य उतरणें आहे हें तर खरेंच, परंतु तसें केलें पाहिजे. जुनीं राज्यें ताब्यांत घेतलीं म्हणजे इंग्रजसरकार कांहीं वर्षें तेथें कमीशनरी अंमल ठेवीत असते याजविषयींचा सरकारचा हेतु दुसरा कांहीं असला तर असो परंतु मुख्यत्वें एक दिसतो कीं लोकांस इंग्लिश राज्याचें वळण लागलें पाहिजे, म्हणून जेव्हां जेव्हां अडचणी आपणावर येतील, अन्याय होतील, दाद लागणार नाहीं, तेव्हां तेव्हां खटपटीच्या द्वारें आपण आरोळ्या मारून सरकारचे कान झणाणविले पाहिजेत, व आपण कायदेशीर अमलास आतां पात्र झालों, अंधारांतून आम्हांस उजेडांत घ्या, ब्रिटिश सरकारच्या इमानी रयतेचे जे संस्थापित हक्क आहेत त्यांचें कृपादान आम्हांस द्या असा ध्वनी त्या आरोळ्यांत दुमदुमविला पाहिजे झणजे कार्यभाग झाल्यास होईल. आतां अशा मुलखांत असें करणेंही जरा जोखिमाचें व प्रसंगवशात नुकसान करणारें आहे हेंही आम्ही जाणतों तरी सर्वांनीं सर्वच गोष्टींत पौरुषहीन वागल्यास देशाचें हित व सुधारणा आणि लोकोत्तर ख्याति कशी व्हावी? हल्लीं एकुणिसाव्या शतकांतील सत्तरावें वर्ष झणजे सुधारणेचें दिव्य युग चाललें आहे तर आतां अजून किती काळ डरावें,? छी:! भित्रेपणा कांहीं कामाचा नाहीं. खोटें करून ये व खऱ्यास डरूं नये. आपल्या बेकायद्याच्या मुलखांतच सनदी वकिलांच्या पुन्हा परीक्षा घेण्याचा ठराव केला होता तेव्हां वकिलांनीं कंबरा बांधून हिंदुस्थान सरकारापर्यंत मजल पोंचविण्याची खटपट केली व त्यांत ईश्वरानें त्यांस यश देऊन परीक्षेचा ठराव रद्द केला. तशीच उमरावतीस सावकार लोकांनीं एक खटपट केली व तींत त्यांस यश आलें तो प्रकार असा:—

या महिन्याचे १० वे तारखेस उमरावतीच्या कित्येक सावकार लोकांनीं डिपुटी कमिशनर साहेबांकडे अर्ज केला कीं, मे महिन्याच्या सुटींत दिवाणी कोर्टें बंद आहेत अशी संधी पाहून कांहीं लोकांनीं दिवाळीं काढिलीं व कांहींकाचा दिवाळीं काढण्याचा विचार आहे यामुळें आमचें फार नुकसान आहे. याजकरितां दिवाणी कोर्टें खुलीं केलीं असतां आम्हा लोकांस एकदम फिर्यादी दाखल करून अवल जप्ती मागण्यास ठीक पडेल. यावर डिपुटी कमिशनर साहेबांनीं त्यांस कळविलें कीं कोर्टें रेसिडेंट साहेबांच्या हुकुमानें बंद असतात व तीं खुलीं करण्यास त्यांचीच परवानगी पाहिजे. या हुकुमावरून सावकारलोकांनीं तारायंत्रांतून रेसिडेंट साहेबांकडे अर्ज केला व कोर्टें खुलीं असण्याची अशा प्रसंगीं फार अवश्यकता दर्शविली. व तिजकडे रेसिडेंट साहेबांचें मेहेरबानीचें लक्ष्य पोंचून त्यांनीं उमरावतीस असि० कमिशनर मि० रतनजी साहेब यांचें दिवाणी कोर्ट आहे तें तुमच्या कामाकरितां मे महिन्यांत खुलें राहील असा अर्जदारांस जबाब पाठविला व कोर्ट खुलें केलें. पुढें गेल्या आठवड्यापावेतों पंधरा वीस फिर्यादी होऊन अवल जप्त्याही निघाल्या आहेत असें सत्यप्रकाशावरून कळतें.

यावरून आम्हीं आमचे वऱ्हाडवासी गरीब प्रजेस उमेद देतों कीं, अडचणीचे निवारणार्थ दाद मागण्याची योग्य खटपट करण्यास त्यांनीं तिळमात्र चुकत जाऊं नये. मागावें म्हणजे मिळतें हा साधारण नियम सर्वत्र आहे तर मग आपल्या बेकायदी मुलखांतच न मागतां गरज पुरवावयाची कृतयुगांतील धर्मराज्य रीति कोठून बरें येईल? मागितलें असतां, व न देण्यास योग्य सबब नसतां, इकडील अधिकारी न देण्यास मुकत्यार आहेत, व मुलकाचे विशेषणावरून तसें करणें त्यांस शोभेलही, परंतु मुळीं आपण न मागतां उगीच भलत्याच साधुवृत्तीच्या आरोपांत त्यांस आणणें हें सांप्रतचे स्थितीप्रमाणें दोषावह नसावें काय?

## गणेश शास्त्री यांचें अपील.

आमचे मालवणकर गणेश शास्त्री बुवास डा. फ्रेजर साहेब माजिस्त्रेट यांनीं बत्तिस दिवसांचे कैदेची शिक्षा दिली होती तो अन्याय झाला म्हणून त्यांनीं अपील केलें होतें त्याचा निकाल गेल्या शुक्रवारीं असा झाला कीं अपराध शाबित आहे व मालवणकर यांनीं बत्तिस दिवसांची कैद भोगावी किंवा १०० रुपये दंड द्यावा त्याप्रमाणें ते दंड देऊन मुक्त झाले.

काय हा खाजवून अवधान आणण्याचा स्वभाव! घरच्या भाकरी लाऊन लष्करची उठाठेव करावयाची ती यासच म्हणावी. उत्तेजक पक्षाच्या लोकांनीं पुनर्विवाह केला. शंकराचार्यांनीं त्याच्या सशास्त्रते प्रीत्यर्थें वाद करविला व शेवटीं आपला निर्णय लिहिला आणि तो लोकांस कळविण्याकरितां सभा भरविली व तींत तो निर्णय वाचविला. शंकराचार्यांकडे या प्रसंगीं शास्त्रीमंडळी थोडी जमली होती असें नाहीं व पुण्यास त्यांच्या साच्छिष्य गृहस्थ मंडळींतही तो कागद वाचून दाखविणारे थोडे होते असें नाहीं; परंतु मुंबईच्या रेलवे आफिसा कडील आमच्या मालवणकर राइटर शास्त्र्यांच्या मुखास कंडू अनिवार म्हणून तत्शमनार्थ त्यांनीं त्या दिवशीचा तो सर्व समारंभ अंगें संपादिला म्हणजे निर्णयपत्र वाचिलें व नंतर स्वतांचें व्याख्यान दिलें; त्यावेळीं तर केवळ त्यांनीं औट घटका शिराळशेटीप्रमाणें हजामाचाच अवतार घेतला होता व त्या भाषणपर्वणींत त्यांनीं नारायण बापुजी गोरे, विष्णुशास्त्री, ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, त्यांचेकर्ते, ईश्वरचंद्र विद्यासागर, पुनर्विवाहोत्तेजक मंडळी इत्यादिकांची आपल्या मतें मुंडणें केलीं, परंतु शेवटीं झालें विपरीत, झणजे "केलें तुला व भावलें मला" या म्हणी प्रमाणें मालवणकर बुवांचें मात्र दोन कोर्टांत कित्येक हजार रुपयांच्या खर्चानिशी तावून सुलाखून मुंडण झालें व खोटा दाम पदरीं आला. म्हणजे मालवणकरास कैदेची व दंडाच्या शिक्षेचीं भूषणें मिळालीं व त्यापैकीं त्यानीं एक पतकरिलें.

या एवढ्या खटाटोपावाचून गणेश शास्त्र्यांचें कांहीं अडलें होतें काय? नाहीं. परंतु स्वभावास औषध कोठलें? अस्तु, आतां तरी आम्हीं त्यांस शिफारस करितों कीं हा दुराग्रह त्यांनीं सोडावा, यांत पुण्यांश नाहीं, उलटें त्यांत विधवांच्या तळतळाटाचें व चालत्या काळच्या सुधारणेस बळेंनें आड आल्याचें मात्र यांत श्रेयसंपादन झालें व हिंदुस्थानभर अपकीर्ति झाली. दुसरें काय द्यांत कांहीं पडलें नाहीं. नवी गोष्ट त्यांस उमजत नाहीं असें नाहीं, पण हठाग्रह प्रबल त्यास इलाज नाहीं. शंकराचार्यांनीं आपले जबानींत स्पष्ट सांगितलें कीं मालवणकर यांस कसलीही गोष्ट बोलण्यास आम्ही आज्ञा दिली नव्हती. तेव्हां पहा कीं ज्यांच्या बाजूचे म्हणून लोकांत मिरवावयाचे ते तर वेगळेंच झुगारून देतात मग अपयशाखेरीज अन्य संपादन कोणतें?

## जगद्गुरू शंकराचार्य ह्यांची जबानी.

पुण्यांतील गोरे ह्यांच्या फिर्यादीच्या निकालाचे कांहीं कागद नुकतेच छापून प्रसिद्ध झाले आहेत. त्यांत श्री० ज० शंकराचार्य ह्यांची जबानीही आहे. तिजवरून साफ दिसतें कीं, ह्या प्रसंगीं श्री० ज० शंकराचार्य ह्यांनीं आपले नांवास व पदवीस अनुरूप अशा रीतीनें साक्ष दिली. पुष्कळांस असें वाटत होतें कीं, हे मुख्य साक्षीदार आहेत आणि हे गणेश बापूजी मालवणकर यांजकडचे आहेत. तेव्हां ते खचीत त्यांस साधक अशी कांहीं तरी साक्ष देतील. परंतु, त्यांनीं तसें केलें नाहीं; जें खरें होतें तेंच सांगून त्यांनीं आपलें नांव राखिलें हें फार चांगलें झालें. ती जबानी फार लांब आहे व तिजमध्यें अनेक गोष्टींचा संबंध आला. आहे खटल्याच्या साक्षीसंबंधीं तिजमध्यें खूप खुलासा झाला हें चांगलेंच झालें परंतु आणखी या जबानीमध्यें अशा कांहीं गोष्टी आल्या आहेत कीं, तेणेंकरून श्री शंकराचार्यांकडे किंचित लघुत्व येतें. श्री० ज० शंकराचार्य म्हटले म्हणजे हिंदुधर्माचे मुख्य गुरु, ह्यांस हिंदुधर्मशास्त्र येणें अवश्यक आहे; आणि तें त्यांस येत असतें असें सर्व लोक समजतात; परंतु ह्या जबानीनें सर्व भ्रांती नाहींशी केली. शंकराचार्यांस प्रश्न करतां करतां, तुह्मांस शास्त्र येतें कीं नाहीं, ह्या प्रश्नावर पाळी आली, तेव्हां त्यांस खरें सांगणें भाग पडलें. त्या वेळीं त्यांनीं उघड सांगितलें कीं. मला शास्त्र मुळींच समजत नाहीं. हर! हर!! हर!!! ज्या गोष्टी आपणास अवश्यक माहित असाव्या, त्या जरी आपणास येत नसल्या तरी त्या येतात असें लोक जनांत दाखवितात; अथवा निदान त्या आम्हांस येत नाहींत असें तरी उघड म्हणत नाहींत हें कशा साठीं? तर अन्नासाठीं. अशी स्थिती असून तद्विपरीत आचरण श्री० ज० शं० ह्यांस ह्या प्रसंगीं करावें लागलें, ही गोष्ट फार दुःखाची आहे. पुरती संध्या येत नाहीं असे ब्राम्हण आज पुष्कळ आहेत. परंतु मला पुरती संध्या येत नाहीं, असें एक असामी तरी चार चौघांत आपोआप कबूल करील किंवा नाहीं ह्याचा आम्हांस संशय आहे. ह्या जबानीनें शंकराचार्यांच्या सत्यवाणीविषयीं लोकांची खातरी केली परंतु एवढे थोरले ते आपणास जगद्गुरु म्हणवीत असून त्यांस शास्त्र मुळींच माहित नाहीं, हें पाहून लोकांस वाईट वाटल्या वांचून राहणार नाहीं

शंकराचार्यांच्या जबानींत आणखी एक त्यांच्या त्रिदास उणी अशी गोष्ट दिसून येते ती ही:—त्यांस प्रश्न झाला कीं, आपण कधीं एके गावीं खोट्या पक्षाकडे होता किंवा नाहीं? स्वामीनीं उत्तर दिलें

एकेवेळीं अष्टागर मुक्कामीं आम्ही गेलों होतों तेथें एका प्रकरणांत दुफळी झाली होती. खऱ्या पक्षाकडे थोडे बत्तिस लोक होते व खोट्या पक्षाकडे बाकी सर्व गावची मंडळी अजमासें पाचशें होती. जिकडे बहुमत तोच पक्ष शास्त्रमान्य असें म्हणून आम्ही जिकडे पुष्कळ होते त्या पक्षाकडे वळलों. आतां या उत्तरावरून शंकराचार्यें शास्त्रार्थाची खात्री किती समजतात तेंही दिसून येतें. बहुत लोकांची मर्जी राखणें हाच खरा शास्त्रार्थ असें शंकराचार्यांनीं स्वमुखानें म्हणावें याहून दुसरें उणें काय आहे! व असें जर आहे तर मग पुनर्विवाहसंबंधीं त्यांच्या शास्त्रनिर्णयाची मातबरी ती काय?

आणखी दुसरी एक गोष्ट या जबानी वरून अशी दिसून येते कीं, श्री० शं० हे अगदीं मोकळ्या मनाचे व नम्र आहेत. त्यांनीं जबानीमध्यें साफ कबूल केलें आहे कीं, मालवणकर ह्यांनीं सभेमध्यें. रा० रा० नारायणराव गोरे ह्यांस "काळे" म्हटलें हें आम्ही ऐकिलें; व तें न बोलण्याविषयीं आम्हीं हुकूम केला असता तर चालला असता, कारण त्या सभेमध्यें आम्ही अध्यक्ष होतों. परंतु आम्ही तसें केलें नाहीं ही चूक आहे. ह्या हकीकतीवरून, आचार्यांच्या इमानीपणा विषयीं कोणाची ही खातरी होईल. आतां, असें बोलणें बंद करणें हें स्वामींच्या हुकुमांत असून त्यांनीं बंद कां केलें नाहीं? असा एक प्रश्न येथें सहज उत्पन्न होतो, आणि हा कांहीं सामान्य प्रश्न नव्हे, तथापि त्याचा विचार करण्याचें आतां कारण नाहीं. म्हणून आम्हीं तो तूर्त एकीकडे ठेवतो.

## भोजनकुतूहल.

या नावाचें स्वयपाक संबंधी शास्त्राचें एक नवीन पुस्तक मुंबईस रा. पुरुषोत्तम गंगाधर भेंडे नावाचे गृहस्थ तयार करीत आहेत. तें सर्वप्रतीच्या लोकांस फार उपयोगी होईल असें दिसतें. याची जाहिरात कालच आम्हांकडे आली ती आम्हीं प्रस्तुत आपले वाचकांकरितां एथें दाखल करितों. हीं पुस्तकें कोणास पाहिजे असतील त्यांनीं आम्हाकडे पैसा, सह्या, पत्रें वगैरे पाठविण्यास मालकांस कबूल आहे व आमचे मार्फतीनें त्या लोकांस पुस्तकें देण्याचेही मालक कबूल करिताहेत.

### मागाहून आलेल्या जाहिराती

### जाहिरात

**भोजन कुतूहल** या नावाचें पाकशास्त्र गौरी, नल, भीम, सूर्य, सुश्रुत, वाग्भट, इत्यादिकांच्या प्राचीन मतानुसारें क्षेमशर्म वैद्यानें बहुत वर्षांमागें श्रीक्षेत्र वाराणशी एथें संस्कृत भाषेंत केलें तें या देशीं दुर्मिळ याकरितां महत् प्रयासानें सदर्हू ग्रंथ श्री क्षेत्र वाराणशींतील एका प्रसिद्ध पुस्तकालयातून आणवून प्राकृत टीकेसहीत छापून लोकोपयोगार्थ प्रसिद्ध करावा या हेतूनें काम चालविलें आहे, तर या कृत्यास विद्वज्जन आपला उदार आश्रय देतील अशी आशा आहे.

ग्रंथांत बारा प्रकरणें आहेत, पहिले प्रकरणीं ग्रंथकर्त्याची वंशप्रशंसा, दुसरे प्रकरणीं स्वयपाकघर, अन्नसंरक्षणार्थ पात्रें, आणि सामग्री कशी काय असावी हें सर्व सांगितलें आहे, तिसरे प्रकरणांत आचार्यांचे गुण, व विषम आहाराचें लक्षण, चतुर्थ प्रकरणीं ऋतुलक्षण, पांचवे प्रकरणीं दिनचर्या, सहावे आणि सातवे प्रकरणीं नानाविध मांसांचे गुण आणि शिजविण्याच्या तऱ्हा, आठवे प्रकरणीं षड्विध शाखांचा बोध, नववे आणि दहावे प्रकरणांत उत्तम प्रकारचीं षड्रस अन्नें, पक्वान्नें कशीं करावीं हें सांगितलें आहे. अकरावे प्रकरणांत क्षुद्बोधक पदार्थ सांगितले आहेत, आणि शेवटील म्हणजे बारावे प्रकरणांत पायस आणि पानक यांविषयीं विचार सांगितला आहे. सदर्हू बारा प्रकरणें मिळून या ग्रंथाचे संस्कृत सुमारें १००० श्लोक आहेत. त्यांची प्राकृत टीकेसहित अष्टपत्री साच्याचीं अजमासें २५० पासून २७५ पृष्ठें होतील.

हें पुस्तक सुमारें तीन महिन्यांचे आंत सुंदर टैपावर छापून तयार होईल. याची किंमत आगाऊ तारीख १ जुलै १८७० चे आंत देणारास रु० २ नंतर दोन महिन्यांचे आंत म्हणजे पुस्तक छापून तयार होण्याचे पूर्वीं देणारास रु० २॥ आणि मागाहून ग्रंथाची किंमत रु० ३ अशी ठरविली आहे. बाहेर गांवचे वर्गणीदारांस टपालखर्च पडेल.

ज्यांस या ग्रंथास आश्रय देण्याची अंतःकरणपूर्वक इच्छा असेल त्यांणीं वर लिहिल्याप्रमाणें किंमत पाठविणें अगर सही देणें तर काळकादेवीच रस्त्यावर रा० रा० आत्माराम सगुण बुकसेलर, लोहारचाळ घर नं. १९ येथें रा० रा० माधवराव चंद्रोबा, गिरगांव पोपटजीचो वाडो घर नं. १० येथें रा० रा० विनोबा सदाशिव दळवी, अगर खालीं सही करणार यांजकडेस पाठवावीं म्हणजे पुस्तकें तयार झाल्यावर पावतीं केलीं जातील.

| | |
|---|---|
| मुंबई, तारीख २० माहे मे सन १८७० | पुरुषोत्तम गंगाधर भेंडे. लोहारचाळ अंतोबा गोसाव्याचीवाडी घर नं. १७ |

नोटिस—महादु वल्लद तानाजी जाकूर रहती मौजे झाडगांव तालुके बाळापूर जिल्हा अकोला यांस खालीं सही करणार नोटिस देते ऐशीजे मी तुझी लग्नाची बायको असून सहा वर्षें झालीं हांपांत आलें तेव्हांपासून तूं पुरुषत्वांत नाहींस आजवर पुरुषत्वांत रहा पाहिली पण आज हो पहिल्याच दिवस आहे. आणि माझे संसाराचें चीज व्हावें तसें होण्याची निराशा आहे सबब ह्या नोटिशीनें कळवितें कीं तूं पुरुषत्वांत आहेस अशी खात्री आज पासून आठ दिवसांत करून द्यावी किंवा फारकती द्यावी मला एक मुलगा आहे तो तूं आपला अयव छपविण्यासाठीं तूं व तुझे आईबापानी माझे इच्छे विरुद्ध अन्य पुरुषापासून उत्पन्न करविलास हें तूं जाणत आहेसच आणि अशा व्यभिचारानीं संतती वाढविणें हें धर्मविरुद्ध अनीतीचें काम आहे म तसें पुढें वागण्याची माझी खुशी नाहीं करितां फारकती द्यावी हें तुमला धर्मास व नीतीस योग्य आहे करितां वरील मुदतींत फारकती न दिल्यास किंवा पुरुषत्वांत आहे अशी खात्री न कल्यास तूं नपुसक आहे असें कबूल केलेस व फारकती शिवाय मी दुसरें लग्न करणार त्यास तुझी मान्यता आहे असें समजून मुदतीनंतर मी दुसरा नवरा करीन कळावें तारीख २९ माहे मे सन १८७० इसवी मुक्काम अकोलें.

(सही) जानकी मर्द महादू हल्लीं वस्ती इछपूर तालुके बाळापूर इचे हातची निशाणी.

## वऱ्हाड

बाळापुराहुन पत्र आल्यावरून कळतें कीं कापड विणणाऱ्या मोमिनाच्या एका मुलास व मुलीस निजल्या ठिकाणीं सर्पदंश होऊन तीं मरण पावलीं. व तो सर्प पुढें शेजारचे घरवाल्यांनीं मारिला

एका कासाराचे घरास आग लागली होती व तिचे संबंधानें दुसरीं तीन च्यार घरें जळालीं. याहून दुःखाची गोष्ट ही कीं एक मूल त्या आगीच्या झपाट्यात जळून गेलें!

उष्णता पराकाष्ठेची होतआहे. सकाळचे नऊवाजल्या पासून संध्याकाळचे पाच वाजत पर्यंत मनुष्याच्यानें घरा बाहेर निघवत नाहीं

साल गुदस्तां बाळापुर शहरांत नेहमीच चोऱ्या होऊन नुकसान झालें होतें परंतु साल मजकुरीं हा काल पर्यंत तसा प्रकार नाहीं ह्मणून पोलिसाची तारिफ केली पाहिजे

नागपुराकडील वर्तमान पत्रांत असें लिहिलें आहे कीं, तिकडील प्रांताकरितां एक लेफटिनेंट गवनर नेमणार व त्याचेच ताब्यांत वऱ्हाड प्रांत देणार व हैदराबादच्या रेसिडेंटची जागा कमी करणार. हें लिहिण्यास त्या पत्रकर्त्यास काय आधार असेल तो असो. बाकी वऱ्हाड प्रांत जो हैदराबाद सरकाराकडून इंग्रजांस मिळाला आहे तो तहनाम्या वरून आहे. व त्याच तहनाम्यांत आणखीं असें लिहिलें आहे कीं, हा प्रांत दुसरे कोणते प्रांताशीं न जोडतां हैदराबादेस जो रेसिडेंट राहील त्याच्याच हिमतींत ठेवावा. यावरून हा प्रांत नागपुरास जोडला जाऊं नये असें दिसतें पण याची कमीशनरी मोडून कायदेशीर अमला खालीं हा लवकर आला तर रयतेस फार सौख्य होईल यांत संशय नाहीं. आणि इंग्रज सरकारानें असें करावयाचें मनांत आणलें तर त्यांस अवघड आहे असें नाहीं. इंग्लिश सरकार सार्वभौम असून हिंदुस्थानांतील बाकीचीं राज्यें केवळ मांडलिक संस्थानें आहेत सबब हे शाचे बऱ्या करितां तहनाम्यांत बदल करण्यास किंवा नवीन पुरवणी तहनामा करण्यास त्यांस अवघड आहे असें नाहीं. मग का घडतें तें पाहावें

का० वेंकजी साहेब वाशिमचे इनचार्ज असिस्टंट कमीशनर यांस जिल्ह्यांतील मुख्य ओरिजनल कोर्टाच्या फुलपावरचा अधिकार दिला.

का० डी डब्ल्यु लाटन साहेब आसिस्टंट कमिशनर जोंपर्यंत उमरावतीस आहेत तोंपर्यंत त्यास क्रि. प्रो. चे ४४५ अकलमांतील अधिकार दिला.

लेफटिनेंट एच डी. पी गेनिक असिस्टंट कमिशनर यांस जस्टिस आफ धि पीस नेमिलें व यांसच रेलवेमाजिस्त्रेटचा अधिकार दिला.

कोर्ट फीचा नवीन आक्ट सन १८७० चा ७ याचे कलम तीन बरहुकूम विकटणारे स्टांपानें फी घेण्याचा हिंदुस्थान सरकारचा ठराव झाला.

उन्हाळ्याचे प्रखर तापाकरितां इकडील सर्व शाळांस मे महिन्याची सुटी असते ती मंगळवारीं खलास होऊन वुधवारीं पहिले तारखेस दोन हायस्कुलें शिवाय करून सर्व शाळा सुरू होतील व हायस्कुलें दहावे तारखेस सुरू होतील.

मेजर मेंजिस व मेजर मेन अनुक्रमें उमरावतीचे व वणीचे आफिशियेटिंग डिपुटी कमिशनर यांस क्रि० प्रो० चे ४४५ अकलमांतील अधिकार दिले.

## अकोला

एथें द्रविड देशांतून कोणी पंचाग्नसाधनी बुवा आले आहत. ते गांवाबाहेर रेलवे पुलाकडे उतरले आहेत व भर बारा वाजल्यापासून च्यार वाजत पर्यंत ते आपल्या सभोवार पाच अग्नी भडका पेटवून मध्यें उघडे बोडके बसत असतात असें ऐकिलें. अशा उन्हाळ्याचे नुसत्या उन्हांत अशा वेळीं च्यार तास बसाण्याचेंच किती अवघड, त्यांत आणखी सभोवार अग्नी पेटवून म्हणजे केवढें साहस आहे? व हा हठयोग कशाकरितां?

डिपुटी कमिशनर मि० हार्डन साहेब यांची स्वारी एथें आहे व आतां फिरावयास जाणार नाहीं असें दिसतें.

उन्हाळा विशेष तर झाला आहे खरा परंतु वाऱ्यानें आळीकडे सतत १९ दिवस अशी कांहीं मौज केली आहे कीं त्यामुळें उन्हाची पीडा तादृश होत नाहीं. मध्यंतरीं दोन दिवस अभ्रे आल्यानें मात्र ऊष्णा विशेष झाला होता.

बाळापुर तालुक्यांतील अंदुर गावाहून कोणी लोक आले त्यांच्या सांगण्यांत तेथील दोघा देशमुखांनीं आपसात जुलमानें कांहीं पट्टी करून वसूल घेतला व लोकांस पीडा दिली. आमचे बाळापुराकडील बातमीदार याबाबें आम्हांस खुलासा लिहितील असें आम्हीं इच्छितों. व अधिकाऱ्यानींही या गोष्टीकडे लक्ष्य द्यावें.

एथील वकील रा० रा० अमृतराव आनाजी यांनीं नाशकास ज्ञानमंदार छापखाना आपले मुलाचे नावें भागीदारींत ठेविला होता त्यांचें व दुसरे भागीदार रा. रा. हरी भास्कर टिळक यांचे न जमल्यामुळें वकिलांनीं आपला भाग काढून घेऊन टिळकाकडे सर्व कारखाना सुपूर्द केला. आलीकडील आम्हीं लोक अधिक शाहणे व समजुतदार होत चाललों आहों असें म्हटल्यास चालेल पण पातीदारीनें व्यवहार करण्याचें कसब आम्हांस अजून आलें नाहीं व पातीचा व्यापार उत्तम प्रकारें करण्याजोगा आम्हांमध्यें विश्वास, नेकी व उद्योग वसत नाहीं असें दिसतें, व याबद्दल वाईट वाटतें. मारवाडी लोक आम्हांपेक्षां कमी विद्वान आहेत पण व्यापारांत ते आम्हांस शिकवण्या लायक आहेत यांत संशय नाहीं.

मि० ए जे डनलप आफिशियेटिंग असिस्टंट कमिशनर यांस ३०, रुपये पावेतों दिवाणी दाव्यांचा अधिकार मिळाला

रेलवे कडील रेसिडेंट इंजिनियरचें एथें आफिस आहे त्यांच्या कामा पैकीं कांहीं कामें मस्यानें देणार असल्याचें समजतें व तसें झाल्यास आज बारा पंधरा क्लार्क आहेत त्यांतून कित्येकांस चुका लागल असें दिसतें व तसें होण्याची सुरवातही झाली आहे.

मि० श्रीकृष्ण नरहर एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर हे मि० ब्राह्मणजी साहेबांचें काम पाहत आहेत तों पर्यंत त्यास फुलपावर माजिस्त्रेटचा व ५००० रुपयांवरील दाव्याच्या इनसाफाचा अधिकार दिला आहे.

## वर्तमानसार.

YESTERDAY (23rd) an information for defamation was laid by Mr. Kristnajee Trimbuck Ranaray, the proprietor and publisher of the vernacular newspaper called the *Dynan Prukash,* against Gunnesh Bappoojee Malwunker, before Dr. A. G. Fraser, the Railway Magistrate, and a warrant has been granted. The 31st instant has been fixed for the hearing of this case. We understand that Mr. Gunnesh Bappoojee has already left Poona for Bombay, to appeal against the judgment given by Mr. Newnham on Friday last.—

YESTERDAY (23rd) Mr. Narrain Bappoojee Goray, the prosecutor of Gunnesh Bappoojee, laid an information before Dr. A. G. Fraser, the Railway Magistrate, against Cassinath Gopall, Sunker Bhut bin Munteeram Bhut, Suddasew Abbajee, Cassinath Venaiak Lowndav, and Gunnesh Bhicajee Marathay, for giving false evidence in the defamation case; in support of the defence of Venkut Shastree Mattay and Gunnesh Bappoojee, which case was tried by the above magistrate. Warrants have been issued against the above parties. The hearing of this case is fixed for 1st June.—

MR. J. H. MORRIS, officiating Chief Commissioner, Central Provinces has been confirmed in his appointment. It is believed that Mr. Robert Egerton, Financial Commissioner, Punjab, will officiate for Mr. Morris when the latter takes his leave to England.

THE Nagporepaper says it is in contemplating now to form the Central Provinces into a Lieutenant Governorship, by adding to them the Berars, abolishing at the same time the appointment of Resident at Hyderabad, and substituting an Agent to the Governor General instead.

THE Governor General in Council is pleased to exempt from stamps duty the mortgage deeds executed by salaried officers of Government as security for the due performance their duties.—

H. H. THE RAJA OF KOLAPOOR, accompanied by Captain West, left Bombay for England by the mail steamer yester'ay morning and a salute of the nineteen guns was fired on the occasion. A guard of honour, consisting of a complete company of the 22nd Regiment N. I. with band and regimental colours and under the command of a British officer, paraded at the Apollo Bunder at 6. 45. A. M.; and Lieutenant Colonel Whittaker, of the Staff, was also in attendance to receive His Highness. The Sultan of Lahej left for Aden by the same steamer, and a salute of twelve guns was fired in his honour on Saturday evening.

Bombay Gazette.

निश्चय केल्या प्रमाणें कोल्हापुरचे राजे साहेब २२ वे तारखेस मुंबईहून विलायतेस जाण्याकरितां आगबोटींत बसले. त्यांच्यासन्मानार्थ इंग्रज सरकारची पलटण बंदरावर गेली होती, व १९ तोफांची त्यांस सलामी झाली. यांजबरोबर क्या० वेस्ट साहेब असिस्टंट पालिटिकल एजंट व त्यांचे शिक्षक मि० जमशेटजी नवरोजी उणवाले बी. ए. हे गेले आहेत. आम्ही इच्छा करितों कीं महाराजास हा प्रवास सुखाचा, संतोषाचा, व लाभाचा होवो. व यांचें उदाहरण पाहून दुसरे बहुत संस्थानिक विलायतेस जाण्याची रत पडो.

मुंबईस मि० नारायण दिनानाथजी सेकंड ट्रान्सलेटर व मि० भास्कर सुंदरजी पेनशनर असिस्टंट रेजिस्ट्रार हे दोघे नामांकित गृहस्थ गेल्या मंगळवारीं मरण पावले.

मि० आनस्टी साहेब बारिस्टर हे पुनर्विवाहोत्तेजक मंडळीच्या तर्फे पुण्यास मा इंट जडजाकडे मालवणकरा वरील मुकदमा चालविण्यास गेले होते त्यावेळेस त्यांस जी फी मिळाली तींतून त्यांनीं १००० रुपये पुनर्विवाह फंडास बक्षिस दिले. हें त्यांचें औदार्य वर्णनीय होय.

आनंदकारक वर्तमान कळतें कीं, मि० आनंद चंद्र बरोवे नावाचे बंगाली गृहस्थाची सिविल सर्विसची परीक्षा उतरली.

मि० सिताराम नारायण पंडित या नावाचे गृहस्थ मुंबईहून हिंदुस्थान सरकारची स्कालरशिप घेऊन गुदस्त साली विलायतेस गेले आहेत. त्यांची सालमजकुरीं प्रकृती बिघडल्या कारणानें त्यांस सिविल सर्विसचे परिक्षेस जावलें नाहीं. ईश्वर करो आणि पुढील वर्षी त्यांस त्यांच्या प्रयत्नाचें यश मिळो.

मिस मेरी कार्पेंटर बाई विलायतेस गेल्या आहेत पण तेथें सुद्धां इकडील स्त्रियांचे सुधारणेचा विच्यार त्यांचे चित्तांत निरंतर चालू असतो. ईस्ट इंडिया असोसिएशन मध्यें नुकतेंच हिंदुस्थानांतील स्त्री शिक्षणावर त्यांनीं एक व्याख्यान दिलें

बाबूकेशव चंद्रसेन नावाचे बंगाली गृहस्थ विलायतेस गेले आहेत त्यांची तिकडे चांगली मानमान्यता होत आहे. व त्यांनीं नुकतेच प्रार्थना समेंत एक सुरस व्याख्यान दिलें, त्या समयीं त्यांच्या वक्तृत्वशक्तीची व त्यांतून इंग्लिश भाषेची फार वाहवा झाली.

पतियाळचे महाराजांनीं पंजाबच्या युनिवर्सिटीस ७१२३० रुपयांची वार्षिक नेमणूक करून दिली आहे. हे औदार्य वर्णनीय होय. व नेटिव राजे लोकांचा अशा गोष्टीकडे कल जाऊं लागला हें देशाचें मोठें भाग्य समजलें पाहिजे.

कामदार लोकांकडे पैशाचा वगैरे संबंध असल्यामुळें त्यास जामीन द्यावे लागून जामिनास तारणाकरितां गहाण खतें लिहुन द्यावीं लागतात, तशाप्रकारच्या गहाणखतास स्टांपाची माफी आहे असें नामदार गवरनर जनरल साहेबांनीं ठराविलें आहे.

मि० जे एच मारिस नागपुरचे (सेंट्रल प्राव्हिन्सेस) आफिशिएटिंग चीफ कमिशनर यांची नेमणूक तेथेंच कायम झाली. व ते विलायतेस रजवर जाणार आहेत तेव्हां पंजाबचे फिनानशियल कमिशनर मि० राबर्ट एगर्टन हे आफिशिएटिंग होऊन त्यांचें काम पाहतील असें वर्तमान आहे.

शिंदे सरकारचे ग्वालेर संस्थानांत चालू साली मोठा दुष्काळ पडला आहे, धान्य नाहीं, एकेक गावांत वीस वीस विहिरी पाण्यानें भरलेल्या होत्या पण हल्लीं त्यांत पाण्याचा थेंब नाहीं, दुसरे गावाहून पाणी आणावें लागतें. तसेंच गुरांस खावयास नाहीं; गावचे गांव उठून जात आहेत. शिंदे सरकारांनीं कामदारांस हुकूम दिले आहेत कीं हरप्रकारें रयतेचा बचाव करावा लोकोपयोगी कामें सुरू करावीं, व जमीनींचा सारा घेऊं नये. सरकारही दिवाण साहेबांस बरोबर घेऊन आवर्षणाचे जागा सुभे पाहून आले व त्यांनीं लोकांस सहाय व दम दिला. यासंबंधीं महाराजांचा रिपोर्ट इंग्लिश वर्तमान पत्रांमध्यें साद्यंत लिहून आला आहे. मराठी राज्यांतून असे कागदपत्र प्रसिद्ध होणें म्हणजे सुचिन्ह खरें. आतां ईश्वरानें त्या प्रांतांतील लोकांस आशीर्वाद देऊन दुःखमुक्त करावें.

ज्ञानप्रकाशाचे मालक मि० कृष्णाजी त्रिंबक रानडे यानीं रा० गणेश शास्त्री मालवणकर यांजवर अब्रू घेतल्याची फिर्याद रेलवे माजिस्त्रेट डा० फ्रेजर साहेबांपुढें आणिली आहे. व या महिन्याचे ३१ वे तारखेस तिची चौकशी होणार आहे.

माटे व मालवणकर यांजवरील फिर्यादीच्या संबंधानें ज्या लोकांनीं खोटया साक्षी दिल्या त्यांजवरही रा० नारायण बापुजी गोरे यांनीं फिर्याद आणिली आहे व जूनचे पहिले तारखेस रेलवे माजिस्त्रेटापुढें त्यांची चौकशी होणार आहे.

प्रयागास युनिवर्सिटी कालेज करण्याकरितां विजयनगर, रामपुर, रेवा, काशी वगैरेच्या राजांनीं सुमारें पावणेदोन लक्ष रुपये दिले आहेत. व वायव्य प्रांताचे लेफटिनेंट गवरनर यांनीं सरकारास अशी शिफारस केली आहे कीं सरकारानें पन्नास हजार रुपये हें कालेज बांधण्याकरितां द्यावें व तसें केलें असतां वायव्य प्रांतांतील दुसरीं कालेजें आहेत तीं हायस्कुलाच्या यत्तेवर आणतां येतील.

कपुरथळचे महाराज मरण पावले त्यांनीं आपले स्मारक कांहीं कृत्य करण्याकरितां सवालक्ष रुपये ठेविले होते व त्यांचे चिरंजिवानीं आणखी एक लक्ष रुपये त्यांत भर घालून महाराज साहेबांच्या नावाचें "रणधीर कालेज,, नवें करून चालविण्याचा ठराव केला. व दरसाल दहा हजार रुपये त्यास खर्चास देण्याचाही त्यांनीं ठराव केला आहे.

झांजीबाराकडे महामारीचा उपद्रव सुरू झाला आहे.

गुजरार्थेत गेल्या महिन्यांत डाकूरजीची यात्रा झाली. त्या वेळेस लोकसमाज मोठा जमला होता, व त्यांचा बंदोबस्त मि० डइलसन साहेब पोलिस सुपरिंटेंडेंट व मि० फ्रामजी नसरवानजी डिपुटी कलेक्टर यांनीं फार चांगला ठेविला होता व रोगराई वगैरे बिलकूल होऊं दिली नाहीं याबद्दल मुंबई सरकारानें त्यांची तारिफ केली आहे.

महाबळेश्वर— ता० १८ मे सन १८७० इ० या आठवड्यांत हवेंत बराच फेरफार झाला आहे. कांहीं दिवस अतिशय थंडी होती व पुढें कांहीं दिवस बरीच उष्णता भासत होती. शेवटीं काल तिसरे प्रहरीं एकाएकीं मोठ्या सोसाट्यानें वारा सुटून सर्व दिशा अगदीं धुंद झाल्या. व आकाश अगदीं भरून येऊन सुमारें साडेचार वाजतां पावसाची चांगली सर येऊन पुढें थोड्याच वेळानें आकाश अगदीं स्वच्छ झालें. पर्जन्याचे दिवस नजीक आले. सबब येथील उन्हाळ्याची जत्रा उठण्यास आरंभ झाला आहे.

शु० सू०

नाशिक— हल्लीं हवा कांहींशी पालटण्याचा संभव दिसत आहे.

मे० आर्सकिन साहेब कायमचे कलेक्टर काल रोजीं रात्रीं येथें येऊन दाखल झाले.

चिंचूर येथील सालाबाद प्रमाणें श्रीनृसिंह जयंतीचा उत्साह फारच उत्तम झाला.

ना. वृ.

कापसाचे गठ्ठे बांधण्यांत व्यापाऱ्यांनीं अन्यायानें भेळ वगैरे कांहीं करूं नये म्हणून मुंबई सरकारानें एक नवीन खातें हजारों रुपयांचे खर्चानें स्थापून एक कायदाही केलेला आहे. अन्याय किंवा मिसळामिसळ याच जिनसांत होते असें नाहीं. पैक्या जिनसा पासून सोन्यापर्यंत पदार्थांस हें म्हणणें सारखें लागू आहे. तेव्हां वस्तुतः याच व्यापारांत हात घालण्याचे सरकारास कांहीं कारण नव्हतें; आणि सरकारच्या रिवाजाप्रमाणें असें करणें अन्याय आहे. तथापि विलायतेंतील व्यापाऱ्यांच्या कल्याणासाठीं आमचे इच्छेविरुद्ध पण आमचे खर्चानें सरकारास एवढी खटपट करणें जरूर पडलें. पण हें करणें साधारणतः स्वतंत्र व्यवहारांत इतकें विरुद्ध आहे कीं, विलायतेंतील लोकांनीं ही आमचे सरकारास या कायद्याबद्दल विशेष शाबासकी न देतां उलटी नापसंती दर्शविली. कारण कीं कायद्याचे भीतीनें यथेच्छ व्यापार चालण्यास अडचण पडते. या बाबतींत खुद्द सरकारा वाचून इतर जाणत्या लोकांची पुरी खातरी झाली आहे. मि० रिव्हेट कारन्याक साहेब, काटन कामिशनर, यांणीं थोडे दिवसां पूर्वी आग्रा येथील नेटिव व युरोपियन व्यापाऱ्यांच्या भेटी घेतल्या त्या प्रसंगींही सर्वांचे बोलण्याचा कल हा वरील कापशी कायदा नसावा असाच झाला. आमचें सरकार लौकिक मताकडे कधीं लक्ष देऊं लागेल? हा कायदा हिंदुस्थान सरकारानें नामंजूर केल्याची आनंदकारक बातमी आल्याचें समजतें.

ने. ओ.

सातारा—हवेमध्यें चार पांच दिवस फारच फरक आहे. मंगळवारीं येथें फार नाहीं परंतु जवळच्या गांवीं बराच पाऊस पडला.

सोलापूर—ता० १६ मिनहु रोजीं स्टेशनावर सयद अल्ली मियादअल्ली मुसलमान याणें तिघे प्यासेंजर लोकांपासून मुंबईचें टिकीट काढून देतों म्हणून वीस रुपये अर्धा आणा घेऊन मुंबईचें टिकीट न काढून देता त्या लोकांस फसवून मोहळचें टिकीट काढून दिलें व आपणही त्यांज बरोबर गाडींत बसून मी मुंबईस येतों असें सांगून मोहळचे स्टेशनावरून उतरून गेला पुन: सोलापुरास येण्याच्या गाडींत बसून येण्याच्या इरादानें टिकीट घेऊन फ्लाटफार्मावर उभा राहिला तों फिर्यादी व रेलवे पोलीस हवालदार उभयतां मिळून आरोपीस पकडण्याकरितां त्याच गाडींतून उतरले व आरोपी तेथें उभा होता त्याजला धरिलें त्या खटल्याची चौकशी मेहेरबान माजिस्ट्रेट साहेब बहादुर याणीं ता० १९ मे रोजीं करून पिनलकोड कलम ४०६ प्रमाणें चार्ज ठेवून आरोपी सय्यद अल्ली मियादअल्ली याजला २ वर्षे सक्त मजूरीची शिक्षा दिली.

या आठवड्यांत उष्णता फार आहे. यंत्रांत पारा बाराबर २ वाजतां १०१ अंशापर्यंत असतो. क. त.

मिरजेंत श्रीमंत तात्या साहेब मिरजकर यांचे संस्थानच्या कारभाऱ्याची जागा खालीं झाली होती. तिजवर साताऱ्याचे माजी दप्तरदार रावबहादूर गणेश मार्तंड यांची नेमणूक कोल्हापुरचे पोलिटिकल एजंट याणीं केली असें समजलें आहे.

पुणें—येथें गेल्या आठवड्यापेक्षां कमी दरानें कैली जिनसांपैकीं बाजरी १९ शेर विकूं लागली आहे व बजनी जिनसांपैकीं तेलाचा भाव स्वस्त मागील आठवड्यापेक्षां २॥ शेरांचा झाला आहे.

सन १८७० चा आक्ट नंबर ७ कलम ३ प्रमाणें दिवाणी कोडतांत स्टांप लावण्याचा नवीन आक्ट गेल्या एप्रिल महिन्यापासून सुरू केला आहे. ज्ञा. प्र.

धुळें—आमचे समजण्यांत असें आलें आहे कीं भडगांवचे महालकरी यादव श्रीपत यांणीं यात्रा फंडाचे कामांत हयगय केल्यावरून त्यांस मे० कर्नेलसाहेब यांणीं सस्पेंड केलें आहे. म्हणून समजते.

चाळीसगांवचे अवल कारकून गोपाळ रामचंद्र यांणीं माजि मामलेदार भास्कर मोरेश्वर हे रजेवर असतांना सरकारी खजिन्यांतील कांहीं पैसा वापरला. त्यावर मामलेदार पुन: आपले कामावर आल्यावर वापरलेल्या पैशाची हकीगत त्यांचे नजरेस आल्यावरून तो पैसा पुरा करून घेतला. हल्लीं अवलकारकून यावर चौकशी चालू आहे.

इंजनियर खात्यांतील काशिनाथ दिनकर शिरस्तेदार, गोविंद नारायण ओवरसियर व साई नरसापा ओ० सि० त्यांस १॥ दीड वर्षांची सक्तमजूरीची कैद व एक एक हजार रुपये दंड याप्रमाणें मे. प्रोव. डे सा० न० फ० अ० क० याणीं शिक्षा देऊन ता० १७ रोजीं कैदी मजकूर एथील तुरुंगांत येऊन दाखल झाल्याचें कळतें. व आणखी कांहीं लोकांस वारंट झाल्याचेंही कळत आहे. खा. वै.

# जाहिराती.

नोटिस रा० भास्कर व्यंकटेश तहाशीलदार वाशिम— यांस कळावें कीं तुम्हांकडे वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्रा बद्दल बाकी यावयाची त्यास अडीच वर्षें होऊन गेलीं; इकडून कित्येक वेळां पत्रें पाठविलीं व वाशिमास समक्ष मागितली असतां देण्याची तजवीज केली नाहीं. व आतां अवकाश झाल्यास रकम कायद्या बाहेर जाईल हें आपणा काय देपांडितांस व न्यायासनावर बसणारांस कळवावें लागत आहे ही गोष्ट अजब होय असो. आज नोटिशीनें कळवितों कीं तुम्हां कडील या महिना अखेर २८ रुपये यावयाची बाकी व नोटिशीच्या खर्चा सुध्दा दहा दिवसांत आली नाहीं तर तुम्हांवर फिर्याद होईल व पुढील सर्व सोहळे होतील कळावें तारीख २१ मे सन १८७० इसवी

खंडेराव बाळाजी फडके ब. स. चे मालक.

नोटिस—राजाराम बल्लद शिताराम रहाणार पिंजर तालुके अकोलें यांस खालीं सही करणार यांजकडून देण्यांत येते कीं सन १८६७—६८ प्रमाणें पिंजरचा लवाजमा तुम्हीं आमचे पश्चात् घेतला तो आम्हांस दिला नाहीं तो आम्हांस द्यावा. नाहीं तर रितिप्रमाणें तजवीज करण्यांत येईल करितां सदरहू कारणानें तुमचे मुखत्यारपत्र दिलें होतें तें रद्द केलें आहे कळावें तारीख २३ माहे मे सन १८७० इसवी.

( सही ) परशरामजी बल्लद एकुजी देशमूख परगणें पिंजर.

नोटिस—हणमंतराम रामचंद्र मारवाडी दुकान शेगाव तालुके बाळापूर जिल्हा अकोलें यास खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं आम्हीं तुम्हांस बारदान पल्ले १०२५ एकहजार पंचवीस पल्ले दिले ते येणे प्रमाणें

३४३॥।८१२ बारदान पल्ले ५०० दर ८११ प्रमाणें
३४४॥८८६ बारदान पल्ले ५२५ दर ८१०८६ प्रमाणें
८४८६ नोटिस तुम्हांस शेगाव मुक्कामी रजिष्टर केली

येकूण रुपये ६८८८९ येणे आहे त्यापैकीं वसूल आला तो रुपये ६०९ वही खातेंच जमा आहे व तुमचें दुकान आम्हीं भाड्यानें घेतलें त्याबद्दल किराया दरमहा रुपये ४ प्रमाणें तीन महिन्यांचें भाडें आकार रुपये १२ झाले आहे व बाकी आमचे घेणें राहिलें ते रुपये ६७८९ आहे ते आज तारखेपासून आठ दिवसांत आणून द्यावे न दिल्यास शिरस्तेप्रमाणें फिर्याद करून नोटिशीचे खर्चासमेत भरून घेऊं व तुम्हीं आपले गठ्ठे सहा बारदानचे मुफिसील प्रेस जिनिंगकंपनीचे कंपाउंडांत ठेविले आहेत ते आपण आपले घेऊन जावे जर करितां कांहीं नुकसान झालें तर त्याबद्दल आम्हीं जबाब देऊं शकणार नाहीं व कंपनीनें आम्हांवर भाडे अकारल्यास तें तुम्हांजवळून घेतलें जाईल कळावें तारीख २३ माहे मे सन १८७० इसवी मुक्काम अकोलें.

( सही ) गवरीशंकर गोपीनाथ दस्तुर खुद.

नोटिस—इद्राआपा बल्लद इसाआपा वस्ती मौजे खर्डे परगणें नामोद तालुके जळगाव यांस खालीं सही करणार यांजकडून देण्यांत येते जे तुम्हीं खर्डे व कडनापूर या दोन्ही दुकानांवर नौकर असोन आम्हीं पाच च्यार वेळा सांगितलें कीं दोन्ही दुकानांचा आढावा वगैरे कागदपत्र समजावून देणें त्यास आजपावेतों तुम्हीं येऊन समजून देत नाहीं हें नीट नाहीं हाल्लीं या आठ दिवसांचे आंत जामुदास येऊन कागदपत्र व अढावा समजावून देणें न दिल्यास पुढें शिरस्तेप्रमाणे तजवीज करण्यांत येईल तारीख २४ मे सन १८७० इसवी.

( सही ) हिरालाल टुकडादास दुकान जामूद

गोपीचंद नाटक.

या नावाचें हिंदुस्थानी भाषेंत व बाळबोध लिपींत एक नवीन पुस्तक सोलापुरास रा. रा. अण्णाजी गोविंद इनामदार यांनीं तयार करून आपले कल्पतरु छापखान्यांत छापिलें आहे व त्याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. याची किंमत ८१२ बारा आणे व डाकहशील एक आणा आहे. पुस्तक नाटकाचें असून चांगलें सुरस आहे.

फौजदारी काम चालविण्याविषयीं कायदा सटीक.

हें नव्या क्रिमिनल प्रोसिजर ( सन १८६९ च्या ८ वे ) कायद्याचे गांठें पुस्तक टीकेसुद्धां व त्यावरील हायकोर्टाचीं सर्क्युलरें, ठराव, व इतर ग्रंथकारांचे अभिप्राय यांसुद्धां रा. रा. नारायण बाळकृष्ण चितळे ऊर्फ रावजी भाजेकर ठाण्याचे वकील यांनीं तयार करून ज्ञानप्रकाश छापखान्यात छापिलें, त्याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आल्या आहेत. हें पुस्तक संग्रह करण्या लायक आहे. याची किंमत ७ रुपये व डाकहशील ७ आणे पडतें.

कवितासारामृत
अथवा
महाराष्ट्र भाषेच्या कवितांतील वेंचे.

सर्वांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं वरील नांवाचा ग्रंथ आम्हीं तयार करून अकोलें येथें वऱ्हाड समाचार छापखान्यांत सुंदर टाइपांवर छापवीत आहों. सदहू ग्रंथांत वामन पंडित, मोरोपंत अनंत कवी आदिकरून कवींच्या कविता फारच सुरस, व मनाल्हादक अशा आहेत. तर सर्वत्र देशबांधवांनीं यास उदार आश्रय द्यावा. हा ग्रंथ घेणारास सुलभ पडावा म्हणून याची किंमत फारच थोडी ठेविली जो आगाऊ जून महिन्याचे आंत देणारास ८१२, फक्त सही देणारास ८१४ आणे, आणि मागाहून ग्रंथ तयार झाल्यावर देणारास १ रुपया पडेल याशिवाय टपाल खर्चाबद्दल दन आणे पडतील. याप्रमाणें किंमत ठेविली आहे. तिकिटें पाठविणारांनीं अर्धआणे दराची वर्ताळ्यासह पाठवावीं. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. सदहू ग्रंथ रा. रा. शोवचंद बलदेवभाई मारवाडी दुकान भडगांव यांजकडे मागितला असतां मिळेल तारीख २० माहे एप्रिल सन १८७०

( सही ) श्रीधर नारायण भडगांवकर जिल्हा खानदेश.

# जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें या सालचीं ज० ग० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्रीस ठीं आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ८३ आणे.

| किंमतीचे ठराव. | रु. | आ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास… | …६ | ० |
| साल अखेर … .. | …७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ … | ..३ | ८ |
| एक अंकास … … | | ५ |
| फुटकळ … … .. | ० | ४ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च आगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब करून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०१८१
इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ८८

एकच मजकूर वारंवार छापणें असल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

सूचना—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

# वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केलें त्यास अडीच वर्षें होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धे आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता १ माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हे पत्र आकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकां करितां छा. प्र. केलें.